**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ. शी.** : राज्यात दिवसेदिवस वाढत असलेले स्वाईन फ्ल्यूचे प्रमाण

**मु. शी.** : राज्यात दिवसेदिवस वाढत असलेले स्वाईन फ्ल्यूचे प्रमाण या विषयावर सर्वश्री.डॉ. दिपक सावंत, दिवाकर रावते, रामदास कदम, श्रीमती निलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी मंत्री महोदयांच्या उत्तरासह 1 तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :--

"राज्यात विशेषत: मुंबई शहरात गेल्या काही दिवसात स्वाईन फ्ल्यू या रोगाचे पाच रुग्ण आढळणे, स्वाईन फ्ल्यूची साथ गेल्या वर्षीही मुंबई उपनगर तसेच पुणे व इतर शहरातही पसरणे, त्यामध्ये काही रुग्णांचा मृत्यू होणे, सदर रोगाची साथ दाट लोकवस्तीच्या भागात तसेच परराज्यातून येणाऱ्या लोंढ्यामुळे पसरल्याचे आढळणे, सबब, स्वाईन फ्ल्यूची साथ नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने याबाबत तातडीची करावयाची उपाययोजना."

महोदय, सकाळच्या प्रहरात स्वाईन फ्ल्यू या आजारावर चर्चा उपस्थित करण्याची संधी दिल्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानून या विषयाच्या बाबतीत माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मुंबई आणि पुण्यात स्वाईन फ्ल्यूचा होत असलेला प्रसार ही गोष्ट आता सर्वश्रूत झालेली आहे. आजच्या "सामना" या दैनिकात पहिल्याच पानावर मुंबईत "स्वाईन फ्ल्यूचा पहिला बळी" अशी बातमी दिलेली आहे. जे.जे. रुग्णालयात एका गर्भवती महिलेचे मिसकॅरेज झाल्यानंतर तिचा बळी गेला आहे. पुण्यात स्वाईन फ्ल्यूची जेव्हा सुरुवात झाली तेव्हा पुणे आणि मुंबईत हा विषय सेन्सेटीव्ह बनलेला आहे. पुणे आणि मुंबईत लोक दाटीवाटीने भरलेले

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .......

आहेत. अनेक लोक बाहेरील राज्यातून या दोन शहरांमध्ये प्रामुख्याने येत असतात तर काही मुंबई-पुणे आणि पुणे-मुंबई असा प्रवास दररोज करीत असतात. त्यामुळे स्वाईन फ्ल्यूचा प्रसार आणि प्रादुर्भाव होणे अपेक्षित आहे. एकंदरित स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांच्या संख्येत पुणे आणि मुंबई तसेच जे.जे. मध्ये ज्या महिलेचा बळी गेला ती धुळे जिल्ह्यातील असल्याने या दोन शहरांबरोबर धुळे आणि नाशिकचाही विचार करणे अगत्याचे झाले आहे. या महिलेचा जे.जे. रुग्णालयात मृत्यू झाला आणि शास्त्राप्रमाणे गर्भवती महिला या आजाराचे सॉफ्ट टार्गेट म्हटले जाते. आपल्याकडे बसमधून प्रवास करणारे हजारो लोक आणि लाखोंच्या संख्येने लोकलमधून प्रवास करणारे लोक आहेत. श्वसनाद्वारे होणारा हा आजार आहे. कदाचित तो श्वसनातून तसेच इनफेक्टेड माणसाच्या शिंकण्यातून इन्फेक्शन होऊन त्याचा व्हायरस सामान्य माणसाला बाधित होऊ शकतो. तसेच घरातील एका माणसाला जरी लागण असली तरी त्याच्या संपर्कातील लोकांना तो होऊ शकतो म्हणून मुंबई, पुणे किंवा नाशिकच्या दृष्टीकोनातून हा संवेदनशील आजार आहे असे माझे मत आहे.

महोदय, या आजाराची प्राथमिक लक्षणे म्हणजे साधा फ्ल्यू सारखा ताप येतो तो सुरुवातीला कळत सुध्दा नाही. त्यानंतर अचानक लंग इन्फेक्शन डेव्हलप होते आणि पेशंट रेस्पिरेटरी फेल्यूअर मध्ये जातो व ताबडतोब मरतो. आतापर्यंतचा इतिहास पाहिला तर हे विषाणू साधारणपणे दमट आणि थंड वातावरणात व्हीरोलाइंट होतात, पण सध्याचा जो काळ आहे त्याचा विचार करता उष्णतामान वाढलेले आहे. चेन्नईची केस विचारात घेतली तर चेन्नईवरुन पेशंट जेव्हा मुंबईत आला होता तेव्हा चेन्नईचे तापमान 42-43 डिग्री सेल्सियस होते. आज मुंबईतील तापमान तर वाढलेच आहे पण राज्यातही सर्वत्र तापमान जास्तच आहे. मग या व्हायरसच्या ॲक्टीव्हीटीज का वाढल्या, त्याचा युरेलिनीन का जास्त झाला, हे देखील पाहणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी यासंदर्भात मार्च महिन्यात एक बैठक घेतली होती. त्या बैठकीसाठी त्यांनी काही तज्ज्ञांना बोलावले होते. खरोखरच या विषाणुंचे न्युटेशन झाले आहे काय किंवा तो काही नवीन रुप धारण करतो आहे काय आणि जास्त तापमानात तो विषाणू ॲक्टीव्ह होतो काय हे देखील तपासून पाहिले पाहिजे व तशी तपासणीची व्यवस्था केलेली आहे काय किंवा तज्ज्ञांनी या शक्यता

....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विचारात घेऊन अभ्यास केला आहे काय हे देखील या चर्चेच्या निमित्ताने सभागृहासमोर आले पाहिजे.

महोदय, मुंबईत अशा प्रकारचा विषाणू किंवा पुण्यात अशा विषाणुंची वाढ होणे आणि त्यांचा संसर्ग होणे, यामुळे प्रॉक्झिमीटीवरती पुणे आणि मुंबई ही शहरे तर नक्की आहेतच पण इतर मेट्रोपोलिटन सिटी सुध्दा आपल्यासमोर आहे यांचा विचार करणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी यासंदर्भात तज्ज्ञांचे मत मागविले असेल तसेच अहवाल मागविले असतील ते अहवाल काय आहेत हे देखील सदनाला समजले पाहिजे, जनसामान्यांच्या दृष्टीने हे महत्वाचे प्रश्न आहेत..

महोदय, पुढील महिन्यात म्हणजे मे महिन्यात पर्यटकांची संख्या मुंबई आणि पुण्यात जास्त असते तसेच या शहरातून देखील दुसरीकडे लोक जात असतात त्यामुळे कदाचित या रोगाचा फैलाव जास्त प्रमाणात होण्याची शक्यता असते. साधारणपणे या आजारामुळे मागील वर्षभरात राज्यात 12 डेथ झालेल्या आहेत. सन 2009 मध्ये 414 रुग्णांचा मृत्यू झालेला आहे तर सन 2010 मध्ये 524 लोकांना या आजारामुळे आपले प्राण गमवावे लागले. सन 2011 सोडले तर आज पुन्हा सन 2012 मध्ये या रोगाने डोके वर काढलेले आहे, हा संशोधनाचा विषय आहे. यासाठी दोन मेडिसीन्स आहेत. त्याला आपण टॅमिफ्ल्यू आणि झेनिनडील असे म्हणतो तसेच सिरप आणि नेझ ाल स्प्रे सुध्दा आहेत पण त्याचा प्रसार फारसा लोकांपर्यंत अजून झालेला नाही. यासाठी आपण लोक जागृती करण्यासाठी काय प्रयत्न केले आहेत हे देखील सदनाला माहिती झाले पाहिजे. या वर्षी मेझो-व्हॅक कंपनीने मेझो-व्हॅक्सीन्सची निर्मिती केली होती पण त्याचे नेमके काय झाले हे देखील बऱ्याच गोष्टींमध्ये माहिती नाही. पण माझ्या माहितीनुसार एका कंपनीने, मी त्या कंपनीचे नाव घेऊ इच्छित नाही, पण या कंपनी सन 2011 हे वर्ष समोर ठेवून मेझो-व्हॅक्सीन्सचे लाखो डोस तयार केले होते आणि त्यांचा उपयोग न झाल्यामुळे ते फेकून द्यावे लागले. मग या कंपनीने पुन्हा हे प्रॉडक्शन सुरु केले की नाही अथवा ज्या लोकांना खरोखरच नेझल व्हॅक्सीन्स पाहिजे की नाही याचा कोणताही मागमुस अद्याप लागला नाही.

महोदय, मुळात या स्वाईन फ्ल्यूचे टार्गेट डॉक्टर्स देखील असतात. अनेक डॉक्टर्स सतत पेशंट्सच्या संपर्कात असतात, त्याचप्रमाणे नर्सेस तसेच पॅरा मेडिकल आणि वॉर्डमध्ये काम करणारे सुध्दा सतत पेशंट्सच्या संपर्कात असतात, त्यामुळे हे लोक सुध्दा सॉफ्ट टार्गेट असतात. तसेच

....4



डॉ. दीपक सावंत ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्यापासून फॅमिलीमध्ये किंवा शेजारी पाजारी यांनाही या आजाराची बाधा होऊ शकते. या आजाराच्या पेशंट्सवर उपचार करताना डॉक्टर व नर्सेसनी मास्क वापरायचा असतो, पण हा मास्क कोणता, थ्री लेयरचा की सेव्हन लेयरचा किंवा साधा वापरायचा अथवा कोणत्या प्रकारचा असावा याची स्पष्टता नाही. एका सर्व्हेमध्ये तर असेही आढळून आले आहे की, डॉक्टर्सच मास्क वापरीत नाहीत, ही खरोखरच गंभीर गोष्ट आहे म्हणून याबाबतीत शासनाने योग्य त्या सूचना दिल्या पाहिजे. त्याचबरोबर असेही सांगण्यात आले की, अवेअरनेस लेव्हल साधारण 70 ते 80 टक्क्यापर्यंतच्या आसपास असला तरी 30 टक्के अवेअरनेस नाही. तसेच हे मास्क वापरल्यानंतर त्याचे डिस्पोझल कसे व कुठे करायचे हे देखील महत्वाचे आहे. असे छोटे छोटे अनेक प्रश्न आहेत पण सर्वसामान्यांच्या दृष्टीने या महत्वाच्या बाबी आहेत. समजा माझ्या घरात एखादा पेशंट आहे, किंवा मी एखाद्या पेशंटला तपासले आणि त्यासाठी आम्ही मास्क वापरला पण तो कोठे टाकायचा, त्याचे डिस्पोझल कसे आणि कोणत्या ठिकाणी करायचे, हे सर्वसामान्य माणसाला माहीत नसते. साधारणपणे मेडिकल वेस्ट हे नर्सिंग होम्स मधून किंवा हॉस्पिटल्समधून कलेक्ट केले जाते पण सामान्य माणसाच्या घरातून कशा प्रकारे डिस्पोज-अप करावयाचे याबाबतीत स्पष्टता झाली पाहिजे.

आपल्याकडे हाफकिन इन्स्टिट्युटच्या लॅबमध्ये याबाबतच्या टेस्ट अगोदर होत होत्या. तसेच ठराविक टेम्परेचरमध्येच हे नमुने तपासणीसाठी पाठविले गेले पाहिजे

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

ज्या लॅबोरेटरीज ऑथेन्टीक आहेत त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. परंतु सर्वसामान्य माणसांचे स्वॅब लॅबमध्ये पाठविले जातात काय ? मुलूंड येथील काजी कुटुंबाला स्वाईन फ्ल्यूची लागण झाली होती परंतु त्या कुटुंबातील सदस्यांचा थ्रोट ऑफ प्रिकॉशन घेतला पाहिजे तो घेतला गेला नव्हता. त्यामुळे आपली लॅबोरेटरीज टेस्टींगची सुविधा अपूर्ण आहे काय असा प्रश्न निर्माण होतो. आपल्याकडे हाफकिन इन्स्टिटय़ूट असून डॉ. अभय चौधरी या ठिकाणी सर्व काम करीत असतात असे असतांना या रुग्णांना दुसऱ्या खाजगी दवाखानात स्वाईन फ्ल्यूच्या उपचारासाठी का पाठविले जाते ? कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये मोलॅक्युलर लॅब आहे. असे असतांना या रुग्णांना खाजगी हॉस्पिटलमध्ये का पाठविले जाते हा माझ्या व सर्वसामान्य जनतेच्या मनातील प्रश्न आहे. स्वॅब लॅबोरेटरीजपर्यंत इंस्टिट्युटपर्यंत कॅरी करण्याची एक सिस्टीम आहे. परंतु ही सिस्टीम पाळली जाते काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. खाजगी रुग्णालयात स्वाईन फ्ल्यूचा रुग्ण दाखल झाल्यानंतर त्याचे आयसोलेशन आपण कसे करणार आहोत ? यामुळे स्वाईन फ्ल्यूचा प्रसार बाजूच्या माणसालाही होऊ शकतो. सर्व रुग्णालयामध्ये स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात मॉनिटर करण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही. स्वाईन फ्ल्यूचा रुग्ण रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर त्याचा रोग बरा झाला आहे की नाही, तो बरा झाला आहे की, नाही, रुग्णाला टॅमी फ्ल्यूच्या गोळया दिल्या की नाही अशा प्रकारचे कोणतेही रेकॉर्ड मेन्टेन होत नाही. भविष्यकाळात या संकटाला तोंड देता यावे यासाठी आपण चर्चा करीत आहोत. यासंदर्भात माझा माननीय मंत्री महोदयांवर कोणत्याही प्रकारचा आक्षेप नाही. परंतु प्रिकॉशन म्हणून "Prevention is better than cure." म्हणून आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत. खाजगी रुग्णालयात स्वाईन फ्ल्यूचे कशा प्रकारे मॉनेटरींग करणार आहात हा महत्वाचा प्रश्न आहे. खाजगी हॉस्पिटलमध्ये मुंबई महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी दररोज भेट देऊन सर्व्हे करणार आहेत काय ? जे आयसोलेशन वॉर्ड आहेत त्यामध्ये मग कस्तुरबा हॉस्पिटल असू दे, जे. जे. हॉस्पिटल असू दे किंवा नायर हॉस्पीटल असू दे त्या ठिकाणचे आयसोलेशन वॉर्ड व्यवस्थित असले पाहिजे. एक वर्षापूर्वी आपल्याकडे स्वाईन फ्ल्यू नव्हता त्यामुळे ही सर्व यंत्रणा पूर्व पदावर आलेली आहे. या सर्व यंत्रणेला पुन्हा पूर्व पदावर आणणे किती कठीण आहे याची आपल्याला कल्पना आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

माझ्या पेशंटला व्हेंटीलेटर लावले आहे का याबाबत सर्वसामान्य माणूस सुध्दा सजग असतो. व्हेंटीलेटरच्या संदर्भातील विषय मी अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या वेळी संदर्भात उपस्थित केला होता. आपल्या विभागाकडून सबस्टॅर्ड व्हेंटीलेटरची खरेदी करण्यात आलेली आहे असे मी म्हणत नाही. परंतु स्वाईन फ्ल्यूसाठी 50 व्हेन्टीलेटर घेतले तर ते व्हेन्टीलेटर ठेवण्यासाठी आपल्याकडे पुरेशी जागा नाही. अधिकारी लोक आपले उखळ पांढरे करुन घेतात हे मला आपल्या लक्षात आणून द्यावयाचे आहे.

केंद्राकडून टॅमी फ्लूची जी औषधे आली होती त्या औषधावरील एक्सपायरी डेटवर फूली मारली होती व त्यावर दुसरी एक्सपायरी डेट लिहिली होती. स्वाईन फ्ल्यू होऊ नये यासाठी सर्वसामान्य माणूस निर्धास्तपणे टॅमी फ्ल्यूच्या गोळया घेत असतो. स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भातील गोळया किंवा व्हॅक्सीन एक्सपायरी डेटच्या असतील तर सामान्य माणूस काय करेल ? सामान्य माणसाला यामधील काहीच कळत नसते. व्हेंटीलेटर किंवा टॅमी फ्ल्यूच्या गोळया डम्प् करण्याचे काम म्हणजे आपले उखळ पांढरे करण्याचे काम राज्य शासनाचे काही अधिकारी करीत असतात. त्यामुळे मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये अशा प्रकारचे रुग्ण दाखल होतात त्या ठिकाणी व्हेन्टीलेटर किती आहेत, कशा प्रकारे वर्कींगमध्ये आहेत याबाबत माननीय मंत्री महोदयांनी आढावा घेण्याची आवश्यकता आहे. स्वाईन फ्ल्यूच्या पेंशटला व्हेंटीलेटर वापरल्यानंतर व्हेंटीलेटरचे जे काही डिस्पोजल पार्ट आहेत ते बदलल्याशिवाय तो व्हेंटीलेटर सामान्य रुग्णाला वापरु नये असे संकेत आहेत त्यामुळे तशा प्रकारची काळजी घेतली जाते काय ? नाही तर व्हेंटीलेटरमुळे पुन्हा संसर्ग होण्याचा धोका निर्माण होईल. या सर्व गोष्टीकडे आपण कशा रितीने बघतो ? यावर मॉनिटरींग करणारी सिस्टीम आपल्याकडे आहे काय ? राज्यशासनाची व मुंबई महानगरपालिकेची यासंदर्भात काही सिस्टीम आहे काय ?

टॅमी फ्ल्यूच्या गोळया केमिस्टच्या दुकानावर विकल्या जात नाहीत ही चांगली गोष्ट आहे. सर्व सामान्य माणसाला टॅमी फ्ल्यूच्या गोळया किती दिवस घ्यावयाच्या, कोण देणार, कधी देणार, कधी प्रिसक्राईब करणार, स्वॅब पॉझीटीव्ह आल्यानंतर प्रिस्क्राईब करणार की, प्रिव्हेन्टीव्ह म्हणून प्रिस्क्राईब करणार ? या रोगाचा रेझिस्टन्स नजीकच्या काळात वाढणार नाही या सर्व गोष्टीचा अभ्यास करावयास पाहिजे. तसा अभ्यास झाला नसेल व सगळयांनाच आपण टॅमी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

फ्ल्यूच्या गोळया देत बसलो तर ते उपयोगाचे होणार नाही. मध्यंतरी अशाच आजारावर डॉक्सीसाईजीनच्या गोळया दिल्या होत्या व त्याचे दूरगामी परिणाम आपल्याला फार दिवसानंतर पहावयास मिळाले होते. यासाठी लोकजागरण, सूचना फलक ट्रेन, बसेस मध्ये लावल्या पाहिजेत. हा आजार झाल्यानंतर काय करावे व काय करु नये याचे जनजागरण करणे आवश्यक आहे. मुंबई व पुण्यामध्ये स्वाईन फ्ल्यूची परिस्थिती नेमकी काय आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. नजीकच्या भविष्यकाळात स्वाईन फ्ल्यूचे व्हॅक्सीन आम्हाला मिळणार की, नाही असा जनतेमध्ये प्रश्न आहे. त्यामुळे या व्हॅक्सीनच्या संदर्भात काय प्रगती झाली, नेझल व्हॅक्सीन किती इफेक्टीव्ह आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या तज्ञाकडून घेऊन ती सभागृहाला द्यावी अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी नियम 97 अन्वये चांगली चर्चा उपस्थित केली असून त्यासंदर्भात तपशीलवार माहिती त्यांनी दिलेली आहे. स्वाईन फ्ल्यू हा तसा नवीन रोग आहे. स्वाईन फ्ल्यूचे नाव देखील दोन तीन वर्षापूर्वी कोणाला माहिती नव्हते. परंतु दोन वर्षापूर्वी स्वाईन फ्ल्यू मुळे आपल्याकडे पुष्कळ बळी गेले होते ही वस्तुस्थिती विसरून चालणार नाही. त्यामुळे येणाऱ्या धोक्याच्या संदर्भात डॉ. दीपक सावंत यांनी आपल्याला इशारा दिलेला आहे. स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात कोणते औषध उत्तम असे जेव्हा विचारले जाते तेव्हा औषध न घेणे हे सर्वात उत्तम औषध आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. स्वाईन फ्ल्यू हा संसर्गजन्य रोग आहे. बोलल्यानंतर सुध्दा स्वाईन फ्ल्यू पसरला जातो. स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णाच्या शेजारी आपण बसलो असलो व तो रुग्ण बोलावयास लागला तरी या रोगाचा प्रसार होत असतो. दोन वर्षापूर्वी पुण्याला स्वाईन फ्ल्यूची मोठया प्रमाणात साथ होती. स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात पुण्यामध्ये एक मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पोलिसांनी सांगितले की, या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करता येईल परंतु भाषण मात्र करता येणार नाही. खरे म्हणजे पोलिसांनी स्वाईन फ्ल्यू पसरु नये याबाबत काळजी घेतली होती. जेथे लोक एकत्र जमतात त्या ठिकाणी या रोगाचा प्रादूर्भाव जास्त प्रमाणात होत असतो.

सभापती महोदय, स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात मला दोन तीन मुद्दे सांगावयाचे आहेत. राज्यात लॅबोरेटरीजची संख्या वाढविणे फार आवश्यक आहे. प्रत्येक जिल्हयात चांगल्या प्रकारच्या लॅबोरेटरीज निर्माण करु शकलो तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. निदान या वर्षभरात महाराष्ट्रामध्ये किमान 8 ते 10 लॅबोरेटरीज वाढविलेल्या आहेत अशा प्रकारचे चित्र निर्माण केले तर चांगले होईल.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी...

आज प्रत्येक जिल्ह्यामध्ये, प्रत्येक तालुक्यामध्ये कुटीर रूग्णालय, उप जिल्हा रूग्णालय निर्माण केले आहेत. आमच्या जळगाव जिल्ह्यामध्ये जवळपास 5 उप जिल्हा रूगणालये आहेत. येथे आयसोलेशन कॅम्प दिला तर कायम स्वरूपी व्यवस्था होईल. यामध्ये 8-10 खाटा असल्या तरी त्या फार झाल्या. लहान गावामध्ये फार खाटा लागणार नाही. आयसोलेशन कॅम्प जिल्हा रूग्णालय, कुटीर रूग्णालय जिथे कुठे निर्माण करणे शक्य आहे तेथे निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

औषधांची उपलब्धता हा देखील महत्वाचा विषय आहे. व्हॅक्सिन संबंधी आताच सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडले आहे. या बाबत कोणाचा विश्वास बसतो तर कोणाचा बसत नाही. व्हॅक्सिन 70 ते 80 टक्के गॅरंटीचे आहे काय, इंजेक्शन दिल्यानंतर रोग होणार नाही या संबंधी शासनाने आपले मत सांगावे. 30-40 वर्षा पूर्वी ग्रामीण भागामध्ये कॉलराची साथ पसरायची. कॉलराची साथ आली की, एखाद्याच्या घरी डॉक्टर येत आणि 100-200 लोकांना लस देऊन जात असे. कॉलरा आता गेल्यातच जमा आहे.

स्वाईन फ्लू ला प्रतिबंध करणारे व्हॅक्सिन शोधून काढले पाहिजे. त्या दृष्टीने चांगला अभ्यास झाला पाहिजे. शासनाने प्रमाणित केले पाहिजे की, हे व्हॅक्सिन घेतल्यानंतर किमान साथ आटोक्यात येईल. व्हॅक्सिन घेतल्यानंतर कोणालाच स्वाईन फ्ल्यू होणार नाही असे मी म्हणत नाही. तेव्हा या बाबत एका चांगल्या दृष्टिकोनातून विचार करावा.

स्वाईन फ्ल्यूला प्रतिबंध करायचा असेल तर सातत्याने हात धुवावे असे सांगण्यात येते. त्यामुळे निश्चितपणे काही तरी परिणाम होतो. मघा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुद्दा मांडला की, टी.व्ही., वृत्तपत्रे, होर्डिंगच्या माध्यमातून जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. जनजागृती होण्यासंबंधी आपण विचार करावा.

स्वाईन फ्ल्यू झाल्यानंतर ग्रामीण भागामध्ये औषध उपलब्ध होत नाहीत. औषध कसे उपलब्ध होईल, त्याचे उत्पादन कसे वाढेल हे पाहिले पाहिजे. आज किती रूग्ण आहेत हे पहावे. संपूर्ण महाराष्ट्रात ही साथ पसरली तर साधारणत: किती रूग्ण होऊ शकतील, त्यांना किती औषधे लागू शकतील, ते औषध उपलब्ध आहे काय, त्याचे उत्पादन कोण करेल, उत्पादनाची जबाबदारी एखादी कंपनी स्वीकारते काय, या संबंधातील माहिती घेऊन कार्यवाही केली तर त्याचा निश्चितपणे लाभ होईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी...

एकूण किती लागण झाली आहे आणि मृत्यूची टक्केवारी किती आहे हे देखील पाहिले पाहिजे. सन 2010-11 मध्ये ही साथ नव्हती. पण त्या आधी साथ होती. त्यावेळी किती लोकांना लागण झाली होती व किती जण मृत्यू पावले याची टक्केवारी पहावी. यावरून किती गंभीरता आहे हे लक्षात येईल. तसेच उपचाराने किंवा प्रयत्नाने किती सुधारतात, औषध देऊन देखील किती जणांमध्ये सुधारणा होत नाही, याची आकडेवारी मिळाली तर त्याचा लाभ होऊ शकेल.

या बरोबरच लॅबोरेटरीजची देखील व्यवस्था करावी लागेल. सॅम्पल दिल्यानंतर त्याचा रिपोर्ट लवकर मिळत नाही. सदर रिपोर्ट लवकर मिळण्यासंबंधी आपण प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो. मला चार पाच मुद्दे मांडावयाचे होते. आपण आज चांगल्या विषयाला सुरूवात केल्या बद्दल मी आपलेही अभिनंदन करतो.

....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती न करता मी एक-दोन मुद्दे मांडण्यासाठी उभा आहे.

या वर्षी राज्यात स्वाईन फ्ल्यूने 8 जण दगावले आहेत, अशी आकडेवारी आहे. ही साथ मुंबई-पुणे पुरता मर्यादित आहे असे नसून औरंगाबाद येथे देखील याची सुरूवात झाली आहे. औरंगाबाद येथील घाटी रूग्णालयात 52 वर्षाच्या एका महिलेची टेस्ट घेतली असता ती पॉझिटीव्ह असल्याचे लक्षात आले आहे. आज तेथे 5 पर्यंत रूग्णांची संख्या गेली आहे. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये, प्रामुख्याने जी गर्दीची शहरे आहेत, त्या शहरांमध्ये प्रादुर्भाव होईल हे लक्षात घेऊन स्वाईन फ्ल्यूवर मात करण्यासाठी टॅमी फ्ल्यूच्या गोळ्या व तुटवडा असलेले व्हॅक्सिन उपलब्ध करून दिले पाहिजे. हे व्हॅक्सिन प्रभावी आहे,महत्त्वाचे आहे. त्यामुळे ते उपलब्ध करून दिले पाहिजे असे मला वाटते.

येथे माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. स्वाईन फ्ल्यू आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी लॅबचा तुटवडा आहे. अशा लॅब निर्माण करण्यासाठी प्राधान्याने विचार केला पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रत्येक बजेट मध्ये महसुलाची मर्यादा आहे असे आपण पाहतो. त्यामुळे खर्चावर मर्यादा येते. त्यामुळे शिक्षण आरोग्य यामध्ये कॉर्पोरेट जगताचा सहभाग घेतला पाहिजे असे मला वाटते. शासकीय रक्तपेढ्या कमी पडायला लागल्या म्हणून काही दानशूर व्यक्तिंनी रक्तपेढ्या उभ्या केल्या. त्यामुळे आज रक्त मिळण्यामध्ये कोणालाही अडचण येत नाही. ही लॅब युनिक असली पाहिजे. ह्या लॅबचा खर्च जास्त असेल. तेव्हा अशा दानशूर लोकांना आवाहन करून अधिकाधिक ठिकाणी लॅब निर्माण करणे आवश्यक आहे. नमुना लॅबमध्ये पाठविल्यानंतर त्याचा अहवाल येण्याच्या आधी पासूनच अंदाजे ट्रीटमेंट सुरू केली जाते. त्यामुळे लॅब निर्माण करण्यासंबंधी आपण विचार केला पाहिजे.

दोन वर्षापूर्वी पुण्यामध्ये स्वाईन फ्ल्यूची साथ मोठ्या प्रमाणावर आली होती. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, पुण्यात औंध येथे आयसोलेशन रूग्णालय उभे करण्यात येईल. कारण तेथे जागा पुष्कळ उपलब्ध आहे. त्यांनी पाच कोटी रूपयांची घोषणा केली

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

होती. जेव्हा विषय आला तेव्हा घोषणा केली व नंतर ती मागे पडली. मध्यंतरी माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी पुण्यातील आमदारांची स्वाईन फ्ल्यू संबंधी बैठक घेतली होती. त्यावेळी त्यांनी आम्ही या बाबत विचार करीत आहोत असे सांगितले होते. तेव्हा औंध येथे आयसोलेशन रूग्णालय उभे करता येईल काय याचा विचार केला पाहिजे.

टेस्टींग लॅब प्रमाणे व्हेंटीलेटर हा देखील एक चिंतेचा विषय आहे. आज व्हेंटीलेटर बंद आहेत, कमी आहेत. मला सगळ्याच सरकारी रूग्णालयात जाणवते की, ही जी साधने आहेत, त्यांची देखभाल होत नाही. ॲन्युअल मेंटनन्स कॉन्ट्रॅक्ट नसल्यामुळे सिटी स्कॅन, एक्स-रे मशिन्स वगैरे बंद पडलेल्या असतात. देखभालीसाठी आपल्याला वार्षिक किती निधी द्यावा लागणार आहे ? बंद असलेली व्हॅंटीलेटर पुन्हा वापरता येतात काय, किंवा त्यात काही बदल करावा लागेल काय हे पाहून घ्यावे. रूग्णालयातील साधनसामुग्री सुरू राहण्याकरिता देखभाल हा आवश्यक भाग आहे. पुण्याला आता उन्हाळा जाणवायला लागला आहे. हा विषय उष्णतेशी जोडलेला आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. या बाबत वैद्यकीय शास्त्र माहिती देऊ शकेल. पुण्यात, मुंबई, नाशिकमध्ये 1-2 स्वाईन फ्ल्यूचे रूग्ण सापडले आहेत. ही साथ अशीच पसरत जात असेल तर त्यासाठी शासनाने कोणती काळजी घेण्याचे ठरविले आहे हे माननीय मंत्र्यांनी आपल्या उत्तरात सांगावे, अशी विनंती करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, स्वाईन फ्ल्यू हा जलद गतीने पसरणारा रोग आहे. त्याचे केंद्र पुणे शहर समजले जाते. पावसाळ्यामध्ये या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होतो. काही दिवसांपूर्वीच एक बैठक आयोजित करण्यात आली होती. स्वाईन फ्ल्यू विषयी कोणती उपाययोजना करण्यात आली याचा आढावा घेण्यात आला होता. अशा प्रकारे बैठका होतात, घोषणा होतात पण त्यातून काहीही साध्य होत नाही.

पुण्यात नायडू रूग्णालय आहे. तेथे वेगळ्या प्रकारे रूग्णांना ठेवू शकतो. तेथे एक स्वतंत्र कक्ष देखील निर्माण केला आहे. तेथे व्हेंटीलेटर लावू शकत नाही. कारण तेथे अजून ए.सी.नाही. कमला नेहरू रूग्णालय महानगरपालिकेचे आहे. तेथे देखील अजून व्हेंटीलेटर नाही. माननीय पालक मंत्र्यांनी ससून रूग्णालयासाठी 10 व्हेंटीलेटर तातडीने घेण्याची ऑर्डर दिलेली आहे. याचा फायदा ग्रामीण भागातून येणाऱ्या रूग्णांसाठी निश्चितपणे होणार आहे. महापालिकेचे कमला नेहरू रूग्णालय आहे. येथे शहरातील रूग्ण मोठ्या प्रमाणावर येतात. त्यांच्यासाठी कुठलीही सुविधा नाही. 15 दिवसा पूर्वीच बैठक झाली होती. त्यावेळी व्हेंटीलेटर बसविण्यासाठी अजून दीड महिना लागेल असे सांगितले होते. उन्हाळ्यामध्ये या रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो. पहिला पाऊस पडल्या नंतर स्वाईन फ्ल्यूची ग्रोथ जलद गतीने होते. पुण्यात स्वाईन फ्ल्यूचे रूग्ण मोठ्या प्रमाणावर आढळतात. ससून रूग्णालयासाठी व्हेंटीलेटर घेण्यासाठी 1 कोटी निधी देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. शहरातील रूग्णांना देखील उपचाराची गरज असल्यामुळे पुणे शहरातील कमला नेहरू रूग्णालयासाठी तातडीने व्हेंटीलेटरची सोय करावी अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी ...

कारण टॅमी फ्ल्यूच्या गोळ्या घेऊन काही फरक पडत नाही. या रोगाची लक्षणे लगेच समजून येत नाहीत. साधा सर्दी, खोकला असला की आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु जेव्हा लक्षात येते तेव्हा मग धावपळ सुरु होते. तेव्हा पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयात तातडीने व्हेन्टीलेटर उपलब्ध करुन द्यावेत अशी विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करते.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री ) :सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी एच वन एन वन संबंधी येथे नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. मागील दोन वर्षात या आजारा संबंधी आपण येथे चर्चा केली होती. या वर्षी सुध्दा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी ही चर्चा उपस्थित केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. कारण या चर्चेच्या माध्यमातून सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना तसेच महाराष्ट्रातील सर्व जनतेला या आजारा संबंधी माहिती देण्याची मला संधी मिळाली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या आजारासंबंधीची आकडेवारी येथे दिली. मागील तीन वर्षाची आकडेवारी मी सांगतो. सन 2009-2010 मध्ये एकूण 6 हजार 704 रुग्ण आढळून आले. त्यापैकी 415 रुग्णांचा मृत्यू झाला. त्या वर्षी मृत्यूचे प्रमाण जास्त होते. सन 2010-2011 मध्ये 4 हजार 704 रुग्ण आढळून आले त्यापैकी 525 रुग्णांचा मृत्यू झाला. सन 2011-2012 मध्ये 316 केसेस आढळून आल्या त्यापैकी 12 रुग्णांचा मृत्यू झाला. मागील वर्षी मे मध्ये चार रुग्ण आढळून आले त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. जून मध्ये एक रुग्ण आढळून आला आणि त्यांची प्रकृती चांगली आहे. जुलै महिन्यात सात रुग्ण आढळून आले त्यापैकी एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नाही. ऑगस्ट महिन्यात सहा रुग्ण आढळून आले त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. सप्टेंबर महिन्यात 7 रुग्ण आढळून आले त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. ऑक्टोबर महिन्यात दोन केसेस आढळून आल्या त्यापैकी एकाचाही मृत्यू झाला नाही. नोव्हेंबर महिन्यात एकही रुग्ण आढळून आला नाही. डिसेंबरमध्ये एक रुग्ण आढळून आला. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात एकही रुग्ण आढळून आला नाही. मागील तीन महिन्यांत एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नाही. परंतु मार्च महिन्यात अचानक वाढ होऊन रुग्णांची संख्या 285 वर गेली आणि त्यामध्ये 9 रुग्णांचा मृत्यू झाला. सन 2011-2012 मध्ये एकूण 316 रुग्ण आढळून आले. सन 2012-2013 मध्ये कालच्या तारखेपर्यंत ही संख्या 147 होती. त्यापैकी आठ रुग्णांचा मृत्यू झाला आणि काल एका महिलेचा मृत्यू झाला म्हणजे ही संख्या नऊवर गेली आहे. धुळे जिल्ह्यातून ती महिला जे.जे.रुग्णालयात उपचारासाठी आली होती आणि तिचा मृत्यू झालेला आहे.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी संपूर्ण राज्याची आकडेवारी आहे का अशी विचारणा केली. या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण या आजारा संबंधी डेली मॉनेटरींग करतो. मी जिल्हानिहाय माहिती दिल्यास खूप वेळ लागेल. परंतु मी सर्कलनिहाय माहिती देऊ शकतो. ठाणे सर्कलमध्ये दिनांक 12 एप्रिल 2012 पर्यंत एकूण 1 हजार 742 रुग्णांची तपासणी केली त्यामध्ये फक्त पाच रुग्ण संशयित असल्याचे आढळून आले आणि त्यामध्ये फक्त दोन रुग्णांना बाधा झाल्याचे आढळून आले. पुणे सर्कलमध्ये एकूण 19 हजार 934 रुग्णांची तपासणी केली त्यामध्ये संशयित रुग्णांची संख्या 5 हजार 121 होती आणि त्यांना टॅमी फ्ल्यूच्या गोळ्या दिलेल्या आहेत. ही माहिती डिसेंबर ते एप्रिलपर्यंतची आहे. एकूण 818 संशयित रुग्ण होते.

सभापती महोदय,सोलापूर जिल्ह्यामध्ये एकही रुग्ण आढळून आला नाही. कोल्हापूर सर्कमध्ये एक रुग्ण आढळून आला. नाशिक सर्कलमध्ये 30 रुग्ण आढळून आले. जळगाव, धुळे, अहमदनगरमध्ये एकही रुग्ण नाही. औरंगाबाद सर्कलमध्ये 17 रुग्ण आहेत यातील जास्त रुग्ण हे परभणी आणि जालना जिल्ह्यातील आहेत. लातूरमध्ये आठ, अकोल्यामध्ये एक, नागपूर सर्कलमध्ये 8 रुग्ण आहेत.

सभापती महोदय, आज राज्यात फक्त दोन रुग्ण व्हेन्टीलेटवर आहेत. या वर्षी आतापर्यंत नऊ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे हे मी येथे सांगितले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी बेसिक मुद्दा उपस्थित केला की, व्हायरल इन्फेक्शन आहे किंवा नाही, म्युटेशन ॲक्वायर झाले की नाही, व्हॅक्सीन संबंधी जागृती करण्यात आली की नाही ? एच वन एन वन आजारा संबंधीचे मॉनेटरींग केंद्र शासनामार्फत देखील होत आहे. महाराष्ट्र शासन सुध्दा डेली मॉनटरिंग करीत आहे. त्या शिवाय मुंबई, पुणे, नागपूर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेत आहोत. गेल्या वर्षी देखील आपण खूप चांगले काम केले. सर्व महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी व शासनाचे आरोग्य अधिकारी यांनी एकत्र मिळून या आजारावर मात करण्याचा प्रयत्न केला आणि आपल्याला त्यामध्ये यश देखील आलेले आहे.

..4..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.......

सभापती महोदय, म्युटेशन संबंधी एनआयव्ही,पुणे आणि सीएमसी, वेलूर या दोन्ही संस्थांबरोबर आमचे अधिकारी संपर्कात आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, As of now, there is no mutation of this Strain. त्यांचे म्हणणे आहे की, it is just like a viral fever. तेव्हा आपण जास्त पॅनिक सिच्युएशन क्रिएट करण्याची आवश्यकता नाही. It is just like a viral flu. पण पुण्यामध्ये आपण जास्तीत जास्त रुग्णांचे स्क्रिनिंग करीत आहोत. मला जी माहिती देण्यात आलेली आहे त्यानुसार या आजाराचे बळी ग्रामीण भागातून जे रुग्ण औषोधपचारासाठी येतात त्यांचे झालेले आहेत. आता पुण्याचे नागरिक are quite comfortable with this. They are immune to it. ग्रामीण भागातून आणि दुसऱ्या राज्यातून औषधोपचारासाठी आलेले रुग्ण जास्त बळी पडलेले आहेत. आपल्याकडे आता नऊ जणांचा मृत्यू झालेला आहे त्यातील काही रुग्णांना अन्य आजार देखील होता. काल ज्या महिलेचा मृत्यू झाला तिचे मिसकॅरेज झाले होते,

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

तिची इम्युनिटी लेव्हल कमी झाल्यामुळे तिचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला होता. काही लोकांना डायबिटीजचा आजार होता, काहींना पॅन्क्रियाटिजचा आजार होता, म्हणजे जे 9 रुग्णांचे मृत्यू झाले आहेत त्यापैकी 7 केसेस अशाच होत्या. त्यांना इतर आजारही होता असे दिसून आले आहे. त्यामुळे शासनाने संपूर्ण राज्यामध्ये अवेअरनेस कॅम्पेन सुरु केलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुळात इम्युनिटी लेव्हल कमी झाल्यामुळे या आजाराने डोके वर काढले आहे. याचा अर्थ वातावरणामध्ये प्रिव्हेल आहे आणि तो माणसांना संसर्ग करीत आहे. इम्युनिटी लेव्हल कमी झाल्यामुळे हा आजार पुन्हा ॲक्टिव्ह झाला आहे असे मंत्री महोदयांना वाटत नाही काय, यासंबंधी शासनाने तज्ज्ञांचे मत घ्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, वातावरणामध्ये व्हायरस आहे हे मी यापूर्वीच सांगितलेले आहे. त्यामुळे जे कोणी या आजारामुळे बळी पडत आहेत त्यांची इम्युनिटी लेव्हल कमी झाली होती त्यामुळेच त्यांचा मृत्यू झाला आहे हे शासनाने नाकारलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सन 2009-10 मधील मृत्यूबाबतची आकडेवारी विचारली आहे. सन 2009-10 मध्ये इन्फेक्टेड केसेस आणि डेथ रिपोर्टनुसार 8 टक्के मृत्यू झालेले आहेत. सन 2010-11 मध्ये 11 टक्के मृत्यू झाले आहेत. सन 2011-12 मध्ये हे प्रमाण 4 टक्क्यावर आले आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रयोगशाळांसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. स्वाईन फ्ल्यूची तपासणी करण्यासाठी हाफकिन इन्स्टिटयूट येथे शासनाची प्रयोगशाळा आहे. तसेच कस्तुरबा हॉस्पिटल,पुणे, एनआयव्ही, पुणे आणि नागपूर येथे नवीन प्रयोगशाळा सुरु केलेली आहे. त्याशिवाय रॅलिगेअर लॅबोरेटरी आणि लाल लॅबोरेटरी या खाजगी लॅबोरेटरीजना शासनाने मान्यता दिलेली आहे. त्या प्रयोगशाळा तपासणीचे काम करीत आहेत. शासकीय व महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये ज्या केसेस येतात त्यांची तपासणी मुंबईतील हाफकिन इन्स्टिटयूट व कस्तुरबा या ठिकाणी केली जाते. पुणे व इतर जिल्ह्यातील केसेसही हाफकिन येथे आणल्या जातात. पुणे जिल्ह्यातील तालुक्यामधील केसेसची एनआयव्ही व कस्तुरबा येथे तपासणी केली जाते. खाजगी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुग्णालयातील केसेसची तपासणी रॅलिगेअर व लाल लॅबोरेटरीमध्ये केली जाते. त्यांचे सर्व रिपार्टस 24 तासामध्ये येतात.

सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी व्हॅक्सिनसंबंधीचा मुद्दा मांडला आहे. त्याबाबत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, केंद्र सरकारने 2 वर्षापूर्वी राज्याला डॉक्टर्स व पॅरामेडिक्सना व्हॅक्सिन दिली होती. परंतु काही डॉक्टर्स आणि पॅरामेडिक्स व्हॅक्सिन घेण्यासाठी तयार नव्हते. त्यावेळी त्यांना व्हॅक्सिनच्या परिणामकारकतेबाबत शंका वाटत होती. आता केंद्र सरकारने त्या व्हॅक्सिनचा पुरवठा करणे पूर्णत: बंद केलेला आहे. खाजगी कंपन्या सुध्दा व्हॅक्सिनची निर्मिती करीत असतात. त्याची माहिती मी देखील आज टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात वाचली आहे. दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्य अधिक जागरुक झाले असल्यामुळे त्यांनाही मार्केटिंगची चांगली संधी मिळाली आहे. मीडियामध्ये सुध्दा H1 N1 बाबतचे वृत्त प्रसिध्द होत असते. सेमिनार घेऊन प्रोमोट करण्याची या कंपन्यांचीही मार्केटिंगची स्ट्रॅटेजी आहे. या आजारासाठी व्हॅक्सिन घेता येईल असे केंद्र सरकारने कोणालाही सांगितलेले नाही. ही व्हॅक्सिन विकत घेऊन सर्वसाधारण लोकांना ती देण्याचा केंद्र सरकारनेही आतापर्यंत निर्णय घेतलेला नाही. ही व्हॅक्सिन मास्क कन्झम्प्शनसाठी देण्याबाबत केंद्र सरकारकडून शासनाला सूचना आलेल्या नाहीत. ज्या कंपन्या स्वत:चे मार्केटिंग करीत आहेत त्यांच्यावर शासनाचे बंधन नाही. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार त्या व्हॅक्सिनची इम्युनिटी केवळ 8 ते 10 महिने राहते. परंतु मला त्या वादामध्ये जावयाचे नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, दिनांक 22 मार्च रोजी या व्हॅक्सिनसंबंधी एक बैठक झ ाली होती त्यावेळी मुद्दा उपस्थित केला होता. लोक सरकारी व खाजगी डॉक्टर्सकडे हे व्हॅक्सिन घ्यायचे की नाही अशी विचारणा करीत असतात. सरकारने हे व्हॅक्सिन मोफत दिले नाही तरी या व्हॅक्सिनमुळे काही साईड इफेक्टस होतात काय, लोकांनी कोणती दक्षता घेतली पाहिजे याबाबतची वस्तुस्थिती निदर्शक टिपणी, माहिती प्रसिध्द केली आहे काय ? याबाबत माहिती देण्याची यंत्रणा निर्माण केली पाहिजे. अन्यथा बाजारामध्ये जे व्हॅक्सिन घेतल्यानंतर पेशंटची दिशाभूलही होऊ शकते. याबाबतची आजची विज्ञानावर आधारित लोकांना माहिती पुरविली तरी ती मार्गदर्शक ठरु

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शकेल. अन्यथा औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे मार्केटिंग ॲग्रेसिव्हली चालू राहते. जाहिरातीऐवजी बातमी स्वरुपामध्ये टाईम्स ऑफ इंडिया सारख्या वृत्तपत्रात छापून येत असेल तर सुशिक्षित वर्ग सुध्दा ते खरे मानतो. म्हणून जी वस्तुस्थिती आहे त्याबाबत शासन पावले उचलणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, अन्न व औषध प्रशासन विभागाचे हे काम आहे. त्या विभागाच्या सचिवांना आजच बोलवून यासंबंधी सूचना देण्यात येतील. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी खाजगी हॉस्पिटलमध्ये ज्या केसेस येतात त्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांच्या आयसोलेशन वॉर्डबाबतचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. रॅलिगेअर व लाल लॅबोरेटरी या दोन्ही लॅबोरेटरीज त्यांच्याकडे तपासणीसाठी आलेल्या केसेस, त्यापैकी किती केसेस पॉझिटिव्ह होत्या, निगेटिव्ह किती होत्या याबाबतची माहिती शासनाला डायरेक्ट देत नव्हत्या. परंतु शासनाने आता त्यांना ही माहिती देणे बंधनकारक केले असल्यामुळे त्यांच्याकडून दररोज माहिती उपलब्ध होत आहे. खाजगी रुग्णालयासंबंधी विशेष करुन पुण्यातील खाजगी रुग्णालयांसाठी आरोग्य खात्यामार्फत दोन वर्षापासून नियमित बैठका घेतल्या जातात. या वर्षी सुध्दा त्यांची बैठक झालेली आहे. त्यांना सेंसिटाईज करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. पुण्यातील खाजगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टर्सचीही एक बैठक घेण्यात आली आहे. मुंबईतील खाजगी हॉस्पिटल्समधील आयसोलेशन वॉर्डस आहेत त्यांचे डीएमईआर मार्फत इन्सपेक्शन करण्यात येते. आयसोलेशन वॉर्डसाठी एक नियम यापूर्वीच करण्यात आलेला आहे. त्या नियमांचे पालन होत आहे की नाही याबाबत काळजी घेण्यात येते. मुंबईमध्ये 13 पॉझिटिव्ह केसेस आढळल्या होत्या. परंतु मुंबईमध्ये आता परिस्थिती नॉर्मल झालेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी टॅमीफ्ल्यू टॅब्लेटच्या साठ्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. H1 N1 साठी टॅमीफ्ल्यू ही एकच गोळी उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे सिरप देखील आहे.

डॉ.दीपक सावंत : मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, मुदतबाह्य गोळ्यांचा साठा सापडला होता. त्याबाबत कृपया आपण माहिती द्यावी.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : टॅमीफ्ल्यू टॅब्लेट महाराष्ट्र शासन विकत घेत नाही. या गोळ्याचा साठा केंद्र सरकारकडून दिला जातो. मुंबईमध्ये महानगरपालिकेकडे सध्या 1.8 लाख गोळ्याचा साठा शिल्लक आहे. या गोळ्यांचे दवाखान्यांमध्ये व रुग्णालयांमध्ये वितरण करण्यात आलेले आहे. संपूर्ण राज्यामध्ये 11.5 लाख गोळ्या उपलब्ध आहेत. एक महिन्यापूर्वी या गोळ्यांपैकी एक्सपायरी डेटच्या काही बॅचेस सापडल्या होत्या हे खरे आहे. त्याबाबत लगेच केंद्र सरकारला कळविण्यात आले. केंद्र सरकारकडून शासनाला उत्तर देखील आलेले आहे. त्यात त्यांनी असे कळविले आहे की, This can be used. या गोळ्यांच्या एक्सपायरी डेटबाबत स्पष्टपणे लेखी कळविलेले आहे. आता आपण एक्सपायरी डेट झालेल्या टॅब्लेटबाबत स्ट्रिक्टली मॉनेटरिंग करीत आहोत.

यानंतर श्री.बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

आपल्या राज्यात कोणत्याही रुग्णाला आपण एक्स्पायर झालेली टॅमीफ्ल्यूची गोळी देणार नाही. टॅमीफ्ल्यूच्या गोळ्या एक्स्पायर झाल्या तर त्या ताबडतोब डिस्पोज करण्याचा प्रयत्न करु.

पर्सनल सिम्प्टम्सच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी सांगितले ते खरे आहे की, हे आता ऑर्डनरी व्हायरल फिवर सारखेच झालेले आहे. कोल्ड कफ, बॉडी पेन, ओमेटिंग, डायरिया यासारखे ते झालेले आहे. आता आपण जनरल मेडिकल प्रॅक्टीशनर्सना सुध्दा सूचना दिलेल्या आहेत. आपण अवेअरनेस कॅम्पेनमध्ये सुध्दा सांगितले आहे की, H1N1 च्या ट्रिटमेंटच्या बाबतीत विलंब करु नका. असे सिम्प्टम्स जरी दिसले तरी जनरल मेडिकल प्रॅक्टीशनर त्या रुग्णाला हॉस्पिटलला लवकर रेफर करत नाहीत. एक दोन दिवस आपणच उपचार करु असा ते विचार करतात. सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, मीटर चालू राहिला पाहिजे. ते काहीही असेल पण आपण त्यांना सुध्दा सेन्सिटाईज करतो की, तुमच्या पातळीवर आपण उपचार करता ते ठीक आहे परंतु त्यांनी रुग्णाला ताबडतोब टॅमीफ्ल्यूचे प्रिस्क्रीप्शन द्यावे. त्यामुळे रुग्ण रिकव्हर होण्यास सुरुवात होईल. आपण सेन्सिटायझेशनचा कार्यक्रम मुबई आणि पुणे अशा दोन्ही ठिकाणी घेत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी आयसोलेशन वॉर्डच्या संदर्भात सांगितले. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण संपूर्ण राज्यात मग जिल्हा हॉस्पिटल्स असो, सर्व ठिकाणी आयसोलेशन वॉर्डची व्यवस्था केलेली आहे. फक्त एका ठिकाणी केलेली नाही. माझ्याकडे सर्व आकडेवारी आहे. ती मी आपल्याला देतो. मुंबईमध्ये आपल्याकडे 186 बेडची आयसोलेशन फॅसिलिटी तयार केलेली आहे. ठाण्यामध्ये 79 बेडची, रायगडमध्ये 36 बेडची, रत्नागिरीमध्ये 10 बेडची, सिंधुदुर्गमध्ये 7 बेडची, पुण्यामध्ये 232 बेडची, पीसीएमसीमध्ये 214 बेडची आयसोलेशन फॅसिलिटी वेगवेगळ्या हॉस्पिटल्समध्ये तयार केलेली आहे. सातारा, सोलापूर,सांगली,कोल्हापूर, नाशिक अशा सर्व ठिकाणी आयसोलेशन वॉर्डची व्यवस्था केलेली आहे.

सभापती महोदय, पुण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य ॲड. उषाताई दराडे यांनी सांगितले. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्वत: जाऊन औंध हॉस्पिटलला व्हिजिट

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

केलेली आहे. त्या ठिकाणी काय काय करावयाचे आहे याचे मिनिट्स सुध्दा माझ्याकडे आहेत. दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी भेट दिलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री साहेबांनी दोन वेळा बैठक घेतली. मी स्वत: सुध्दा माहिती घेतली. डीपीडीसीमधून आपण 1 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ससून हॉस्पिटलसाठी आयसोलेशन वॉर्डकरिता नवीन व्हेंटिलेटर्स खरेदी करण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. औंधमध्ये आधीच 8 कोटी रुपये देऊन त्या ठिकाणी दुरुस्तीचे, अपग्रेडेशनचे काम हाती घेतले आहे. फक्त त्या ठिकाणी फिजिशियनचे एक पद रिक्त होते. त्या ठिकाणी आपण फिजिशियन सुध्दा उपलब्ध करुन दिलेला आहे. त्या ठिकाणी एक्स-रे मशिनच्या बाबतीत टेंडर काढण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. या महिन्याच्या अखेरपर्यंत त्या ठिकाणी एक्स्-रे मशिन येईल. आपल्या रिपोर्टमध्ये सोनोग्राफी मशिनच्या बाबतीत सांगितले होते. सिव्हिल सर्जन यांना या बाबतीत परवानगी दिलेली आहे. या महिन्यात ते सोनोग्राफी मशिन सुध्दा घेतील. त्या ठिकाणी दोन फिजिशियन्स कॉन्ट्रॅक्टवर आहेत. त्या ठिकाणी एक रेक्युलर फिजिशियन डॉ. राणे आहेत. त्या ठिकाणी तीन फिजिशियन्स उपलब्ध आहेत. आपण औंध हॉस्पिटलसाठी गेल्या अर्थसंकल्पात जी 8 कोटी रुपयांची तरतूद केली होती ते काम या महिनाअखेरपर्यंत पूर्ण होईल. त्या ठिकाणी आपल्याकडे तीन व्हेंटिलेटर्स आहेत. पाचपैकी दोन बंद पडले आणि तीन चालू स्थितीत आहेत. पण जे दोन व्हेंटिलेटर्स घ्यावयाचे होते त्याची निविदा प्रक्रिया झाली. त्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले. पण त्यात रेट्स खूप जास्त आल्यामुळे निगोसिएशन करुन रेट कमी करण्याचा प्रयत्न अधिकारी करीत आहेत. पण या महिन्यात आपण ते दोन नवीन व्हेंटिलेटर्स विकत घेऊन औंध हॉस्पिटलला पुरवठा करणार आहोत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, औंध हॉस्पिटलला भेट दिल्यानंतर स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात आणखी काय गरजा आहेत याबद्दल डॉक्टर्सशी बोलत असताना त्या ठिकाणी मेडिकल डॉक्टर्स ऑन इमर्जन्सी ड्युटी पाहिजेत. त्या ठिकाणी सर्व प्रकारचे कन्सल्टंट आणि सर्व प्रकारचे एक्स्पर्ट्स आहेत पण संध्याकाळी सहा-सात वाजता त्यांची ड्युटी संपल्यावर ते जेव्हा जातात तेव्हा कमीतकमी आठ रेसिडेन्शियल मेडिकल

..3...

ऑफिसर्स जे रात्री उपलब्ध असतील असे ऑफिसर्स आवश्यक आहेत, असे तेथील डॉक्टर्स आणि स्टाफने सांगितले आहे. कारण रात्री जर इमर्जन्सी आली तर त्या परिसरामध्ये कोणाचीही निवास व्यवस्था नाही. डॉक्टर्स इतक्या रात्री परत येऊ शकत नाहीत. जोपर्यंत इमर्जन्सी ड्युटीसाठी डॉक्टर्स रात्रीच्या वेळी उपलब्ध नाहीत तोपर्यंत लोकांचा विश्वास वाढणार नाही, हा एक मोठा प्रश्न आहे. दुसरी बाब अशी की, हे हॉस्पिटल पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेकडे द्यावे असा प्रस्ताव काही लोक मांडत आहेत. पण ते जिल्हा रुग्णालय असल्यामुळे आरोग्य विभागाने आणखी व्यवस्थित चालविणे गरजेचे आहे. ते रुग्णालय दुसरीकडे वर्ग करण्याऐवजी आणखी सक्षमतेने चालविण्याचा धोरणात्मक निर्णय आपण घेतला पाहिजे. अन्यथा त्या ठिकाणी 80 एकर जमीन असल्यामुळे तो भूखंड बळकावला जाण्याची मोठी शक्यता आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जे सांगितले ते अगदी खरे आहे. ते हॉस्पिटल स्थानिक महापालिकेकडे हस्तांतरित करावे यासाठी काही लोकांचे निवेदन आलेले आहे. ही एकमेव अशी केस आहे. राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांची अशी विनंती आहे की, आमचे हॉस्पिटल तुम्ही टेकओव्हर करा. आताच आठ महिन्यापूर्वी आपण भिवंडी महानगरपालिकेकडून हॉस्पिटल टेक ओव्हर केले. कल्याण महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, या सर्व नगरपालिकांची विनंती आमच्याकडे प्रलंबित आहे की, आमचे हॉस्पिटल तुम्ही ताब्यात घ्या, आम्हाला हॉस्पिटल चालवावयाचे नाहीत. आमच्याकडे डॉक्टर्स नाहीत, निधी उपलब्ध नाही असे ते म्हणतात. ही एकमेव केस अशी आहे की, त्या ठिकाणी काही लोक हे हॉस्पिटल आम्हाला द्या असे सांगतात. त्याचे कारण काय आहे हे मला माहीत नाही. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, आम्ही कोणालाही आरोग्य खात्याची एक तुकडा सुध्दा जमीन देणार नाही. आता जे हॉस्पिटल चालू आहे त्या ठिकाणी आमचे कॉलसेंटर चालू होते. आता त्या ठिकाणी इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेसचे कॉल सेंटर येणार आहे. डॉक्टर्ससाठी क्वार्टर्स बांधावयाचे आहेत. आता सुध्दा पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये बेड्सचे शॉर्टेज आहे आणि पुढच्या पाच, दहा, पंधरा वर्षामध्ये आपल्याला जो एक्स्पांशन कार्यक्रम हाती घ्यावा लागेल तेव्हा ही जमीन आपल्याला जरुर लागणार आहे. आपला भूखंड किंवा तेथील

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG MMP/

श्री. सुरेश शेट्टी ....

इन्फ्रास्ट्रक्चर दुसऱ्या कोणत्याही संस्थेला देण्याचा आतापर्यंत तरी आपण विचार केलेला नाही. त्यासंबंधी आता जास्त बोलण्याची गरज नाही. आता आपण एचवनएनवन वर थोडे कॉन्संट्रेट करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मास्कबद्दल सांगितले. जनरल पब्लीकसाठी मास्क वगैरेची गरज आहे असे मला वाटत नाही. जे मेडिकल ऑफिसर्स आयसोलेशन वॉर्डमध्ये काम करतात त्यांना आपण तीन लेयरचा मास्क रेकमंड करतो. बाकीचे त्यांना जे ग्लोव्हज, सॉक्स द्यावयाचे आहेत ते सर्व आपण पुरवठा करीत आहोत. मुख्य म्हणजे आपल्याला जो अवेअरनेस कार्यक्रम हाती घ्यावयाचा आहे त्याबाबतीत पुण्यामध्ये आपण जिल्हाधिकारी, महानगरपालिका, सर्वांना एकत्र घेऊन अवेअरनेस मोहीम सुरु केलेली आहे. संपूर्ण राज्यात सुध्दा आपण दूरदर्शनच्या माध्यमातून, वर्तमानपत्रांच्या माध्यमातून अवेअरनेस मोहीम घेत आहोत. मुळात आपण स्वच्छतेच्या प्रमोशनच्या बाबतीत प्रयत्न केला तर आपोआप हा व्हासरस मोठ्या प्रमाणावर कंट्रोल करु शकू असे मला वाटते. त्यासाठी आपल्याकडे निधी उपलब्ध आहे. पुढचा जुलै-ऑगस्टचा क्रिटिकल पिरियड आहे. मी आपल्याला आश्वासन देऊ इच्छितो की, आता आपण मोहीम सुरु करु आणि जुलै-ऑगस्टपर्यंत संपूर्ण राज्यात स्पेशल अवेअरनेस मोहीम सुरु करणार आहोत.

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी ) : सभागृहाच्या कामकाजाची वेळ माननीय मंत्री महोदयांचे उत्तर संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शेवटी परत सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, संपूर्ण देशासाठी केंद्र शासनाने जे काही प्रोटोकॉल ठरवून दिलेले आहेत त्या प्रोटोकॉलचे आपण आपल्या राज्यामध्ये काटेकोर पालन करीत आहोत. सर्व इन्फ्रास्ट्रक्चरची जी काही आवश्यकता आहे त्या बाबत राज्यातील सर्व जिल्ह्यात तयारी केलेली आहे. खास म्हणून पुणे सेंट्रीक H1N1 कडे संपूर्ण देशाचे लक्ष आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

पुण्यामध्ये काय प्रकार आहे याचा अभ्यास करण्यासाठी केन्द्र सरकारची 5 लोकांची टीम आली होती. त्या टीम बरोबर आपल्या राज्याच्या अधिका-यांनी चर्चा केली. त्या चर्चेदरम्यान त्यांनी ज्या काही सूचना केल्या त्याची अंमलबजावणी आपण करीत आहोत. आम्ही प्रत्येक दिवशी कोऑर्डिनेशन करुन H1N1 नियंत्रणात ठेवण्याचे काम करीत आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील पुण्याला जाऊन पहाणी केली, संबंधित अधिका-यांच्या बैठका घेतल्या. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी देखील बैठका घेतल्या. मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरामध्ये कम्युनिटी अवेअरनेस कॅम्पेनवर जास्त लक्ष ठेवलेले आहे. याबाबतीत सर्व लोकप्रतिनिधींनी आम्हाला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो आणि माझे उत्तराचे भाषण संपवितो.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगले उत्तर दिलेले आहे. राज्यातील व्हेंटीलेटरचा प्रश्न ताबडतोबीने सोडवा, व्हेंटीलेटरचे पार्ट वेळोवेळी बदली करा. एखाद्या घरामध्ये स्वाईन फ्ल्यूचा रुग्ण आढळल्यानंतर घरातील इतरांच्याही थ्रोटस्वॉबची तपासणी करा.

श्री. सुरेश शेट्टी : ठीक आहे.

**तालिका सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सकाळी 11.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन्हा भरेल.

(सकाळी 11.01 ते 11.30 बैठक स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.: ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व माजी विधानसभा/विधानपरिषद सदस्य यांचा अभिनंदनपर प्रस्ताव**

**सभापती** : ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व माजी विधानसभा तसेच विधान परिषद सदस्य श्री. दत्ताजी ताम्हाणे हे आज दि. 13 एप्रिल, 2012 रोजी 100 व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. या निमित्ताने त्यांनी सामाजिक क्षेत्रात जे योगदान दिलेले आहे त्याबद्दल हे सभागृह मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे.

---------

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावातील जमीन बनावट कागदपत्रे तयार करुन विक्री केल्याबाबत**

**(1) * 25078 श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पोलादपूर(जि.रायगड) तालुक्यातील हळदुले, दाभील, रानकडसरी आदि गावातील 531 एकर जमीन बनावट कागदपत्रे तयार करुन विक्री केल्याप्रकरणी 13 इसमांना अटक करण्यात आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या जमीन गैरविक्री प्रकरणी 9 जणांवर कोणती कारवाई करण्यात आली,

(3) तसेच, हळदुले (ता, पोलादपूर, जि.रायगड) येथील शेतकरी श्री.जयराम बाबू जाधव यांची जमीन बनावट कागदपत्र तयार करुन विकल्या प्रकरणी दिनांक 16 मार्च,2009 रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, संबंधित गैरविक्री करणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता**:(1) होय.

(2) सदर प्रकरणी पोलादपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.14/2010 भा.दं.वि.कलम 420, 419, 465, 468, 471, 34 प्रमाणे दि.05/04/2010 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण 15 आरोपींपैकी एक आरोपी मयत झाला असून इतर 14 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(3) सदर प्रकरणी फिर्यादी श्री.जयराम बाबू जाधव यांनी दि.16/03/2009 रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने, सदर अर्जाची चौकशी करावी अथवा वेगळा गुन्हा दाखल करावा असे निर्देश दिल्यानुसार पोलादपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.14/2010 भा.दं.वि. कलम 420, 419, 465, 468, 471, 34 प्रमाणे दि.05/04/2010 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25078........ श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील.....

(4) सदर प्रकरणी वरील आरोपींवर पोलादपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.14/2010 भा.दं.वि.कलम 420, 419, 465, 468, 471, 34 प्रमाणे दि.05/04/2010 रोजी गुन्हा दाखल कलम करुन त्यामध्ये एकूण 14 आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, महाड हे करीत आहेत.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय मंत्री श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील यांचा कालच वाढदिवस झालेला आहे. हे लक्षात घेऊनच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी उप प्रश्न विचारावेत अशी माझी सूचना आहे. तसेच मंत्री महोदयांना सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मी शुभेच्छा देत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जमिनीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरु आहेत. विशेषत: पोलादपूर तालुक्यात वरकस जमीन असून त्या जमिनीत 75 ते 80 अक्के जमीन डोंगराळ व कातळ स्वरुपाची आहे. अशा जमिनीत भातशेती तर सोडाच पण गवत सुध्दा उगवत नाही. अशा उपजाऊ नसलेल्या जमिनीवर कूळ लावून मोठ्या प्रमाणात विक्रीचे व्यवहार सुरु आहेत. या भागात 27 बोगस कूळ लावण्याबाबतची प्रकरणे उघडकीस आली. ती कोणी तयार केली तसेच त्यात तलाठी व तहसीलदार कोण कोण सामील होते याची चौकशी करण्यात येणार आहे काय, तसेच मोठ्या प्रमाणात जी सरकारी जमीन आहे त्यांचे 7/12 चे खोटे उतारे बनवून त्यांचीही विक्री सुरु आहे, यावर शासन बंदी घालणार काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, हा प्रश्न मागील वेळेस देखील सभागृहात येऊन गेला आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी सांगू इच्छितो की, या प्रकरणांमधील सर्व आरोपींना अटक केलेली आहे. नायब तहसीलदार श्री. विजय गोविंद पाटील यांच्यावर नियम 197 अन्वये कारवाई करावी असा अहवाल मंत्रालयात प्राप्त झालेला असून त्यानुसार योग्य त्या सूचना दिल्या आहेत. त्याचबरोबर महसूल विभागाशी याबाबत चर्चा करुन ज्या जमिनींचे वारस निश्चित झालेले नाहीत अथवा मयत झालेले असतील त्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तसेच ब्रिटीशांच्या काळात एकदा सर्व्हे झाला होता त्यानंतर अजून जमिनीचा सर्व्हे झालेला नाही, म्हणून मधल्या काळात महसूल विभागाने राज्यातील सर्व प्रॉपर्टीजचा सर्व्हे करण्याचे धोरण अंगीकारले असून नव्याने यात पारदर्शकता यावी असे प्रयत्न केले जातील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25078......

श्री. विजय सावंत : महोदय, रायगड जिल्ह्यात मुंबईच्या आजूबाजूचे लोक जमिनी विकत घेत आहेत. हे लोक कूळ नसताना तसेच शेतकरी नसताना देखील खोटे व बनावट 7/12 चे उतारे सादर करुन अशा जमिनी विकत घेत आहेत व घेतल्या आहेत. नॉन मराठी लोकांनी देखील जास्तीत जास्त प्रमाणात जमिनी विकत घेतल्या आहेत, या सर्व गोष्टींची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, हा विषय प्रामुख्याने महसूल विभागाशी संबंधित असला तरी आमच्याकडे अशा प्रकारच्या गैरप्रकारांच्या तक्रारी आल्यानंतर निश्चितच याची चौकशी केली जाईल्.

श्री. रामनाथ मोते : महोदय, या संपूर्ण प्रकरणात तत्कालीन तहसीलदार श्री. विजय पाटील आणि तेथील कर्मचारी श्री. रवींद्र शेडगे यांचा संबंध आहे काय, तसेच या संपूर्ण प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, दोषी लोकांवर कारवाई करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव सामान्य प्रशासन मंत्रालयाकडे प्राप्त झाले असून त्यांना या प्रकरणात सह आरोपी करण्यात आले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जो प्रश्न विचारला तोच माझा प्रश्न असून मी पुन्हा सांगू इच्छितो की, कूळ लागल्यानंतर तहसीलदाराकडे या गोष्टीचे हिअरिंग घेतले जाते, तरी देखील असे गैरव्यवहार होत आहेत. म्हणून यामध्ये दोषी आढळून आलेल्या लोकांवर कारवाई करण्याबाबत जे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविले त्यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे व हे प्रस्ताव कधी पाठविण्यात आले, त्याचप्रमाणे गरीब लोकांची फसवणूक करुन अशा जमिनी विकण्याचा जो सपाटा चालला आहे त्यादृष्टीने जरब बसेल अशी कठोर कारवाई करण्याचे ठाम धोरण शासन घेणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, या प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाकडून अशा कारवाईचे आदेश घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी योग्य त्या सूचना दिल्या जातील.

....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25078......

**सभापती** : सभागृहात अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. जे गरीब व कष्टकरी शेतकरी असतात त्यांच्या जमिनी अशा प्रकारे हडप करण्याचे जे प्रकार सुरु आहेत हे योग्य नाही. कारण जमिनीच्या कागदपत्रांवर साधे पेन्सिलीने जरी लिहिले असले किंवा नोंद असली तरी ती काढण्यासाठी सुप्रिम कोर्टापर्यंत धाव घ्यावी लागते. या निमित्ताने मी महसूल खात्याच्या मंत्री महोदयांना सूचना करु इच्छितो की, यासंदर्भात माझ्या दालनात माननीय गट नेत्यांसमवेत एखादी बैठक आयोजित केल्यास त्या बैठकीत साधकबाधक चर्चा होईल व या अनुषंगाने प्रचलित कायद्यात काय दुरुस्ती करता येईल किंवा करणे आवश्यक आहे याबाबतचाही विचार करणे गरजेचे आहे.

--------

..........5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ D/ पूर्वी श्री. भोगले..... 11:30

**मुंबई येथील सागरी किनाऱ्यावर गस्त घालणाऱ्या चार गतिमान पेट्रोल बोटस (सिलेग्ज) पैकी तीन बोटस बंद असल्याबाबत**

**(2) *26270 प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई येथील सागरी किनाऱ्यावर गस्त घालणाऱ्या चार गतिमान पेट्रोल बोटस (सिलेग्ज) पैकी तीन बोटस बंद असल्याने मुंबईची सागरी सुरक्षा व्यवस्था धोक्यात आली असल्याचे दिनांक 24 जानेवारी, 2012 रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुंबईच्या सागरी किनाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी बंद असलेल्या गतीमान पेट्रोल बोटस् त्वरित दुरूस्त करून त्यात अधिक नव्या बोटस् खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (1) नाही.

मुंबई सागरी गस्तीकरीता 3 नादुरुस्त सिलेग्ज व्यितिरीक्त 24 इतर वेगवान बोटी कार्यरत आहेत.

(2) बोटी दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. केंद्र शासनाने व राज्य शासनाने 28 व 29 अशा 57 वेगवान बोटी खरेदी केल्या असून त्यापैकी केंद्र व राज्य शासनाच्या 4 + 10 अशा 14 बोटी मुंबई सुरक्षा गस्तीस कार्यरत आहेत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. सुरेश नवले : महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी दुसऱ्या क्रमांकाचे उत्तर हे साजेसेच उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, शासनाने सांगितल्याप्रमाणे बोटी दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. पण मी या निमित्ताने निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करतो की, साधी घरातील गाडी दुरुस्ती जरी करावयाची असली तरी आपण ती दुरुस्त करण्याचा निर्णय घेतो. मग हा बोटी दुरुस्तीचा प्रस्ताव मंत्री महोदयांना कॅबिनेटसमोर घेऊन जावयाचा आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, या बोटी न्युझिलँडमधून इम्पोर्ट केलेल्या असल्याने त्यांच्या एएमसीचे कंत्राट सुध्दा त्यांच्याशी संपर्क साधूनच करावयाचे आहे, कारण त्यांच्याकडूनच आपण हे घेतो. त्यासाठी 2.03 कोटी रुपये इतका खर्च केला असून त्यातील एक कोटी दुरुस्तीवर खर्च झालेला आहे आणि राहिलेली दुरुस्ती लवकरच केली जाईल. तसेच सागरी किनाऱ्यावरील सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही अडचण नाही, कारण ऑलरेडी आपल्याकडे 70 बोटी आहेत, फक्त दोन बोटींचाच हा प्रश्न असून लवकरच त्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

.....6

ता. प्र. क्र. 26270.........

श्री. अरुण गुजराथी : महोदय, मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर गस्त घालण्यासाठी किती बोटींची आवश्यकता आहे, त्यात 3 बोटी बंद असल्याचे आपण म्हटले आहे व 24 बोटी कार्यरत आहेत. तसेच उत्तरात आपण वेगळाच आकडा दिला आहे आणि एकंदरीत राज्य शासनाच्या 4 अधिक 10 अशा 14 बोटी असल्याचे सांगितले आहे. अशा प्रकारे नेमकी किती बोटींची गरज आहे, किती बोटी कार्यरत आहेत आणि या दुरुस्तीनंतर किती कार्यरत होणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, एकूण 76 बोटी आपल्याकडे असून मधल्या काळात यासंबंधीचा आढावा घेतला असता त्यात या बोटी सफिशिएंट आहेत असा निष्कर्ष निघाला. तरी सुध्दा वेळोवेळी आढावा घेऊन अजून बोटींची गरज भासली तर त्या सुध्दा शासनाच्या माध्यमातून पुरविण्यात येतील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 26270** ......

श्री. राजन तेली : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "मुंबई सागरी गस्तीकरिता 3 नादुरुस्त सिलेग्ज व्यतिरिक्त 24 इतर वेगवान बोटी कार्यरत आहेत". तसेच दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात असे उत्तर देण्यात आले आहे की, "बोटी दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. केंद्र शासनाने व राज्य शासनाने 28 व 29 अशा 57 वेगवान बोटी खरेदी केल्या असून त्यापैकी केंद्र व राज्य शासनाच्या 4+10 अशा 14 बोटी मुंबई सुरक्षा गस्तीस कार्यरत आहेत". एका ठिकाणी 14 बोटी व दुसऱ्या ठिकाणी 24 बोटी असा उल्लेख केलेला आहे त्यामुळे यातील नेमका कोणता आकडा बरोबर आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हा प्रश्न केवळ मुंबई पुरताच मर्यादित आहे असे नसून महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी जेथे जेथे बोटी दिल्या आहेत तेथे बोटीचे किंवा सागराचे ज्ञान असलेला स्टाफ नाही, पोलिसांना कसल्याही प्रकारचे ट्रेनिंग दिलेले नाही. तसेच बोटीच्या दुरुस्तीच्या संदर्भात कोणत्याही स्टाफला माहिती नाही त्यामुळे बोटीच्या दुरुस्तींची व्यवस्था केली जाणार आहे काय तसेच पोलिसांना प्रॉपर ट्रेनिंग दिले जाणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये बोटीचा जो आकडा देण्यात आलेला आहे तो बरोबर आहे. काही बोटी या केंद्रशासनाच्या असून काही बोटी राज्यशासनाच्या आहेत व त्या प्रमाणे आपण बोटींचा उल्लेख केलेला आहे. या बोटीवर काम करण्यासाठी जो स्टाफ नेमलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मधील काळात 154 स्टाफसाठी जाहिरात दिली होती परंतु त्यापैकी आपल्याला पात्र स्टाफ केवळ 11 मिळाला आहे. त्यामुळे आपण रिक्रुटमेन्ट रुलमध्ये बदल केला असून डेलीवेजेस बेसीसवर स्टाफ घेण्याची परवानगी शासनाने दिली असून राज्यामध्ये 80 व मुंबईसाठी 35 स्टाफ 25 हजार रुपये मानधनावर घेतलेला आहे. रिक्रुटमेंटमध्ये बदल करुन नव्याने पदे भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नागपूर अधिवेशनात बोटीच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. बोटीच्या कॅप्टनला वेगळया पध्दतीने स्केल दिले पाहिजे. कॅप्टनला पोलिसांचे स्केल दिले तर तुम्हाला बोटीचे कॅप्टन मिळणार नाहीत. आपल्याकडे बोटी आहेत परंतु त्यावर कॅप्टन नाही अशी परिस्थिती आहे. माझा स्वत:चा हाच व्यवसाय असल्यामुळे या कामाच्या संदर्भात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 26270** ......

श्री. जयंत प्र.पाटील ....

मला पूर्ण माहिती आहे. माझ्या बोटीवरील कॅप्टनला 90 हजार रुपये पगार आहे. करोडो रुपये खर्च करुन आपण बोटी घेतल्या आहेत परंतु या बोटी खरेदी करण्याच्या पूर्वी बोटीवरील कॅप्टनच्या स्केलचा विचार शासनाने केला होता काय ? सुरक्षेसाठी ज्या बोटी खरेदी करण्यात आलेल्या आहेत त्या बोटींना पेट्रोल नाही ही बाब खरी आहे काय ? मागचे पेट्रोलचे पैसे न दिल्यामुळे या बोटींना पेट्रोल उपलब्ध होत नाही. परदेशातून ज्या बोटी आणलेल्या आहेत त्यासाठी जे तंत्रज्ञान लागते ते परदेशातून येणार नाही त्यामुळे स्थानिक तंत्रज्ञाना बरोबर घेऊन 2 बोटी सुरु केल्या जातील काय,सागरी सुरक्षेसाठी ज्या फायबर बोटी घेतलेल्या आहेत त्या सुरक्षेसाठी बरोबर आहेत काय, बोटीवर गोळीबार झाला तर फायबर बोट कायमची निकामी होऊ शकते त्यामुळे याबाबत शासनाने विचार केलेला आहे काय, केंद्रशासनाने आपल्या राज्याला फायबर बोटी दिल्या असून या बोटीच्या संदर्भात आपले मत व आपला अनुभव केंद्रशासनाला कळविणार आहात काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, बोटीच्या कॅप्टनसाठी पूर्वी जे रिक्रुटमेंट रुल्स होते त्यामध्ये आपण बदल करीत आहोत. या बोटींची खरेदी करतांना कॅप्टनच्या पगाराच्या संदर्भात विचार केला गेला नव्हता ही वस्तुस्थिती आहे. परंतु आता कॅप्टनच्या पगाराच्या संदर्भात शासन निश्चितपणे विचार करीत आहे. बोटीच्या कॅप्टनला बाहेर जो पगार मिळतो तोच पगार आपल्या बोटीवरील कॅप्टनला दिला तरच हे लोक आपल्याला मिळू शकतील. त्यामुळे यासंदर्भात शासन निश्चितपणे विचार करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी फायबर बोटीच्या संदर्भात विचारणा केली असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, गस्तीला असणाऱ्या बोटीपैकी काही बोटी या बुलेट प्रुफ आहेत परंतु काही बोटी फायबरच्या आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे यासंदर्भात काय करता येईल याबाबत निश्चितपणे विचार करु.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सागरी सुरक्षिततेसाठी ज्या बोटी घेण्यात आलेल्या आहेत त्यावर पुरेसा स्टाफ नाही त्यामुळे टेम्परररी स्टाफ घेण्यात आलेला आहे अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने टेम्परररी स्टाफ घेऊन समुद्र किनाऱ्याची सुरक्षा करणे बरोबर आहे काय ? ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 26270** ......

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, स्टाफच्या संदर्भातील रिक्रुटमेंटसाठी जाहिरात दिली होती, यासाठी जो स्टाफ लागतो त्याला या विषयाची संपूर्ण माहिती पाहिजे असते. परंतु आपल्या रिक्रुटमेंट रुल्समध्ये 12 वी पास अशा ज्या अटी होत्या त्या बदलून आता नवीन रिक्रुटमेंट रुल्स तयार केलेले आहेत. बोटीवर आपण जो टेम्पररी स्टाफ घेतलेला आहे डेलीवेजेस बेसीसवर घेतला असला तरी संपूर्ण स्टाफची पोलीस चौकशी करुनच त्याना कामावर घेतलेले आहे. या बोटींच्या पेट्रोलसाठी सन 2012-2013 साठी 93 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. पेट्रोल नाही म्हणून बोट बंद आहे असे कोठेही होणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या बोटींची एएमसी करण्यात आलेले नाही अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. तसेच नवीन दोन घेतलेल्या बोटींची एएमसी सुध्दा करण्यात आलेली नाही. ज्यावेळी नवीन बोटींची खरेदी करण्यात आली होती त्यावेळी एएमसी का करण्यात आली नव्हती ? या बोटींकडून किती नॉटीकल मैलापर्यंत गस्त घातली जाते ? नेव्हीच्या अखत्यारीत कोणता भाग येतो ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ठरावीक नॉटीकल पर्यंतची सुरक्षा आपण करीत असतो. किती नॉटीकल मैलापर्यंत आपण सुरक्षा करतो याची निश्चित माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. 3 बोटी पैकी 1 बोट आपल्याला दुरुस्त करता आली नाही परंतु 2 बोटी दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत. बोटीचीं एएमसी झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. गृहखात्यामध्ये जे काही इक्वीपमेन्टस् येतील त्यांची एएमसी असलीच पाहिजे अशी अट आपण आता घातलेली आहे.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, सागरी सुरक्षिततेसाठी आपण ज्या बोटींची खरेदी केलेली आहे त्या बोटींचा स्पीड व इतर बोटींचा स्पीड किती असतो याची माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती दिली तर बरे होईल. आपल्या बोटींचा स्पीड इतर बोटींपेक्षा कमी आहे त्यामुळे आपण जास्त स्पीड असलेल्या बोटींची खरेदी करावयास पाहिजे होती अशी माझी माहिती आहे त्यामुळे आपण जास्त स्पीड असलेल्या बोटींची खरेदी करणे आवश्यक होते काय ?



अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 26270** ......

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, बोटीच्या स्पीडची माहिती आता माझ्याकडे नाही. यासंदर्भातील माहिती थोडयावेळात सभागृहाला सादर करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या सारख्या ज्येष्ठांनी या प्रकरणात लक्ष घालण्याची नितांत आवश्यकता आहे असे मला वाटते. हा विषय काही एवढा सोपा नाही. मुंबईवर हल्ला झाला होता त्यासंदर्भातील हा विषय आहे. बोटी किती आहेत याची माहिती या ठिकाणी देण्यात आली आहे. परंतु बोटींसाठी जो तरंगता धक्का लागतो त्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. बोटी चालविण्यासाठी कॅप्टनची गरज असते परंतु आपल्या बोटीवर कॅप्टनच नाही अशी परिस्थिती आहे. प्रत्येक बोटीसाठी वेगळा कॅप्टन लागत असतो. तसेच बोटीवरील कॅप्टनला पोलीस ट्रेनिंगचे ज्ञान असणे आवश्यक असते. तंबाखू चोळणारा कॅप्टन नको असतो. कॅप्टन हा ट्रेन्ड, हाय प्रोफाईल असला पाहिजे. सागरी सुरक्षेसाठी आपण ज्या बोटी घेतल्या त्यातील काही बोटी नादुरुस्त आहेत. तसेच ज्या बोटी चालू स्थितीत आहेत त्यांच्यावर स्टाफ घेतलेला नाही. सागरी शिक्षण पूर्ण झालेल्या व्यक्तींची आपल्याला गरज आहे. ज्या व्यक्तींची निवड केली जाते त्यांना दर आठवडयाला, 15 दिवसाला प्रशिक्षण दिले जाणार आहे काय? त्यामुळे यासंदर्भात आपण काही नियोजन केले आहे काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26270...

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, 2 नादुरूस्त बोटींचा हा विषय आहे. उर्वरित बोटी सुरक्षा व्यवस्थेसाठी सुरू आहेत. येथे प्रशिक्षणाचा मुद्दा उपस्थित केला आहे. बोटीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपण विशिष्ट प्रशिक्षण देतो. त्यामुळे त्यांना प्रशिक्षण दिले जात नाही अशातला भाग नाही. सागरी किनाऱ्याची सुरक्षा करणे महत्त्वाचे आहे. कुठल्या महिन्यात किती जणांना प्रशिक्षण दिले, किती आठवड्याचे, महिन्याचे प्रशिक्षण दिले या संबंधातील माहिती मला पटलावर ठेवावी लागेल. पोलिसांना जे प्रशिक्षण देण्यात येते त्या पेक्षा वेगळे प्रशिक्षण बोटीवर काम करणाऱ्या पोलिसांना देण्यात येते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला एका गोष्टीचे वाईट वाटते. या सदनातून असा संदेश गेल पाहिजे की, आम्ही दक्ष आहोत. पण येथून असा संदेश जातो आहे की, आम्ही तयार नाही. त्यामुळे यात आपण दखल घातली पाहिजे.

**सभापती** : हा प्रश्न मुंबई आणि महाराष्ट्राच्या संरक्षण सिद्धतेचा आहे. आपल्याला काही वर्षापूर्वीच एक वाईट अनुभव आला आहे. त्यानुसार आपण जी तयारी करीत आहोत त्याचा हा एक भाग आहे. सदर प्रश्न दोन नादुरूस्त बोटींचा असला तरी त्याचे व्यापक स्वरूप आपल्या नजरेत आले पाहिजे. मी सन्माननीय गृह मंत्र्यांना असे सांगेन की, सन्माननीय सदस्यां समवेत आपण एक बैठक घ्यावी व संरक्षण सिद्धतेच्या बाबत आपण या क्षेत्रात काय काम केले आहे याची माहिती द्यावी व प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, कोस्ट गार्ड हेड क्वार्टर येथे या स्टाफला प्रशिक्षणासाठी वेळोवेळी पाठवत असतो. त्यांच्याकडून प्रशिक्षण घेतल्यानंतरच आपण येथे स्टाफ देतो.

**सभापती** : सन्माननीय राज्य मंत्री या संबंधी गृह विभागाला बैठक घेण्यास सांगावे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : होय.

....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**केटामाईन या अंमली पदार्थाच्या तस्करीबाबत**

**(3) * 25812 श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.भगवान साळुंखे , श्री.संजय केळकर : तारांकित प्रश्न क्रमांक 18557 ला दिनांक 2 ऑगस्ट, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केटामाईन हा पदार्थ औषधीमध्ये घटक पदार्थ म्हणून तसेच अमली घटक पदार्थ म्हणून वापरला जातो, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अन्न व औषध प्रशासन खात्याचे सह आयुक्त तथा औषध नियंत्रक यांनी कुमुद फार्मा या कंपनीकडे केटामाईनचा परवाना दिला, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, महसूल संचालयनाद्वारा गत 15 महिन्यात केटामाईनची तस्करी करण्याऱ्या तस्करांवर कारवाई करण्यात आली व यासंदर्भात महाराष्ट्रामधील कुमुद फार्मा कंपनीचे मालक श्री.कोंडूसकर यांना अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, महसूल संचालयाने कारवाई करुनसुध्दा महाराष्ट्रातील अन्न व औषध प्रशासनाने कुमुद कंपनी व त्याच्या मालकावर कोणतीही कारवाई न केल्याने केटामाईन या अमली पदार्थाचा वापर वाढून तरुण पिढीवर त्याचा दुष्परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(5) या नशिल्या पदार्थापासून तरुणपिढीला वाचविण्यासाठी कुमुद फार्मा कंपनीकडे दुर्लक्ष करण्या-या अन्न व औषधे प्रशासनाच्या दोषी अधिका-यांवर तसेच श्री.कोंडूसकर यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील श्री.मनोहर नाईक यांच्या करिता** : (1) होय, केटामाईन हे औषध घटक Genral anesthetic म्हणून वापरण्यात येतो. सदर द्रव्याचा गैरवापर नशेसाठी करण्यात येतो.

(2) होय.

(3) होय.

(4) नाही. अन्न व औषध प्रशासनाने मे कामुद ड्रग्ज प्रा.लिमि. या संस्थेविरुध्द कारवाई केली आहे. संस्थेचा उत्पादन व विक्री परवाना रद्द केला आहे. कंपनी व संचालकांविरुध्द कुपवाड पोलिस स्टेशन, सांगली येथे दि.11/12/2011 रोजी FIR दाखल केला आहे. कंपनीचे संचालक श्री.कोंडूसकर यांना दि. 22/1/2012 रोजी अटक करण्यात आली होती व त्यांना 5 दिवसाची पोलीस कोठडी दिली होती. याप्रकरणी सांगली पोलिसांसह संयुक्तपणे तपास चालू असून लवकरच न्यायालयात खटला दाखल करण्यात येत आहे.

(5) श्री.कोंडूसकर, संचालक, मे.कामुद ड्रग्ज प्रा.लि. सांगली यांचेविरुध्द कुपवाड पोलीस स्टेशन, सांगली येथे 11/12/2011 रोजी FIR दाखल केला आहे तसेच या संस्थेचा उत्पादन व विक्री परवाना रद्द केला आहे तसेच सर्व संबंधितांविरुध्द न्यायालयात त्वरेने खटला दाखल करण्यात येत आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25812...

अन्न व औषध प्रशासनातील दोन अधिकाऱ्यांना या प्रकरणात महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1979 चे नियम 8 अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे.
(6) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

मला क्रमांक 4 व 5 च्या उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे. क्रमांक 4 व 5 च्या उत्तरामध्ये खटला दाखल करण्यात येत आहे या ऐवजी प्रकरण अन्न व औषध प्रशासन संस्था, संस्थेचे संचालक व संबंधित इतर असे एकूण 9 आरोपींविरूद्ध मुख्य दावे न्यायदंडाधिकारी, सांगली येथे खटला दाखल केला आहे, असे वाचावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या महाराष्ट्रात काय चालले हा प्रश्न आहे. महाराष्ट्रात अफूची शेती सापडते. केटामाईन सारख्या अमली पदार्थाचे प्रमाणापेक्षा जास्त उत्पादन होते. हे आपल्या एफडीएच्या लक्षात येत नाही. हे मी समजू शकतो. कारण काही अंडरस्टँडिंग असू शकते. डीआरआयच्या एक्साईज डिपार्टमेंटने जून 2011 मध्ये कारवाई केली आहे. मग डीआयआरने 4 डिसेंबर 2011 रोजी कारवाई केली आहे. मग सेंट्रल एक्साईज डिपार्टमेंटने देखील कारवाई केली. ते जून पासून 4 डिसेंबर पर्यंत कारवाई करीत होते. तो पर्यंत आपल्या एफडीएला तो पर्यंत जाग आली नाही. या बाबत डिसेंबर 2011 मध्ये एफडीए ने सांगली येथे एफआयआर दाखल केला. ज्या ज्या देशात, राज्यात अंमलीपदार्थांचा प्रभाव वाढला ती ती राज्य आणि देश दहशतवादाच्या आहारी गेले आहेत. यासाठी आपण जगाचा इतिहास काढून पहावा. हा विषय आपण गांभीर्याने घेतला पाहिजे. केंद्रीय एजन्सीने या प्रकरणी कारवाई केल्यानंतर एफडीए कारवाई करीत नाही. आपण उत्तरात म्हटले आहे की, अन्न व औषध प्रशासनातील दोन अधिकाऱ्यांना नोटीस दिली आहे. कोल्हापूरचे श्री.कोंडूसकर हे कामुद ड्रग्ज प्रा.लि.चे संचालक आहेत. त्यांचे आणि या अधिकाऱ्यांचे अंडरस्टँडिग असल्याशिवाय हे चालले असेल असे म्हणण्याचे काहीच कारण नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ D/ MMP/ KTG/ जुन्नरे.. 11:50

ता.प्र.क्र.25812...

श्री.विनोद तावडे..

मुळात आपण कोणाला नोटीस दिली आहे हे काहीही कळत नाही. या संबंधातील जबाबदारी वरच्या अधिकाऱ्यांवर निश्चित केली पाहिजे. त्यामुळे आपण सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्यावर कारवाई केली आहे काय ? ड्रग्जच्या विषयात नोटीस देणे ही कारवाई मानून चालणार नाही. या प्रकरणी त्या अधिकाऱ्यांना दोषी धरून त्यांना निलंबित करणार आहात काय आणि त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, डीआरआयने कारवाई केली. त्यानंतर आम्ही जागे झालो असा जो आरोप करण्यात आला आहे त्याचे मी खंडन करतो. डीआरआयच्या कारवाईच्या आधी देखील मे.कामुद ड्रग्जला आपण नोटीस दिली होती. केस होण्या पूर्वी आपण त्यांचा परवाना निलंबित केला होता. वेळोवेळी आपण तपासणी करीत असतो. त्यामध्ये आपल्याला काही त्रुटी आढळल्या. त्यामुळे त्यांचा परवाना आपण निलंबित केला होता. डिआरआयच्या कारवाई नंतर आपण त्याची तपासणी केली. त्यांच्या कारवाई नंतर आपण संपूर्ण अहवाल तयार करून दिनांक 11.12.2001 रोजी गुन्हे दाखल केले. त्याच बरोबर सह आयुक्त यांच्या विरूद्ध नोटीस बजावून त्यांच्या विरूद्ध कारवाई करण्याचे प्रस्तावित करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या प्रमाणे शासनाने हा विषय गांभीर्याने घेतला आहे. त्यामुळेच मे.कामुद ड्रग्ज कंपनीचे निलंबन केले आहे. परवाने रद्द केले आहेत. सर्व उत्पादन आपण रद्द केले आहे. तसेच जप्तीचे आदेश देखील दिले आहेत. तसेच तत्कालीन सहायक आयुक्त श्री.डी.एस.चव्हाण व श्रीमती एम.एस.जायजळ पाटील यांच्यावर कारवाई करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सभागृहामध्ये आश्चर्यकारक उत्तरे दिली जात आहेत. हाच प्रश्न मी मागच्या अधिवेशनात विचारला होता. मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, डीआरआयने पहिली ॲक्शन घेतली होती. त्यानंतर राज्य शासनाची ॲक्शन झाली आहे. मीच हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी आपल्याकडून असे उत्तर देण्यात आले होते की, आम्ही कारवाई करणार आहोत, पण संपूर्ण फॅक्टरी बंद केली तर कामगारांवर उपासमारीची पाळी येईल. त्या कामगारांसमोर भाषणे करण्यात आली आहेत. तुमची संपूर्ण फॅक्टरी बंद केली तर

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ D/ MMP/ KTG/ जुन्नरे.. 11:50

ता.प्र.क्र.25812...

श्री.किरण पावसकर...

मुंबईत पहिल्यांदा किरण पावसकर यांच्या घरावर मोर्चा घेऊन जा. या व्यक्तीवर आपल्या राज्याने कारवाई केल्यानंतर त्याला जामीन मिळतो. पण तीच व्यक्ती आज पुन्हा गुजरातमध्ये बंद झालेली आहे. ते गुजरात राज्याच्या कस्टडीत आहेत. यावरून असे दिसते की, अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा कारभार सुरू आहे. त्यावर आपण काही कारवाई करणार आहात काय ? डीआरआयने पहिली ॲक्शन घेतली आहे त्यानंतर राज्य सरकारने ॲक्शन घेतली आहे. पुन्हा त्यांच्याकडे साठा मिळाला आहे. फॅक्टरी बंद झाल्याचे आपण नमूद केले आहे. सांगली येथे दिनांक 11.12.2011 रोजी एफआयआर दाखल केला आहे तसेच या संस्थेच उत्पादन व विक्री परवाना रद्द केला आहे, असे लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे. हे चुकीचे आहे. त्यांचा परवाना नंतर रद्द झालेला आहे. आता आपण विक्री आणि उत्पादन बंद केले आहे. तेव्हा या फॅक्टरी मधील सर्व उत्पादने आपण बंद करणार आहात काय की, काही कालावधीसाठी उत्पादन बंद करून इतर दुसरी उत्पादने चालू करायला परवानगी देणार आहात काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपल्या विभागातर्फे या कारखान्यावर कारवाई करण्यात आली होती. दिनांक 14.1.2010 ते 13.4.2010 पर्यंत म्हणजे 90 दिवस आपण कारखान्याचे उत्पादन निलंबित केले होते. डीआरआयची कारवाई जून मध्ये झाली आहे. म्हणजे पहिली कारवाई ही आपण केली आहे. डीआरआयची कारवाई झाल्यानंतर पुढच्या ॲक्शन्स आपण केल्या आहेत, गुन्हे दाखल केले आहेत.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/ D/ KTG/ 12:00

ता.प्र.क्र. 25812....

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील .....

मी मघाशी म्हटल्याप्रमाणे् संबंधित अधिकारी जर दोषी आढळले तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सदर ड्रग हे अतिशय उपयुक्त आहेत, शॉर्ट ॲनेस्थेशिया साठी किंवा इंडक्शन ॲनेस्थेशिया देणे यासाठी त्याचे काम असते. त्याला बऱ्याच प्रकारचे पर्यायी ड्रग आहेत. काही प्रमाणात डायल्युशन करुन हा ड्रग वापरला तरच त्यामध्ये इल्युसिनेशन, हॅलुसिनेशन होते आणि सेन्स ऑफ वेल-बिअिंग होते. त्यामुळे हे ड्रग जास्त प्रमाणात वापरले जातात. ते अतिशय सहजपणे उपलब्ध होतात व अतिशय स्वस्त आहेत. हे ड्रग थोडे अधिक प्रमाणात घेतले तर ते हानीकारक असून या ड्रगचे सेवन करुन बऱ्याच प्रमाणात आत्महत्त्या केल्या गेल्याचे शासनाच्या रेकॉर्डवर आले आहे. अशा प्रकारच्या या ड्रगला पर्यायी ड्रग आपल्याकडे उपलब्ध आहे. आपण त्याचे शेडयुल्ड बदलणार काय किंवा हे ड्रग मेडिकल फिल्डसाठी बॅन करणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : या संदर्भात केंद्र सरकारबरोबर निश्चितपणे पत्र व्यवहार करण्यात येईल. हा मेडिकली लिगल विषय असल्यामुळे ड्रगवर बॅन आणण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणे शक्य असेल तर त्याप्रमाणे तो सादर केला जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, या मध्ये सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. प्रश्न असा आहे की, हीच व्यक्ती वारंवार अशाप्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सापडत आहे. त्यामुळे एका अर्थाने यामध्ये संघटीत गुन्हेगारी आहे, परंतु या बाबत मला आरोप करावयाचे नाहीत. या व्यक्तीला कुणीतरी अप्रत्यक्षरित्या संरक्षण देत असावे अशी माझ्या मनामध्ये शंका आहे. या संघटीत गुन्हेगारी करणाऱ्या व्यक्त्‍ीविरुध्द कायदा तपासून घेऊन मोका लावण्यात येईल काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, हे सर्व गुन्हे एनडीपीए कायद्यांतर्गत येतात त्यानुसार आपण त्यांच्यावर कारवाई केली आहे. दुसऱ्या गुन्ह्यामध्ये अहमदाबाद डीआरएकडून गुजरातला माल आला होता, त्या मालाची तपासणी केली असता त्यामध्ये अनियमितता आढळल्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली आहे. मघाशी माननीय सदस्यांनी विचारल्यामुळे सांगू इच्छितो की, संपूर्ण फॅक्टरी बंद केली असून भविष्य काळात त्या ठिकाणी ड्रगचे उत्पादन होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

13-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/ D/ KTG/

ता.प्र.क्र. 25812....

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा आणि गंभीर प्रश्न सभागृहापुढे आला आहे. या औषधाच्या माध्यमातून तरुण पिढी नशेच्या विळख्यात सापडली आहे. मागील आठवडयात एन्सीड्रीन नावाच्या औषधांचा कोटयवधी रुपयांचा स्टॉक करुन बेकायदेशीररित्या विकल्याच्या पावत्या तयार केल्या गेल्या. हे सर्व औषध महाराष्ट्रामध्ये विकले गेले असून त्याची आपण चौकशी करुन कारवाई करणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी औषधे विकली जातात त्यावेळी निश्चितपणे त्या औषधांच्या दुकानांवर कारवाई करतो. मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, मी राज्यमंत्री झाल्यानंतर ज्या ज्या मेडिकल स्टोअरवर कारवाई झाली आहे ती कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. 99.9 टक्के कारवाई कायम ठेवण्यात आली आहे हे या ठिकाणी मला सांगण्यास आनंद होत आहे.....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री या ठिकाणी श्रेय घेऊन सभागृहामध्ये कधीही न येणाऱ्या कॅबिनेट मंत्र्यांवर अन्याय करीत नाहीत काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, श्रेय घेण्याचा प्रश्न नाही, जे चांगले केले असेल तर ते सांगितले पाहिजे. या बाबत अनेक वैद्यकीय औषधांचे दुकानदार हायकोर्टामध्ये गेले. त्यावेळी हायकोर्टाने देखील शासनाने घेतलेला अंतिम निर्णय कायम केला आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींना पायबंद घालण्याचे काम आपण सुरु केले आहे, त्यामध्ये कारवाई प्रस्तावित केली आहे आणि कायम स्वरुपी परवाना रद्द करण्याची कारवाई केली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत केले. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की,माननीय राज्यमंत्र्यांकडून अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी नोटिस देऊन कारवाई केली काय? अफूची शेती केली म्हणून नार्कोटिक्स कायद्याखाली पकडण्यात आलेले शेतकरी अजून जेलमधून बाहेर आले नाहीत, परंतु हे लोक बाहेर येऊन राजरोसपणे फिरायला लागले आहेत. त्यामुळे आपण या लोकांवर टाकलेली केस एफडीए किंवा नार्कोटिक्स अंतर्गत टाकली आहे काय, दुसरे असे की, या अधिकाऱ्यांनी मदत केल्याचे स्पष्टपणे दिसत असल्यामुळे या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणार काय? त्यांना

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25812....

श्री. विनोद तावडे....

कागदोपत्री नोटिस देणार असाल तर या मध्ये संशयाला जागा निर्माण होते. या शासनाला या खात्याच्या अधिकाऱ्यांना मदत करावयाची आहे की काय, अशाप्रकारचा संशय मनात निर्माण होतो. जे लोक सापडले आहेत ते सांगली आणि कोल्हापूरमधील आहेत. माननीय राज्यमंत्री हे कोल्हापूरचे असल्यामुळे या मध्ये संशयाला जागा रहाता कामा नये. तेव्हा या बाबतीत आपण ठोस अशी कोणती कारवाई करणार आहात?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील :सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या प्रश्नाचे उत्तर मागील वेळी दिले होते. यामध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न येत नाही. कोल्हापूर असो किंवा सांगली असो किंवा राज्यातील कुणीही असो. माननीय विरोधी पक्षनेत्यांना माझा स्वभाव कसा आहे हे माहीत आहे. त्यामुळे कुणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न येत नाही. या मध्ये डीआरएची कारवाई झालेली आहे. त्याचप्रमाणे फूड अँड ड्रग्जची वेगळी कारवाई केली आहे. डीआरएची कारवाई एनडीपीए ॲक्टखाली आणि फूड अँड ड्रग्जबाबतची कारवाई आपल्या ॲक्टखाली केली आहे. सभापती महोदय, मी सभागृहाला आश्वासित करतो की, हे अधिकारी विभागीय चौकशीमध्ये दोषी आढळले तर त्यांच्या निलंबनाचीच नाही तर त्यांना सेवेतून काढून टाकण्याची कारवाई केली जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भेरेपाडा ते दापूर (ता.शहापूर, जि.ठाणे) रस्त्याचे काम येथील वनपालासह वनरक्षकास केलेली मारहाण**

**(४) * २५८८२ श्री.हेमंत टकले , श्रीमती उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.अरुण गुजराथी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनअंतर्गत भेरेपाडा ते दापूर रस्त्याचे काम करणाऱ्या आर.व्ही.कन्स्ट्रक्शन कंपनीकडून विनापरवानगी मातीचे उत्खनन करुन वनपालासह वनरक्षकास मारहाण करण्यात आल्याची घटना माहे जानेवारी, २०१२ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कंपनी व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) होय.

(३) दिनांक ०९/०१/२०१२ रोजी १६.०० वा. चे सुमारास (१) वैभव विठ्ठलराव सुर्वे, रा.शहापूर, जि.ठाणे, (२) सुधिर रविंद्र मिश्रा, रा.दापूर, ता.शहापूर, (३) नारायण भूवन दास, रा. सापगांव, ता.शहापूर, (४) धनराज विठ्ठल कोरे, रा.तांबाला, ता.निलंगा, जि लातूर हे जे.सी.बी., डंपर, जिपगाडी अशी वाहने लावून भेरेपाडा व दापूर या दरम्यानच्या वन खात्याचे जागेतील माती वनखात्याची कोणतीही परवानगर न घेता रस्त्याचे कामासाठी चोरी करुन घेवून जात असतांना फिर्यादी श्रीराम आंबो थोरात, वनपाल व त्यांचे सोबतचे वनखात्याचे कर्मचारी यांनी सदरची माती चोरुन घेवून जाण्यास मनाई केली असता वरील चौघांनी फिर्यादी व कर्मचारी यांना त्यांचे सरकारी कर्तव्य करु नये याकरीता शिवीगाळी, दमदाटी करुन मारहाण करुन त्यांना गाडीत टाकून खर्डी येथे आणले.

सदर प्रकरणी संबंधित ४ आरोपींविरुध्द शहापूर पोलीस ठाणे गु.नों.क्र. ७/२०१२ भादंविसंक. ३६३, ३५३, ३७९, ३४१ ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दिनांक ०९/०१/२०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २५८८२....

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, पंतप्रधान ग्रामसडक योजनेमध्ये रस्ते बांधून छोटी छोटी गावे जोडण्याचे काम केले जाते. या ठिकाणी देण्यात आलेल्या उत्तरामध्ये ठेकेदाराची चार माणसे आणि वन खात्याचे वनपाल व त्यांच्या सोबत असलेले कर्मचारी यांचा उल्लेख आहे. एखाद्या वन खात्याचा परवाना नसलेल्या ठिकाणाहून माती काढतांना वन खात्याच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना अडविल्यानंतर त्या वन खात्याच्या कर्मचाऱ्यांना मारहाण केली जाते. एखाद्या सिनेमामध्ये शोभून दिसावे अशाप्रकारे त्या कर्मचाऱ्यांना मारहाण करुन त्यांना गाडीमध्ये टाकून पुढे नेण्यात येते. असे प्रकार होत असतांना वन खात्याने परवानगी देऊन त्या लोकांना माती उचलण्यास द्यावी काय, विना परवाना माती घेऊन जाणाऱ्या लोकांवर वन खात्याचे कर्मचारी संरक्षणाअभावी देखरेख ठेवू शकतील काय, त्यांना पुरेसा पोलीस बंदोबस्त देण्याची आवश्यकता असतांना शासन त्याबाबत काही विचार करु शकेल काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, शासकीय किंवा अशासकीय स्वरुपाचे कोणतेही काम असलेतरी त्यामध्ये वन खात्याची मालमत्ता घेण्याचा प्रश्न असेल, त्यामध्ये माती असेल, दगड असतील किंवा लाकूड असेल तर त्या करिता वन खात्याची परवानगी घेऊनच संबंधित ठेकेदाराने तो माल उचलला पाहिजे. अनेक वेळा कामाचे एस्टिमेट योग्य पध्दतीने केले जात नाही. माती जवळ उपलब्ध होईल अशा पध्दतीचे एस्टिमेट केले जाते. प्रत्यक्षात साईटवर वन खात्याची जमीन असल्यामुळे ती माती उपलब्ध होत नाही. त्यामुळे कामाचे भरलेले टेंडर आणि हाती घेतलेले काम लक्षात घेऊन जवळची माती उकरण्याचा प्रयत्न होतो त्यामधून असे प्रकार होतात. सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टींची सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. एक तर सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कामाचे एस्टिमेट करीत असतांना नॉन प्लॅनमधील कामे जिल्हा परिषदेमार्फत केली जातात. त्या कामाचे एस्टिमेट करीत असतांना लागणारे मटेरिअल कोठून आणि किती अंतरावरुन आणावे लागेल याचा देखील एस्टिमेटमध्ये स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. ब-याचवेळा लांबच्या अंतराचे लिडिंग दाखविले जाते, प्रत्यक्षात जवळून मटेरिअल उकरुन ते रस्त्यावर टाकण्याचा प्रयत्न केला जातो. सभापती महोदय, त्यासंबंधीच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात येतील. वन संपदेचे रक्षण करणे वन खात्याच्या कर्मचाऱ्यांचे कर्तव्य

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25882....

श्री.आर.आर.पाटील.....

आहे. वन विभागाकडे असलेला अपुरा कर्मचारी लक्षात घेता व अशाप्रकारे ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांकडून होणारा त्रास लक्षात घेता या कर्मचाऱ्यांना योग्य प्रकारे पोलीस संरक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्यामध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही. ज्या परिक्षेत्रामध्ये वन आहे त्या परिक्षेत्रामधील वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याची भूमिका घेतली जाईल.

(यानंतर श्री. अजित शिगम)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25882....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ज्या ठिकाणी वन क्षेत्र जास्त आहे त्याच भागातून छोट्या गावांना रस्ते जोडले जातात. तेथे कोणत्याही प्रकारची क्वॉरी उपलब्ध नसल्यामुळे माती, मुरुम काढता येत नाही. त्यामुळे रस्त्यांची कामे करता येत नाहीत. तेव्हा मागासलेला ग्रामीण भाग रस्त्याने जोडण्याकरिता क्वॉरी नसलेल्या ठिकाणी वन विभागाच्या क्षेत्रातील काही जागा मिळण्याकरिता मंत्री महोदय प्रयत्न करतील काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, होय. जिल्हाधिकारी आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांना तशा सूचना देण्यात येतील. जंगलाचे संरक्षण करण्याची जबाबदारी कायद्यानुसार वन विभागावर आहे आणि आपणास ते अमान्य करता येणार नाही. परंतु योग्य काम आहे म्हणून तेथील अधिकाऱ्यांना मारहाण करणे याचे बिलकूल समर्थन करता येणार नाही. अशी कामे करीत असताना वन विभागाकडून जी काही मदत लागेल किंवा काही परवानगी लागत असेल तर ती लवकरात लवकर मिळवून देण्याच्या दृष्टीने वन विभागाला निश्चितपणे सूचना देण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात 65 टक्के दुध भेसळयुक्त असल्याबाबत**

**(5) * 26418 श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.प्रकाश बिनसाळे , ॲड उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.दिवाकर रावते , श्री.परशुराम उपरकर , श्री.जयवंतराव जाधव , श्री.अनिल भोसले , श्री.संदीप बाजोरिया , श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे ,श्री.रामनाथ मोते , श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्री.मनीष जैन , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.माणिकराव ठाकरे , प्रा.सुरेश नवले ,श्री.अरुण गुजराथी , श्री. भाई जगताप , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.भगवान साळुंखे , श्रीमती विद्या चव्हाण , श्रीमती अलका देसाई , श्री.सुभाष चव्हाण , श्री.उल्हास पवार, श्रीमती दीप्ती चवधरी, श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्रीमती शोभा फडणवीस , श्री.केशवराव मानकर , श्री.रामदास कदम** : सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सहकारी आणि खासगी दूध डेअरी, दूध संघ यांच्यामार्फत वितरित करण्यात येणाऱ्या दुधात पाण्याबरोबरच युरिया, ग्लुकोज, चरबी, वॉशिंग पावडर मिसळली जात असल्याने 65 टक्के दूध भेसळयुक्त असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान फूड सेफ्टी स्टॅण्डर्ड ॲथॉरीटी ऑफ इंडियाने दिलेल्या अहवालात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यातील प्रमुख शहरातील दूध भेसळीमुळे जनतेच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असून गर्भवती महिला व लहान मुलांना गंभीर आजार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(4) असल्यास, भेसळयुक्त होत असलेली दुधाची विक्री थांबविण्याबाबत तसेच भेसळयुक्त दुधाची विक्री करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सकस व उत्तम दर्जाचे दूध उपलब्ध व्हावे म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26418....

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ,श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) दूध भेसळ करणाऱ्या समाजकंटकांना आळा बसावा म्हणून अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांचेमार्फत वेळोवेळी दूध उत्पादक, वितरक, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते यांचेकडून नमुने घेण्यात येतात व अप्रमाणित अहवालाप्रकरणी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते.

परराज्यातून तसेच इतर जिल्ह्यातून पुरवठा होणाऱ्या दुधामधील भेसळीला आळा बसावा म्हणून अन्न व औषध प्रशासनामार्फत जकात नाक्यावर दूध तपासणी मोहीम आयोजित करण्यात येते.

सन 2010 ते 2011 या कालावधीत अन्न व औषध प्रशासनामार्फत वेगवेगळया ठिकाणी विविध स्तरावर दुधाचे 1688 नमुने घेण्यात आले आहेत. सदर नमुन्यांपैकी 1253 नमुने प्रमाणित आढळून आले तर 393 नमुने अप्रमाणित आढळून आले आहेत. अप्रमाणित नमुन्यासंदर्भात 180 प्रकरणात संबंधिताविरूद्ध न्यायालयात खटले दाखल करण्यात आले असून 178 प्रकरणाबाबत प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे व उर्वरित 35 प्रकरणी चौकशी सुरू आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, दूध में मिलावट करने संबंधी विषय बहुत ही गंभीर है. फूड सेफ़्टी स्टेण्डर्ड ॲथारीटी ऑफ इंडिया के मुताबिक़ जो शुद्‌धता उस दूध में होनी चाहिए थी, उतनी शुद्धता उस दूध में नहीं थी. जाँच करने से पता चला है कि 65 प्रतिशत दूध में मिलावट थी. इसके बारे में पीआईएल भी दी गयी और हाई कोर्ट ने नोटिस भी इश्यु किया है. मेरा स्पेसिफिक प्रश्न यह है कि दूध की शुद्‌धता मापने के लिए महाराष्ट्र शासन के फूड एण्ड ड्रग्स डिपार्टमेंट ने कौन सा स्टेंडर्ड निर्धारित किया है. यानी वह डिपार्टमेंट दूध की शुद्धता किस तरह से मापता है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि छापे मारने के बाद कितने केसीज में दूध में मिलावट पाई गई और दूध में मिलावट करने वाले लोगों पर केस दर्ज किए गए हैं या नहीं ?

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26418...

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मधल्या काळात वर्तमानपत्रात बातमी आली होती. त्याबाबत मी खुलासा करु इच्छितो. दुधाचे एकूण 126 नमुने घेण्यात आले होते. त्यानुसार 65 टक्के नमुन्यांमध्ये अप्रामाणितता आढळून आली होती ही अप्रमाणिततरा वेगवेगळ्या स्वरुपाचीआहे. ॲडल्टरेशन हा वेगळ्या प्रकारचा आहे. ॲडल्टरेटेड, सब स्टॅन्डर्ड फूड, अनसेफ फूड व बॅन फूड असे चार प्रकार आहेत. 65 टक्के नमुन्यांमध्ये सब स्टॅन्डर्ड फूड असल्याचे आढळून आले. एनएसएफ आणि फॅटचे प्रमाण कमी करण्यासाठी दूधरमध्ये पाण्याची भेसळ केली असल्याचे निदर्शनास आले. आजपर्यंत आपण जवळपास 5 हजार 65 दुधाचे नमुने घेतलेले आहेत. अनेकांवर कारवाई देखील केलेली आहे त्याची आकडेवारी माझ्याजवळ आहे. आता जो नवीन कायदा आलेला आहे त्या अंतर्गत वेगवेगळ्या टप्प्यावर ही दूध भेसळ रोखण्याचा आपणास प्रयत्न करावा लागणार आहे. कारण दूध पुरविणारा दूध डेअरीमध्ये दूध देतो किंवा खाजगी डेअरीमध्ये देतो. तेथून चिलींग प्लान्ट असेल, टँकर असेल किंवा दूधसंघ असेल या माध्यमातून शहरात दूध येते अशी ही साखळी आहे. तेव्हा प्रत्येक ठिकाणी लायसन्स देण्यास सुरुवात करुन जबाबदारी निश्चित करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, दूध भेसळीचा विषय सभागृहात अनेकवेळा चर्चेला आलेला आहे. मी याच विषयावर अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, दूधाची भेसळ करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा करण्याची शिफारस केंद्र सरकारला केलेली आहे. मी ज्यावेळी अर्धातास चर्चा उपस्थित केली होती त्यावेळी जन्मठेप होती. आता फाशीची शिक्षा देतात की नाही, हे मला माहीत नाही. आपण केंद्र सरकारकडे शिफारस पाठविली आहे, त्यास मान्यता मिळाली किंवा कसे हे अजून माहीत नाही. आपण जोपर्यंत कडक शिक्षेची तरतूद करीत नाही तोपर्यंत अशा कृत्यांना आळा बसणार नाही. तेव्हा या संदर्भात मंत्री महोदय माहिती देतील काय ?

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26418...

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्या प्रमाणे सब स्टॅन्डर्ड, ॲडल्टरेशन आणि अनसेफ फूड यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षेची तरतूद आहे. यामध्ये पाच लाख रुपयांचा दंड, सहा वर्षाची कारावासाची शिक्षा आहे. यामध्ये जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद नाही. हा केंद्र शासनाचा कायदा आहे. देशातील सर्व राज्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन त्यांनी कायदा केलेला आहे आणि त्यामध्ये कठोरातील कठोर शिक्षा ठेवलेली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आहे. आज मुंबईत दुधाची किंमत लीटरमागे 40 ते 50 रुपये आहे. आजारी व्यक्तींना आणि लहान मुलांना पूर्णान्न म्हणून दूध देतो. त्या दुधामध्ये अशाप्रकारची भेसळ होत असेल त्यांच्या जीविताला धोका होऊ शकतो आणि मुंबईत भेसळीचे प्रकार सर्रास सुरु आहेत. झोपडपट्टयांमध्ये हे प्रकार सुरु आहेत. हे प्रकार रोखण्यासाठी राज्याची अन्न व औषधे प्रशासन यंत्रणा सक्षम नाही. ते अशाप्रकारचे गुन्हे नोंदवू शकत नाही. फक्त दूधामध्येच भेसळ होते असे नाही तर खवा तसेच अन्य पदार्थामध्ये देखील भेसळ होत आहे. त्या शिवाय भेसळीमुळे पदार्थ खराब होतात तरी देखील ते विकले जातात. माझा प्रश्न आहे की,आतापर्यंत अशा प्रकारच्या किती गुन्ह्यांची नोंद झाली आणि त्यापैकी किती जणांवर कारवाई करण्यात आली ? माझा दुसरा प्रश्न म्हणजे आजकाल भाज्या हिरव्या दिसाव्यात म्हणून त्यांना कृत्रिम रंग देण्यात येतो. पालेभाज्यांना हिरव्या रंग दिला जातो. गाजरांना लाल रंग दिला जातो. हे सर्व प्रकार रोखण्यासाठी वेगळी यंत्रणा उभारण्यात येईल काय ?

**सभापती** : हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. या महत्वाच्या प्रश्नावर मी एक तासाची चर्चा उपस्थित करण्याची परवानगी देतो. पुढच्या आठवड्यात सोमवार, मंगळवार, बुधवार किंवा अन्य दिवशी ही चर्चा घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निर्णयाचे स्वागत करतो. पंडित जवाहरलाल नेहरु नंतर महाराष्ट्रामध्ये आबा पाटील आहेत. काळाबाजार करणाऱ्यांना फासावर चढवावे की भेसळ करणाऱ्यांना फासावर चढवावे असे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील म्हणाले होते. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय सांगत आहे की, जन्मठेपेची शिक्षा नाही. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, या ठिकाणी चर्चा होईल, परंतु कायद्यामध्ये तशी तरतूद नसेल तर तशा प्रकारचा कायदा आणणार काय ? ..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26418...

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, शरीरास हानीकारक आणि मृत्यू प्रकरणी कलम 59 प्रमाणे जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे. आपल्याकडे हा कायदा लागू आहे. तशा पध्दतीच्या केसेस आल्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : अगोदर सांगितल्याप्रमाणे या प्रश्नाच्या अनुषंगाने एक तासाची चर्चा उपस्थित करण्याची परवानगी मी दिलेली आहे. या विषयावर सविस्तर चर्चा व्हावी अशी माझी स्वत:ची इच्छा आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या निर्णयाचे स्वागत करतो. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी या विषयावर अर्धा तासाची चर्चा उपस्थित केली असता त्यावर तत्कालीन माननीय मंत्री महोदय श्री.रमेश बागवे साहेब यांनी उत्तर देताना काही आश्वासन दिले होते. आपण या ठिकाणी एक तास चर्चा करण्याची परवानगी दिलेली आहे. त्यावर चर्चा होईल आणि सरकारकडून काही आश्वासने मिळतील परंतु नंतर त्यांची अंमलबजावणी होणार नसेल तर मग आपण येथे कशाला चर्चा करायची ? आपण मागील कार्यवृत्त पहावे. त्यावेळी मंत्री महोदयांनी काय आश्वासन दिले होते ते आपण पहावे. मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी होणार नसेल तर मग चर्चा कशाला करायची ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी या ठिकाणी खुलासा केला आहे की, शरीरास हानीकारक आणि मृत्यू संबंधाने जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे.

------

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील अन्न व औषध प्रशासनात सह आयुक्तापासून सहाय्यक आयुक्तांपर्यंतची विविध सुमारे 178 पदे रिक्त असल्याबाबत**

**(6) * 26059 श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , प्रा.सुरेश नवले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , ॲड. उषा दराडे , श्री.किरण पावसकर , श्री.सतीश चव्हाण , श्री.जयवंतराव जाधव , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.मोहन जोशी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.अनिल भोसले , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.एम.एम.शेख , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.भगवान साळुंखे , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , डॉ.नीलम गोऱ्हे , डॉ.दीपक सावंत , श्री.परशुराम उपरकर , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.रामनाथ मोते , श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील अन्न व औषध प्रशासनात सह आयुक्तापासून सहाय्यक आयुक्तांपर्यंतची विविध सुमारे 178 पदे रिक्त असल्याचे तसेच पुणे शहरात अन्न सुरक्षेसाठी फक्त 13 अधिकारी असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू पदे रिक्त असल्यामुळे अन्न भेसळीची वेळेवर तपासणी होत नसल्यामुळे भेसळखोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(4) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर रिक्त पदे त्वरित भरणेबाबत व पुणे शहरात अन्न सुरक्षा अधिकारी यांच्या संख्येत वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता** : (1) नाही. अन्न व औषध प्रशासनामध्ये सह आयुक्त (औषधे) या संवर्गाची एकूण 11 पदे व सहाय्यक आयुक्त (औषधे) या संवर्गाची एकूण 52 पदे मंजूर आहेत. त्यापैकी सह आयुक्तांचे 1 पद व सहाय्यक आयुक्तांची 23 पदे रिक्त आहेत. अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे येथील कार्यालयामध्ये अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची 13 पदे मंजूर असून, ती सर्व पदे भरलेली आहेत.
(2) नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) पदोन्नती/ सेवानिवृत्ती/ स्वेच्छा सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेली पदे पदोन्नतीने तसेच नामनिर्देशनाद्वारे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे. अन्न सुरक्षा व मानदे कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक पदांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची पदे वाढविण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. आपण यापूर्वीच्या प्रश्नाच्या अनुषंगाने अन्न व औषध विभागाच्या संदर्भात एक तासाची चर्चा घेण्याचे जाहीर केलेले आहे. त्यावेळी या प्रश्नातील विषयाचाही समावेश करण्यात यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26059....

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाला मंत्री महोदय श्री.मनोहर नाईक यांनी गोल गोल उत्तर दिलेले आहे. अन्न व औषध प्रशासनामध्ये सहाय्यक आयुक्त या संवर्गाची 52 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 23 पदे रिक्त आहेत. केवळ सह आयुक्तांचे 1 पद भरलेले आहे. या पदांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार अन्न व सुरक्षा अधिकाऱ्यांची पदे वाढविण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे, असे लेखी उत्तर दिलेले आहे. हा आढावा केव्हा घेण्यात येणार आहे आणि पदे वाढविण्याच्या प्रस्तावावरील विचार केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, यापूर्वीच्या प्रश्नाचे माझे उत्तर पूर्ण झाले असते तर याबाबतचा खुलासा झाला असता. अन्न व औषध हे दोन्ही विषय एकत्र असल्यामुळे हा विषय एकत्रिपणे उपस्थित केला जात आहे. अन्न व औषध अधिनियम हा कायदा राज्यात लागू केल्यामुळे त्याच्या आधारे शासनाला विस्तृतपणे उपाययोजना करावयाची आहे. आज देशामध्ये महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे की, हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर 1 लाख 41 हजार प्रकरणांची नोंदणी झालेली आहे. गेल्या वर्षापर्यंत शासनाला नोंदणीमार्फत 5-10 लाख रुपये मिळत होते. परंतु हा कायदा लागू झाल्यानंतर देश पातळीवर राज्याचा गौरव करण्यात आला आहे. या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर 37 कोटींचा महसूल राज्याला मिळाला आहे. देश पातळीवर विचार केला तर या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या राज्याचा आग्रह आहे. परवाच माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर आम्ही एक बैठक घेतली होती. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या राज्यात नवीन टेस्टिंग लॅबोरेटरीज स्थापन करण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. दोन्ही विभागांसाठी जास्तीत जास्त निधी देण्याचा व पदे वाढविण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. त्याला लवकरात लवकर मान्यता मिळाल्यानंतर हे सर्व प्रश्न सुटतील.

**सभापती** : यापूर्वीचा दूध भेसळीचा प्रश्न आणि हा प्रश्न हे दोन्ही प्रश्न सारखेच असल्यामुळे मघाशी मी सांगितल्याप्रमाणे ज्यावेळी एक तासाची चर्चा केली जाईल त्यावेळी सन्माननीय सदस्यांना या दोन्ही विषयांवर चर्चा करता येईल.

------

3...

## कामोठे नवी मुंबई येथील एका महिलेने सह निबंधक सहकारी संस्था यांच्या संगनमताने केलेले गैरव्यवहार

**(७) * २५३१३ श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे नवी मुंबई येथील एका महिलेने सह निबंधक सहकारी संस्था यांच्या संगनमताने एकच फ्लॅट पाच जणांना वेगवेगळ्या तारखेस विकून जनतेची फसवणूक केली, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास नोव्हेंबर, २०११ मध्ये लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फ्लॅट खरेदीत फसवणूक झालेल्यांनी सहनिबंधक सहकारी संस्था नवी मुंबई यांनाही फसवणुकीच्या गुन्ह्यात सह आरोपी करण्यात यावे यासाठी शासनाकडे विनंती अर्ज केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनतेची फसवणूक करणाऱ्या महिलेवर व सह निबंधका विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी कळविलेले होते हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणाची चौकशी अपर निबंधक (त व नि) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे करीत असून सकृतदर्शनी फसवणुकीच्या गुन्ह्यात सहनिबंधक यांचा सहभाग असल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई व ठाणे शहरातील जमिनीच्या, जागेच्या व फ्लॅटसच्या किंमती खूप वाढलेल्या आहेत. त्यामुळे लोकांच्या फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. या प्रकरणात सहनिबंधक व एक महिला यांच्या संगनमताने एकाच फ्लॅटची अनेकदा विक्रीकरुन अनेकांना फसविले गेलेले आहे. याबाबत तक्रार करण्यात आलेली आहे. परंतु जाणीवपूर्वक टोलवाटोलवी करुन फ्लॅटधारकाला फसविलेले आहे हे सिध्द झालेले आहे. सहनिबंधक श्री.विकास रसाळ यांनी श्री.कर्णिक यांच्या पत्राच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरिता वसंत बहार को.ऑप.हौ.सोसायटीचे अध्यक्ष व सचिव यांना व तक्रारदार श्री.कर्णिक यांना दि.20 मार्च व दि.22 मार्च रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे पत्र दिले होते. ते सुनावणीच्या तारखेनंतर म्हणजे दि.22 मार्च व दि.27 मार्चला देण्यात आले हे खरे आहे काय ? त्याबाबत माझ्याकडे पुरावा आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, ही दोन्ही पत्रे संबंधितांना दि.27 व दि.30 मार्चला मिळाली आहेत. सुनावणीची तारीख उलटून गेल्यामुळे सहनिबंधकांनी एकतर्फी निर्णय

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देऊन श्रीमती धनश्री लिमण यांना पाठीशी घातले आहे हे खरे आहे काय आणि तिसरा प्रश्न असा आहे की, फसवणुकीचे अनेक प्रकार तेथे झालेले आहेत. जिजाऊ को.ऑप.हौ.सो.कामोठे, मानसरोवर कॉम्प्लेक्स, कुसुमकुंज येथील विकासक व सहनिबंधकाच्या संगनमताने फसवणुकीची अनेक प्रकरणे झालेली आहेत हे खरे आहे काय आणि कामोठे येथील श्रीमती धनश्री लिमण यांनी विकलेल्या अनेक सदनिकांच्या प्रकरणांची शासन सखोल चौकशी करणार आहे काय ? याबाबत माझ्याकडे सर्व पुरावे आहेत.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा खरा आहे. श्रीमती लिमण यांनी सुरुवातीला हा फ्लॅट श्री.संदिप कर्णिक यांना विकला. त्यापूर्वी एक व्यवहार केलेला होता. त्यांना एनओसीही देण्यात आली होती. पण त्यांनी नंतर फक्त 6.50 लाख रुपये दिले होते. ते पैसे घेतल्यानंतर घरांच्या किंमती वाढू लागल्यानंतर हा फ्लॅट दुसऱ्या ग्राहकाला विकण्यात आला. त्यानंतर पुन्हा एनओसीबाबत तक्रार करण्यात आली. त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे पहिली एनओसी रद्द करण्यात आली. त्यानंतर हाच फ्लॅट 17.50 लाख रुपयांना विकला गेला. खरे तर याबाबत विभागाने ॲक्शन घ्यावयास पाहिजे होती ती घेतली गेली नाही हे खरे आहे. त्या महिलेने हा फ्लॅट तिसऱ्याच ग्राहकाला विकलेला आहे. तो ग्राहक सध्या तेथे रहात आहे. त्या ग्राहकाला त्या सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी सभासद सुध्दा केलेले आहे. त्यांना सभासद करुन घेतले असले तरी त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात येईल. त्या महिलेकडे श्री.कर्णिक यांचे 6.50 लाख रुपये आहेत. त्याबाबत कोर्ट मॅटर झालेले आहे. कोर्टामध्ये सुनावणी होणार आहे. त्यावेळी विभागाची भूमिका मांडण्यात येईल. या फ्लॅटचे 3-4 व्यवहार झालेले आहेत त्याची स्वतंत्रपणे चौकशी केली जाईल. या व्यवहारांमध्ये ज्यांचे पैसे गुंतले आहेत त्याबाबत विभाग गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करण्याचा प्रयत्न करील.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, त्या सहनिबंधकांनी या महिलेला पाठीशी घातलेले आहे हे पुराव्यानिशी सिध्द होत आहे. त्यांना शासन का पाठीशी घालत आहे, त्यांच्याविरुध्द शासन कारवाई का करीत नाही ? सहनिबंधक व या महिलेचे संगनमत आहे, ते दोघे अनेकांना फसवित आहेत.

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : कोणालाही पाठीशी घालण्याचे कारण नाही. वास्तविक पाहता त्यांचे अर्ज आल्यानंतर, त्याबाबतची तक्रार आल्यानंतर, त्या नंतरच्या तारखेची एनओसी देण्यात आली हे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. या सर्व बाबींची तपासणी केली जाईल, कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. जोपर्यंत हे व्यवहार क्लिअर होत नाही, तोपर्यंत ज्यांच्याकडे या फ्लॅटचा ताबा आहे त्यांची मेंबरशिपही राहणार नाही.

-----

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**आंतरराष्ट्रीय विमानतळावर बनावट पासपोर्ट व व्हीसा बाळगणाऱ्यांची संख्या देशात सर्वाधिक असल्याबाबत**

**(8) * 25474 श्री.जयवंतराव जाधव , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , ॲड.उषा दराडे , श्री.अनिल भोसले , श्री.संदिप बाजोरिया , श्री.किरण पावसकर , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली , डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बनावट पासपोर्ट व व्हीसा बाळगणाऱ्यांची संख्या देशात सर्वाधिक असल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, सदर चौकशी अहवालानुसार बनावट पासपोर्ट व व्हिसा तयार करण्यावर कोणती कारवाई केली तसेच प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये बनावट पासपोर्ट मिळालेले नाहीत असे नमूद केलेले आहे. याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असा मी दुसरा प्रश्न विचारला होता. त्याला प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर दिलेले आहे. याबाबत चौकशी केली नसेल तर मंत्री महोदयांनी बनावट पासपोर्ट मिळालेले नाहीत हे उत्तर कशाच्या आधारावर दिलेले आहे ? माझ्या माहितीनुसार मुंबईत 1611, दिल्लीमध्ये 1359, चेन्नईत 624, अमृतसरमध्ये 190 व कोलकातामध्ये 96 प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत. संबंधित प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाच्या सूत्रानुसार दर आठवड्याला बनावट पासपोर्टची किमान 5 प्रकरणे उघडकीस येतात असे समजलेले आहे. अशा प्रकरणांची गंभीरपणे चौकशी करुन याबाबत शासन काही ठोस पावले उचलणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बनावट पासपोर्ट व व्हिसा बाळगणाऱ्यांची संख्या देशात सर्वाधिक असल्याचे जानेवारी, 2012 मध्ये उघडकीस हे खरे आहे काय असा प्रश्न विचारला होता. त्याला 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. इमिग्रेशन विभागामार्फत पासपोर्टचे ऑन लाईन चेकिंग केले जाते. पासपोर्ट कार्यालयातून पासपोर्ट दिला जातो त्यावेळी त्या पासपोर्टची ऑन लाईन माहिति इमिग्रेशन विभागाला उपलब्ध असते. व्हिसाबाबत मॅग्नीफाईंग ग्लास किंवा अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या माध्यमातून त्याची तपासणी केली जाते. पासपोर्ट रिडिंग मशिन्सच्या माध्यमातून सुध्दा चेकिंग केले जाते.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25474 ..... श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील....

पुढे जाऊन शासन म्हणून या बाबतीत निश्चितपणे केंद्र शासनाला विनंती करणार आहोत की, व्हिसा दिल्यानतर त्याची ऑनलाईन माहिती सर्व आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळाली पाहिजे. कारण पूर्वीच्या काळामध्ये मुंबई किंवा इतर पाच सहा आंतरराष्ट्रीय विमानतळावरुनच प्रवासी येत जात असत. परंतु आता अनेक ठिकाणी याची उपलब्धता झालेली आहे. त्यामुळे ज्या व्यक्तीला व्हिसा दिला जातो त्याची ऑनलाईन माहिती विमानतळावर देखील उपलब्ध असावी जेणेकरुन इमिग्रेशनसाठी ती उपयुक्त ठरेल. या पध्दतीची विनंती केंद्र शासनाला करणार आहोत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, केवळ कोणी तरी स्वत:च्या वैयक्तिक फायद्यासाठी पासपोर्ट आणि व्हिसा तयार करतात एवढ्यापुरता हा विषय मर्यादित नाही. या संदर्भात सभागृहामध्ये माझी लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती आणि त्यावर गृह मंत्र्यांनी उत्तर दिले होते. संपूर्णपणे बनावट पासपोर्ट तयार करणे आणि त्यासाठी लागणारी परवानगी बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे येथे मिळवून देणे, त्यासाठी आताचे एटीएसचे अधिकारी आणि तेव्हाचे पोलीस अधिकारी श्री. रघुवंशी यांच्या खोट्या सह्या करणे, अशा प्रकारचे बनावट पासपोर्टचे मोठे रॅकेट उघडकीस आले होते. त्यामध्ये काही पोलीस सुध्दा सहभागी होते. अशाच पध्दतीने मुंबईला सुध्दा रॅकेट्स उघडकीस आलेली आहेत. या सगळ्या रॅकेट्समधील जे लोक आहेत ते जामिनावर सुटल्यानंतर काय करीत आहेत आणि त्यांचा यामध्ये काही संबंध आहे का याची तपासणी केली आहे का ? या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी प्रकाश टाकला तर बरे होईल.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मधल्या काळामध्ये ज्यावेळी असे प्रकार उघडकीस आले त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केलेली आहे. असे प्रकार भविष्य काळात ज्या ठिकाणी उघडकीस येतील किंवा होण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी या लोकांच्या पार्श्वभूमीची देखील निश्चितपणे तपासणी केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मध्यंतरी 'लोकमत' दैनिकामध्ये देखील अशा प्रकारची बातमी आली होती की, अशा प्रकारचे एक रॅकेट पकडण्यात आले. त्याचे पुढे काय झाले ? त्या रॅकेटमध्ये कोण सापडले ? बोगस व्हिसा देण्याबाबत तसेच बनावट पासपोर्ट तयार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 25474 ..... डॉ. दीपक सावंत ....

करण्याबाबत असे रॅकेट पकडले गेले होते. त्याचे नेमके पुढे काय झाले ? अंधेरी येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्समध्ये असे झाले होते..

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, याची माहिती घेण्यात येईल.

**सभापती** : याची माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : ठीक आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांचा सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, 2005-2006 या वर्षाचा अनुक्रमे विसावा, एकविसावा, बाविसावा व तेविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, या ठिकाणी 10-11 वर्षापूर्वीचे अहवाल सादर केले जातात. या बाबतीत आपण मागे आदेश दिले होते. भटक्या व विमुक्त जमातीसाठी काम करणारे हे महामंडळ आहे. त्या महामंडळाचे दहा वर्षापूर्वीचे अहवाल आता सादर केले जात आहेत. आपण अनेक वेळा निर्देश दिलेले आहेत की, हे अहवाल त्वरित सादर करावेत जेणेकरुन आपल्याला काही तरी चर्चा करता येईल, काही पाहता येईल. दहा वर्षापूर्वीचे अहवाल आता सादर होत आहेत त्यातून काय कळणार आहे ? आपण या बाबतीत निर्देश द्यावेत.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, अहवाल सादर करण्यामध्ये उशीर झालेला आहे परंतु आता या महामंडळाचे सन 2010-2011 पर्यंतचे इंटर्नल ऑडिट पूर्ण झालेले आहे आणि तो अहवाल डिसेंबर, 2012 पर्यंत सादर करु.

----

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील आता सभागृहात उपस्थित आहेत म्हणून एक माहिती विचारु इच्छितो. काल आम्ही दूरदर्शनवर पाहिले की, विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांची चौकशी करणार असे त्यांनी कॅग च्या अहवालाच्या संदर्भात सांगितले. कॅगचा अहवाल फोडला म्हणून सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांची चौकशी करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

**उप सभापती** : आपण हा विषय मध्येच कसा काय उपस्थित करीत आहात ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील सभागृहात उपस्थित आहेत म्हणून मी विचारत आहे. विधानसभेच्या सदस्यांनी हा अहवाल फोडला त्याची आम्ही चौकशी करु असे त्यांनी सांगितले. म्हणजे त्यांना काँग्रेसच्या लोकांनी अहवाल दिला का याची चौकशी होणार आहे का ? बाहेर तशी चर्चा आहे. सभापती महोदय, कॅगच्या अहवालात जे मंत्री सापडले त्याची चौकशी पोलिसांनी केली पाहिजे अशी लोकांची अपेक्षा आहे. ती चौकशी बाजूलाच राहिली आणि ज्यांनी चुकीचे काही तरी चालले आहे ते समोर आणण्याचा प्रयत्न केला त्यांची चौकशी करावयाची आहे की, त्यांना कोणी काँग्रेसवाल्यांनी अहवाल दिला याची चौकशी करावयाची आहे ? कारण सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांना रिपोर्ट दिला वगैरे आज वर्तमानपत्रात आले आहे. चौकशी कशाची होणार आहे ? ज्यांनी काही केले आहे त्यांची चौकशी करावयास पाहिजे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारलेला प्रश्न मला जरुर प्रेसच्या लोकांनी विचारला होता. त्याचे सगळे उत्तर सुध्दा मी दिले. खरे तर असे अहवाल लिक न होता सभागृहापुढे येणे आणि अशा अहवालाची सभागृहाला प्रथम माहिती होणे, हा सभागृहाचा हक्क आहे. हे अहवाल जर बाहेरच जात असतील, सगळ्या वर्तमानपत्रात येत असतील, त्यावर चर्चासत्रे होत असतील आणि नंतर सभागृहापुढे येणार असतील तर त्यामुळे सभागृहाच्या हक्कांची पायमल्ली होते, हे स्पष्ट आहे. अहवाल सभागृहामध्ये मांडण्यापूर्वीच लिक झाला त्याची तुम्ही चौकशी करणार का असा प्रश्न विचारण्यात आला त्यावर अहवाल लिक कोठून झाला, का झाला, कोणी केला याची जरुर आम्ही चौकशी करु असे उत्तर मी

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. आर. आर. पाटील ....

दिले. त्यानंतर त्यांनी मला दुसरा प्रश्न विचारला की, श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांनी हा अहवाल मांडला आणि ते बाहेर माध्यमांसमोर बोलले त्याची चौकशी करणार का ? मी सांगितले की, मी आपल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे की, अहवाल कोठून लिक झाला याची आम्ही चौकशी करु. मी इतकेच सांगितले.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये राज्य सहकारी बँकेच्या बाबतीत नाबार्डचा अहवाल, नाबार्डचे ऑडिट हे बँकेच्या बोर्डापुढे न येता त्याची या सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यावेळी राज्य शासनाने ही भूमिका का घेतली नाही ? त्या अहवालामध्ये चुकीचे आले होते की, श्री. जयंत प्र. पाटील यांनी 25 कोटीची गॅरंटी घेतली, अमुक गाड्या वापरल्या, राजयोगला एमएससी बँकेचा फायनान्स घेतला. राजयोगला आम्ही एमएससी बँकेत घेऊन गेलो. कारण बँकेमध्ये क्लायंटची गरज होती. त्यामुळे आमच्याकडून कर्ज घ्यावे म्हणून राजयोगच्या बाबतीत मी पुढाकार घेतला. त्यावर आपण त्यावेळी चर्चा केली. ती चर्चा कोणत्या कायद्याने या सभागृहात झाली ? त्या ठिकाणी नाबार्डने चुकीचे आक्षेप घेतले होते. या पध्दतीने जर सभागृहामध्ये चर्चा होणार असेल तर ते बरोबर नाही.

**उप सभापती** : अशा पध्दतीने मध्येच असे विषय काढल्यामुळे आपल्यामागे सभागृहाचे सगळे कामकाज फरफटत जाते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांना मी एक मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिली त्यानंतर हे सगळे असे होत आहे. यापुढे मी अशा कोणत्याही विषयाबाबत परवानगी देणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, एमएससी बँकेच्या बाबतीत....

**उप सभापती** : आता कॅगवर चर्चा चालू नाही. 16 एप्रिलला तो अहवाल मांडल्यानंतर त्यावर चर्चा होईल. त्यामुळे या बाबतीत मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची गरज नाही.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सर्व वर्तमानपत्रामध्ये बातम्या आलेल्या आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. यानंतर उर्वरित कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात येतील.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

( पुढे चालू )

श्री. राजेंद्र गावित ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दि खोका मेकींग अँड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन 2009-2010 व 2010-2011 या वर्षाचा अनुक्रमे सदतिसावा व अडतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 2006-2007, 2007-2008 व 2008-2009 या वर्षाचा अनुक्रमे सदतिसावा, अडतिसावा व एकोणचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन 2009-2010, 2010-2011 या वर्षाचा अनुक्रमे पंचविसावा व सव्विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने क्लिअरींग आणि फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळाचा सन 2005-2006 व 2006-2007 या वर्षाचा अनुक्रमे पंधरावा व सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ, मुंबई यांचा दिनांक 1 एप्रिल, 2008 ते 31 मार्च, 2009, 1 एप्रिल, 2009 ते 31 मार्च, 2010 या कालावधीचा अनुक्रमे छत्तिसावा व सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई यांचा सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचा अनुक्रमे अडतिसावा व एकोणचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्री. मोहन जोशी (समिती सदस्य) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे सदुसष्टाचा अहवाल सादर करतो.

सभापती महोदय, हा अहवाल सभागृहाला सादर करताना समितीच्या निदर्शनास आलेल्या पुढील महत्वाच्या शिफारशीचा उल्लेख मी आपल्या अनुमतीने करु इच्छितो.

माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिल्यानंतर 3 महिन्यात म्हणजे 90 दिवसाच्या आत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पाठविणे आवश्यक आहे व त्याची पूर्तता विहित मुदतीत करता न आल्यास त्यासाठी होणा-या विलंबाची कारणे समितीला कळविणे आवश्यक आहे. या बाबतीत समितीने आपल्या पूर्वीच्या अहवालात तीव्र भावना व्यक्त करुनही सदरहू अहवालातील बरीचशी आश्वासने विहित मुदतीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली नाहीत. या समितीला विलंबाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत ही बाब अतिशय गंभीर आहे. आश्वासनाच्या पूर्ततेसंदर्भात विभागांनी वेळीच कार्यवाही करावी म्हणून लक्ष घालण्याबाबत मुख्य सचिवांना कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही त्याची अंमलबजावणी केली जात नाही असे खेदाने नमूद करण्यात येत आहे. यापुढे विहित मुदतीत आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पाठविण्याबाबत सर्व विभागांनी दक्षता घ्यावी जेणेकरुन सभागृहाच्या कामकाजाला ख-या अर्थाने न्याय मिळू शकेल अशी समितीने अहवालामध्ये शिफारस केलेली आहे.

**उप सभापती** : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मी ठाणे महानगरपालिकेमधील मालमत्ता कराच्या संदर्भात या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंदर्भातील अहवाल दोन दिवसात सभागृहाला सादर करतो असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. तो अहवाल माननीय मंत्री महोदयांना सादर करण्यास सांगावा.

**उप सभापती** : नगर विकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांना सदर अहवाल आज संध्याकाळ पर्यन्त सभागृहाला सादर करण्यास सांगण्यात यावे.

श्री. आर.आर.पाटील : ठीक आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

नागपूर जलसंपदा विभागाअंतर्गत सन 2011-12 मध्ये आस्थापनेतील गट "क" व "ड" ची सरळसेवा पध्दतीने रिक्त पदे भरण्याची जाहिरात देण्यात येणे, परंतु सदर पदांची भरती प्रक्रियेची टेंडर कोणत्याही नामांकित वृत्तपत्रात न देता साप्ताहिक वृत्तपत्रात देण्यात येणे, त्याचे टेंडर कोणत्या कंपनीला दिले व कोणकोणत्या संस्थांनी निविदा भरल्या याची माहिती मिळण्याबाबत मा. सदस्य सचिव प्रादेशिक निवड मंडळ, नागपूर परिमंडळ पाटबंधारे विभाग, नागपूर यांना लोकप्रतिनिधी या नात्याने दिनांक 23.12.2011ला लेखी पत्र देवून माहिती मागितली असता संबंधित माहिती न पुरविण्यात येणे, सदर निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता, सदर प्रक्रियेचे टेंडर स्वत:च्या मर्जीतील कंपनीला देऊन रेट प्रक्रिया मोठी देऊन शासनाचे केलेले नुकसान, सदर निविदा प्रक्रियेची योग्य चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाने यावर करावयाची कारवाई.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती ही समाजातील अंधश्रद्धा व भोंदूगिरी नष्ट करण्याचा दावा वेळोवेळी करीत असते. काल पासून आझाद मैदानावर वारकरी संप्रदाय आणि हिंदुत्ववादी संघटनांनी धरणे आंदोलन सुरु केलेले आहे. अंधश्रध्दा व भोंदूगिरी करणारे जे लोक आहेत त्यांचा पर्दाफाश करण्यासाठी वारकरी संप्रदाय आणि इतर संघटनांच्या लोकांनी लाक्षणिक उपोषणाचा कार्यक्रम आझाद मैदानावर सुरु केलेला आहे. काही ठळक बाबी मी येथे मांडतो. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला 2006 ते 2008 या 2 वर्षात 16 लाख 96 हजार 978 रुपये विदेशातून मिळालेले आहेत. परंतु त्यांनी असा दावा केलेला आहे की त्यांना असे काही विदेशातून पैसे मिळालेले नाहीत. तसेच 1 कोटी 37 लाखाहून अधिक निधी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जनतेकडून न्यासात जमा केलेला आहे. असे असतानाही नियमाप्रमाणे दरवर्षी सादर करावयाचे लेखापरीक्षण मात्र अनेक वर्षात केले गेले नाही. प्रत्येक धर्मादाय संस्थेला 2 टक्के अंशदान धर्मादाय आयुक्तांना देणे बंधनकारक असताना 31 वर्षात अशा प्रकारचे अंशदान एकदाही दिले गेले नाही. जवळ जवळ 21 वर्षापासून अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रे या समितीच्या मुखपत्राने 2004 ते 2010 पर्यन्त वृत्तपत्र नोंदणी कार्यालयाकडे एकदाही वार्षिक अहवाल सादर केलेला नाही. या औचित्याच्या मुद्याद्वारे या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी होऊन कारवाई झाली पाहिजे अशी आझाद मैदानावर लाक्षणिक उपोषणास बसलेल्या वारकरी संप्रदाय आणि हिंदुत्ववादी संघटनेच्या लोकांची मागणी आहे. ही त्यांची मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सरकारला देत आहे.

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे हे मागासलेले आदिवासी बहुल नक्षलग्रस्त जिल्हे म्हणून ओळखले जाणे, सदर जिल्ह्यात पाहिजे त्या प्रमाणात उद्योगधंदे नसणे, जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यांना कामधंदा नसल्यामुळे बरेच विद्यार्थी रोजगारापासून वंचित असणे, दोन्ही जिल्ह्यात शासकीय व निमशासकीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असणे, रिक्त पदे भरली जात असताना सदर जिल्ह्यात बाहेर जिल्ह्यातील मुले मोठ्या प्रमाणात भरती होणे, त्यामुळे सदर दोन्ही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागणे, त्यामुळे नक्षलवाद्यांमध्ये भरती होण्याचे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असलेली विचारसरणी, त्यामुळे गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील भरती करताना स्थानिक जिल्ह्यातीलच मुलांची भरती होण्याची अत्यंत आवश्यकता, शासनाने यावर तातडीने आदेश काढण्यासंबंधी करावयाची कारवाई. सदर विषय हा नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या हिताचा असल्याने मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

चेंबूर (मुंबई) येथील संत एकनाथ या शासकीय वसतिगृहात राहाणा-या विद्यार्थ्यांसाठी देण्यात आलेल्या भाजीत अळी, किडलेल्या चण्यांची आमटी त्याच प्रमाणे शाकाहारी जेवणात मटणाचे तुकडे आढळून येणे, विद्यार्थ्यांसाठी शौचालयातील पाण्याचा पिण्यासाठी वापर करण्यात येणे, या वसतिगृहात 150 विद्यार्थी असून त्यांना जेवणासाठी फक्त 30 ताटे व चारच खुर्च्या असणे, यामुळे अनेक विद्यार्थ्यांना जेवण वेळेवर मिळत नसणे, वसतिगृहाची नियमित साफसफाई करण्यात न आल्यामुळे सर्वत्र अस्वच्छता पसरली असल्याचे आढळून येणे, वसतिगृहात सुविधांच्या उणिवा असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला असणे, याबाबत समाजकल्याण विभागाने कारवाई करण्यामध्ये दुर्लक्ष व टाळाटाळ केली आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक, चादरी, औषधे व स्टेशनरी या सामानाचे अद्याप वाटप करण्यात न येणे, वर्ष संपत आले तरी पुस्तकांचे वाटप न होणे, यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे वसतिगृहात पूर्णवेळ गृहप्रमुख, गृहपाल नसल्यामुळे विद्यार्थ्यांवर नियंत्रण रहात नसणे, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब या प्रकरणी सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतिचे जेवण देण्याबाबत व त्यांना त्यांच्या मूलभूत सुविधा त्वरित पुरविण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

----

...7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

औंध जिल्हा रुग्णालयात मागील अनेक वर्षापासून स्त्रीरोग, अस्थिरोग, बालरोग, भूलतज्ज्ञ व इतर विशेषज्ञ यांची पदे रिक्त आहेत. ही पदे त्वरित भरावित यासाठी राज्य शासनाकडे वारंवार मागणी करुनही राज्य शासनाने यावर काहीही कार्यवाही केलेली नाही. पुणे परिसरात सद्या सुरु असलेल्या स्वाईन फ्ल्यू सारख्या साथीच्या रोगाच्या पार्श्वभूमीवर या रुग्णालयात आजही 30 वर्षापूर्वी सारखी नादुरुस्त असणारी सोनोग्राफी मशिन वापरली जाते. एवढेच नाही तर या जिल्हा रुग्णालयाला एक्स-रे मशिन नाही. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आमदारांसमवेत बैठक घेतली. परंतु अद्याप रुग्णालयाच्या प्रश्नांची शासनाने दखल घेतलेली दिसत नाही. तेव्हा औंधच्या जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरुन नवीन एक्स-रे, सोनोग्राफी मशिन तातडीने बसविण्यात यावीत अशी या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाकडे मागणी करीत आहे.

----

...नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, सन 2010-11 या आर्थिक वर्षानुसार एमसीए च्या तिजोरीत 31 कोटी रुपयांची शिल्लक असून देणी मात्र 101 कोटीच्या घरात गेली आहे. तसेच सन 2011 साली झालेल्या विश्वचषक स्पर्धेसाठी वानखेडे स्टेडियमच्या नुतनीकरणासाठी सुमारे 250 कोटी रुपये खर्च अपेक्षित असतानासदर खर्च 350 कोटीच्या आसपास झालेला आहे. त्यातच अनेक ठिकाणी स्टेडीयमचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. त्यानुसार दि. 31 मार्च, 2011 पर्यंतची देणी म्हणजे मुंबई क्रिकेट असोशिएशनकडे पोलीस बंदोबस्ताची रु. 2.65 कोटीची रक्कम येणे आहे अशा प्रकारे जवळपास 350 कोटीची रक्कम देणे आहे. त्यात वीज बिलाची 1.13 कोटी, आर्किटेक्ट फी 3.12 कोटी, बजाज इलेक्ट्रीकल्स 54 लाख, लार्सन अँड टुब्रो 41 कोटी, सिस्टमरेक्स 1.13 कोटी, पोलीस बंदोबस्त 2.65 लाख, भाडे 37 लाख, आयकर 51.20 कोटी, नित्य जबाबदारी 35 कोटी अशी एकूण 100 कोटी 78 लाखाची देयके प्रलंबित आहेत. तसेच ही देणी देण्याच्या दृष्टीने मुंबई क्रिकेट संघटना अडचणीत आली आहे. तरी अडचणीत आलेल्या या मुंबई क्रिकेट संघटनेला पर्याय शोधण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे असा प्रश्न या औचित्याच्या माध्यमातून मी उपस्थित करीत आहे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, याबाबतीत ज्या देय रकमा आहेत, ज्या कायद्याप्रमाणे दिल्या पाहिजेत त्या कोणत्याही परिस्थितीत वसुलच करणार. किमान गृह खात्याच्या बाबतीत काही गोष्टी माझ्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. आपण त्या ग्राऊंडवर बंदोबस्त केला त्याचे पैसे मागणे ठीक आहे पण ट्रॅफिकसाठी जो बंदोबस्त केला त्याचेही पैसे लावलेले आहेत, घरातून माणूस मॅच बघायला गेला तर त्याला संरक्षण देण्याच्या दृष्टीने स्टाफ अरेंज केला त्याचेही पैसे मिळाले पाहिजेत, अशा काही रकमा असून या संदर्भात योग्य तो मार्ग काढला जाईल व शासनाचे जेवढे मनुष्यबळ लागले ते पैसे वसूल केले जातील.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, याच अधिवेशनाच्या सुरुवातीच्या काळात आपण क्रिकेटमध्ये 100 शतकांचे शतक पूर्ण केल्याबद्दल सचिन तेंडुलकरचे अभिनंदन करण्याचा ठराव मंजूर केला. त्याचबरोबर टेनिस या खेळात एका भारतीयाने अशी उत्तुंग कामगिरी केली आहे त्या लिंयांडर पेसने आंतरराष्ट्रीय पातळीवरील 50 ग्रॅसलँड पारितोषिक मिळविले त्याचेही अभिनंदन सभागृहाने करावे असे या औचित्याच्या माध्यमातून मी मांडू इच्छितो.

-------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"अंबेजोगाई, जि. बीड ही आद्यकवी मुकुंदराज यांची कर्मभूमी आहे. मराठी भाषेची उत्पत्ती ते पहिले कवी-कवियित्री बीड जिल्ह्यात झाले. मराठी भाषेचा दुसरा शीलालेख याच जिल्ह्यात सापडला. ज्ञानेश्वरीची सर्वात प्राचीन प्रत बीडच्या पटांगणावर आजही उपलब्ध आहे. शून्याचा शोध घेणारे थोर गणिती भास्कराचार्यही याच जिल्ह्यातील आहेत, त्याचबरोबर पहिली कवयित्री महदंबा गुरुगिता याच जिल्ह्यातील असून साहजिक इतिहास, साहित्य व धार्मिक संस्कृतीचा सुयोग्य मिलाप या जिल्ह्यात झाला. जिल्ह्यास समृध्द वारसा असल्याने अंबेजोगाई शहरात आद्यकवी मुकुंदराज यांच्या नावाने मराठी विद्यापीठ सुरु करण्याची मागील पाच वर्षांपासून सातत्याने मागणी होत आहे, इतर भाषांचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन झाले असताना मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ का असू नये, त्यामुळे अंबेजोगाई येथे आद्यकवी मुकुंदराव यांच्या नावे मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन करावे, अशी मागणी मी या औचित्याच्या माध्यमातून करीत आहे."

-------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा मुद्दा मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मांडत आहे.

"जसजशी कुटुंबे वाढतात तसतसे शेतीचे विभाजन अवघड होत चालले आहे, त्यासंदर्भात नवीन नियमाप्रमाणे बागायती 11 गुंठे आणि जिराईत 20 गुंठे जमीन असेल तर त्याचे विभाजन होत नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणात या विभाजनाच्या बाबतीत अडचणी निर्माण झाल्या आहेत. या निमित्ताने माझी मागणी आहे की, पूर्वी राज्यात लागू असलेले जमीन धारणा कलम 85 पुन्हा लागू करावे.

-------

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, " दि. 22.2.2009 रोजी चासकमान ग्रामपंचायत, ता. खेड, जि. पुणे यांनी ग्रामसभेचे आयोजन करुन त्यात गावातील 965 महिला मतदारांपैकी 595 महिलांनी गावात संपूर्ण दारुबंदीच्या बाजूने मतदान केले. तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतुदीनुसार मतदान केले, एकाही महिलेने दारुबंदीच्या विरोधात मतदान केले नाही. यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त व मा. उपायुक्त, पुणे यांना पत्राने कळवून राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक, तळेगांव-दाभाडे विभाग, पुणे यांना मद्यविक्री बंदीचे आदेश दिले. परंतु 24 मे, 2011 मध्ये राज्य उत्पादन शुल्क मंत्री मा. ना. श्री. गणेश नाईक यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले आदेश रद्द करुन या हॉटेल मालक व मद्यविक्री मालक आशा चासकर यांनी केलेल्या अर्जावर सर्वानुमते घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात पुन्हा फेर मतदान घेण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले होते. परंतु त्यानंतर गावातील महिला व इतर ग्रामस्थ यांनी दि. 8.11.2011 मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल करणे, या याचिकेवर न्यायालयाने मा. राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री. गणेश नाईक यांच्या दिलेल्या आदेशाला स्थगिती देऊन गावातील महिलांचे म्हणणे ऐकून घेऊनच याबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात यावा, अन्यथा यावर फेरमतदान घेऊ नये, असा आदेश देण्यात येणे, परंतु तरीही राज्य उत्पादन शुल्क मंत्रालयाने 27 मार्च, 2012 च्या दिलेल्या आदेशात गावात दोन आठवड्यात फेर मतदान घ्यावे, असा काढलेला आदेश, परिणामी गावातील महिला व ग्रामस्थ यांच्यामध्ये दारुच्या विरोधात असलेला प्रचंड असंतोष व गांभीर्य लक्षात घेता सन 2009 मध्ये ग्रामसभेने महिलांनी मतदानाने दिलेला कौल हा दारुच्या विरोधातील कौल आहे, हे जाणून राज्य उत्पादन शुल्क मंत्रालयाने आपला आदेश त्वरित रद्द करावा, अन्यथा गावातील महिला व ग्रामस्थ यांनी तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, याकरिता शासनाने सदरहू दिलेला आदेश रद्द करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने याबाबत तत्काळ निवेदन करावे."

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"रेडी गावात गोगटे मिनरल्सतर्फे चालविल्या जाणाऱ्या आयएलपीएल कंपनीच्या खनिज प्रकल्पात अनिर्बंध खनिज उत्खनन सुरु असून आयबीएन चे सर्व नियम धाब्यावर बसवून, सर्व नियमांचे उल्लंघन करुन खनिज उत्खनन करण्यास सुरुवात केली. या कंपनीने समुद्र सपाटीपेक्षा सुमारे 20 मीटर खोल खनिज उत्खनन सुरु केले. समुद्र सपाटीपासून हे अंतर 500ते 600 मीटर आहे. हे उत्खनन आणखी खोल गेल्यास 11 एप्रिल रोजी कनयाळ आणि इंडोनेशिया मध्ये जो प्रकार घडला त्याप्रमाणे समुद्राचे पाणी खाणीत घुसुन गावात अघटित घटना घडण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. खोल उत्खनन करुन पाण्याची पातळी नष्ट झाली असून ग्रामस्थांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

"सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा असून या जिल्ह्यात शेजारील गोवा राज्यातून अनेक पर्यटक येत असतात, मात्र गोव्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या वाहनांना महिन्याला रु. 2800 पर्यटन कर भरावा लागणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

-----

.......7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील दुसरा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. :--

"इको सेन्सेटीव्ह झोन करण्यासंदर्भात डॉ. माधवराव गाडगीळ यांच्या एक स्तरीय समितीने पश्चिम घाटामध्ये येणाऱ्या जिल्ह्यांचा दौरा केला असता त्यांनी सिंधुदुर्गामध्ये यापुढे कुठलेही नवीन बांधकाम, जेटी, पोर्ट, खाण व्यवसाय, वाळू व्यवसाय न करण्याच्या सूचना केल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून केंद्र सरकारने घोषित केलेला आहे. नवीन उद्योग येऊ घातलेले आहेत तरी सदरचा इको सेन्सेटीव्ह झोन होऊ नये म्हणून पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा नियोजन समिती, जिल्ह्यातील काही ग्राम पंचायतींनी ठराव केलेले आहेत, याबाबत शासनाने विरोध करुन गाडगीळ समितीचा हा अहवाल फेटाळण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्याची आवश्यकता"

-------

यानंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री. दिनकर रामदास बिऱ्हाडे यांची भविष्य निर्वाह निधीची फाईल सापडत नसल्यामुळे त्यांची 5 वर्षापासून पेन्शन रखडवण्यात आलेली आहे. निवृत्त झालेल्या ज्येष्ठ नागरिकाला उतार वयात त्याच्या हक्काच्या भविष्य निर्वाह निधीचा आधार असतो. पण सरकारी लाल फितीच्या बेजबादार व गलथान कारभारामुळे श्री. बिऱ्हाडे यांना 5 वर्षापासून पेन्शन मिळालेले नाही. हा विषय केंद्राच्या अखत्यारीतील असला तरी हा मुंबईचा नागरिक आहे. अन्न महामंडळात श्री. दिनकर बिऱ्हाडे नोकरीत होते. श्री. दिनकर बिऱ्हाडे हे सन 2007 मध्ये सेवानिवृत्त झाले असून त्यांना आजतागायत पेन्शन मिळालेले नाही. सदर व्यक्तीची सन 2009 पासून भविष्य निर्वाह निधीची फाईल सापडत नाही. सदर व्यक्तीने या विषयाच्या संदर्भात आपल्याला सुध्दा पत्र दिले होते.

श्री. बिऱ्हाडे सन 2007 साली सेवानिवृतत झाल्यानंतर त्यांना लगेच या योजनेनेच पेन्शन लागू होणे अपेक्षित होते. परंतु त्यांना त्यासाठी भविष्य निर्वाह निधी कार्यालयात पाठपुरावा करावा लागला. दिल्लीच्या कार्यालयातून त्यांची फाईल ठाण्याच्या कार्यालयाला पाठविण्यात आली व 15 एप्रिल, 2009 रोजी ठाण्याहून ही फाईल कांदिवली कार्यालयात पाठविण्यात आली. आपल्या हक्काचे पैसे मिळतील असे त्यांना वाटले होते. परंतु श्री. बिऱ्हाडे यांना आजतागायत पेन्शन मिळालेली नाही. या विषयाच्या संदर्भात आपण लक्ष घालून श्री. दिनकर बिऱ्हाडे यांना पेन्शन मिळवून द्यावे अशी मी औचित्याच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

शाळांच्या परीक्षा संपल्या असून सर्व विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी लागली आहे. शहरी भागातील बहुसंख्य विद्यार्थी आपल्या आई-वडिलांना, आजी-आजोबांना भेटण्यासाठी मूळ गावी जात आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामडळाकडून या विद्यार्थ्यांना शाळेचा दाखला असल्यास प्रवास भाडयात 50 टक्के सवलत मिळते. परंतु या वर्षापासून 50 टक्क्याची सवलत बंद करण्यात आलेली आहे.

सद्या विद्यार्थी गावी जाण्यासाठी महामंळाच्या कार्यालयात गेल्यानंतर गावी राहणाऱ्या आई-वडिलांची शिधा पत्रिका सादर केल्याशिवाय सवलत दिली जात नाही. गरीब मुलांना नाहक त्रास दिला जात असून त्यांना सवलतीपासून वंचित ठेवले जात आहे. गावी जाण्यासाठी पूर्वी जी 50 टक्क्याची सवलत दिली जात होती ती तशीच सुरु ठेवण्यात यावी. ही जाचक अट रद्द करुन विद्यार्थ्यांना प्रवास भाडयात सवलत मिळण्याबाबत कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

**उप सभापती** : विद्यार्थ्यांना आता सुट्ट्या लागल्या असून सर्व विद्यार्थी त्यांच्या आई-वडिलांना भेटण्यासाठी गावी जात असतात. असे असतांना त्यांच्या आई-वडिलांचे रेशन कार्ड आणा अशी जी अट टाकण्यात आलेली आहे ती बरोबर नाही. विद्यार्थ्यांना सुट्टीचा आनंद उपभोगू द्या.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुराणवस्तू संशोधन खात्याने रायगड किल्ल्यावरील हत्तीखान्यात कार्यालय उघडले आहे. पुराणवस्तू संशोधन खात्याने रायगड किल्ल्यावर टॉयलेट व टॉयलेटची टाकी सुध्दा बांधलेली आहे. रायगडमध्ये एखादा दगड जरी बाजुला करावयाचा असेल तर पुराणवस्तू संशोधन खाते परवानगी देत नाही. पुराणवस्तू संशोधन खात्याचे अधिकारी श्री. देवेंद्र विभाडे यांनी रायगड किल्ल्यावरील हत्तीखान्यामधील दगड बाजूला करुन टॉयलेट बांधलेले आहे. ज्या अधिका-याने रायगड किल्ल्यावरील हत्तीखान्यात कार्यालय बांधले, टॉयलेट बांधले आहे तसेच शिवकालीन बांधकाम देखील तोडलेले आहे. या प्रकारामुळे रायगड व रायगडच्या संपूर्ण परिसरात असंतोष पसरला आहे.त्यामुळे सदर अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे या औचित्याच्या मुद्याची गंभीर दखल घ्यावी अशी मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मागणी करीत आहे.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मराठी माध्यमांच्या हजारो शाळा सुरु आहेत. या शाळांमध्ये उत्तम प्रकारचे शैक्षणिक कार्य केले जात असते. गोरगरीब हरिजनांची मुले या शाळेत शिक्षण घेत असतात. परंतु दुर्दैवाने प्रसार माध्यमांकडून या शाळांवर कमालीची टीका केली जाते. कायम विना अनुदान तत्वावरील इंग्रजी माध्यमांच्या ज्या शाळा आहेत त्या आपल्या जाहिराती व्यापारी पध्दतीने करीत आहेत. मराठी माध्यमातून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. माझा मुलगा मराठी माध्यमाच्या शाळेत गेल्यावर त्याचे अहित होईल असे पालकांना वाटू लागते व त्यामुळे पालकांवर आपल्या मुलांना इंग्रजी शाळेमध्ये टाकावे यासाठी दबाव येतो. मी औचित्याच्या मुद्यामार्फत शासनाला अशी विनंती करतो की, तंटा मुक्ती योजनेला तसेच निर्मल ग्राम योजनेला शासनाच्या प्रसिध्दी विभागाच्या माध्यमातून जाहिरात दिली जाते तशी शासनाच्या अनुदानावर सुरु असलेल्या मराठी माध्यमांच्या शाळेची वैशिष्टये जाहिरातीच्या माध्यमातून राबविण्यात यावी अशी मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

-------

**उप सभापती** : श्री. अनिल देसाई, हे खासदार म्हणून निवडून आल्याबद्दल त्यांनी स्नेह भोजनाची व्यवस्था शेजारच्या महिला विकास मंडळात केलेली आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल. दुपारी 1.45 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 1.08 ते 1.45 पर्यंत स्थगित झाली. )

----

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: मुंबई वीज शुल्क (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. IV OF 2012.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ELECTRICITY DUTY ACT, 1958.)

श्री.राजेंद्र मुळक (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 4 - मुंबई वीज शुल्क अधिनियम 1957 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक - 4 मुंबई वीज शुल्क अधिनियम 1957 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई वीज शुल्क सुधारणा विधेयक आणले आहे. विद्युत अधिनियम 2003 अनुसार दराची वर्गवारी करण्याचे अधिकार एमइआरसीला आहेत. कॅप्टीव्ही कन्झमशन करणारे जे उपभोक्ते आहेत म्हणजे ज्यांना स्वत: वीज निर्मिती करायची आहे आणि त्याचा वापर स्वत:साठी करावयाचा आहे अशा कॅप्टीव्ह कन्झमशन करणाऱ्या कन्झ्युमरसाठी एक सिलिंग लिमिट आहे. ती 40 पैसे पर युनिट अशा प्रकारची आहे. आपण आकारण 30 पैसे पर युनिट करतो. त्यात आता वाढ करून दीड रूपये करावयाची आहे. त्यामुळे सिलिंग लिमिट दीड रूपये होणार आहे. त्या संबंधातील हे सुधारणा विधेयक आहे. ते सभागृहाने संमत करावे अशी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी कॅप्टीव्ह वीज निर्मितीवर कर लावणार असे सांगितले आहे. महाराष्ट्रामध्ये आता सगळेच कॅप्टीव्ह आहेत. एमएसइबी या कंपनीच्या आपण तीन कंपन्या केल्या आहेत. निर्मिती, पारेषण आणि वितरण असे तीन भाग करून आपण तीन स्वतंत्र कंपन्या केल्या आहेत. त्या कंपन्यांवर महाराष्ट्र शासनाच्या वतीने एक एम.डी.दिला जातो. बाकी त्यांचा स्वतंत्र कारभार आहे. सरकारच्या माध्यमातून या कंपनीला सवलती दिल्या जातात असे सांगितले जाते. त्या कंपनीला पैसे द्यावे लागतात. यात 51 टक्के आपला हिस्सा आहे. त्या कंपनीवर आपला एम.डी. असला तरी ते सांगातात की, त्या कंपनीवर आपला अधिकार शून्य आहे. ह्या महाराष्ट्रामध्ये जी वीज निर्मिती होते ती कॅप्टीव्ह आहे. जैतापूर प्रकल्प देखील कॅप्टीव्ह आहे. त्यावर देखील मी बोलणार आहे. आज आपण 40 पैशा प्रमाणे शुल्क घेत आहोत. ते 1 रूपया 50 पैसे करीत आहात. म्हणजे ही जी करवाढ आहे ती जवळ जवळ चार पट आहे. मग आता किती उत्पन्न येत आहे. त्या उत्पन्नात किती वाढ होणार आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. माननीय वित्त राज्य मंत्र्यांकडेच ऊर्जा खाते देखील आहे. माझ्याकडे अर्थसंकल्प भाग-2 आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील जनतेवर कोणकोणते कर लावणार, काय सूट देणार हे अंतर्भूत असते. मी संपूर्ण अर्थसंकल्प वाचला. पण त्यात 40 पैशाचे शुल्क 1 रूपया 50 पैसे करीत असल्याचा उल्लेख मला कुठेही सापडला नाही. तो दाखवला तर मला आनंद होईल. यामध्ये मला काय सापडले ? पान क्रमांक 7 वर क्र.32 वर प्रलंबित विद्युत शुल्कासाठी अभय योजना हे सापडले. त्यात आपण म्हटले आहे की, "विद्युत शुल्कापोटी राज्य शासनाची जुनी थकबाकी मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहे. यापैकी बऱ्याच थकबाकीबाबत न्यायालयात वाद चालू आहेत. हे वाद संपावेत व शासकीय महसूलाची सत्वर वसुली व्हावी म्हणून मी एक अभय योजना जाहीर करीत आहे." म्हणजे ती या शुल्काच्या संदर्भात आहे. या योजने अंतर्गत दिनांक 31 डिसेंबर 2011 पर्यंत प्रलंबित असलेल्या विद्युत शुल्काचा थकबाकीदारांनी एक रकमी भरणा केला तर त्या पोटी देय असणाऱ्या व्याजात त्यांना 50 टक्के सूट देण्याचे प्रस्तावित केले आहे. या योजनेचा कालावधी दिनांक 1 एप्रिल 2012 ते 30 जून 2012 असा असेल व संबंधितांनी या योजने अंतर्गत अर्ज सादर करताना न्यायालयातील प्रलंबित प्रकरण मागे घेणे आवश्यक आहे.

..3

श्री.दिवाकर रावते....

याचा अर्थ 40 पैशा प्रमाणे शुल्क भरले नाही आम्ही एवढेच युनिट निर्माण केले, तुम्ही आम्हाला चुकीचे शुल्क आकारले असे दावे असणार. त्यामुळेच आपल्या अर्थसंकल्पाला ना आगा ना पीछा होता.

खालच्या सभागृहात मागण्यावर चर्चा असताना भरपूर काही सांगता येते. पण येथे तशी चर्चा होत नाही. आपण जो वेळ देता त्यामध्येच आम्ही आमचे विचार मांडत असतो. गेल्या 12 वर्षात ना आगा ना पीछा असलेला अर्थसंकल्प मी पहिल्यांदाच बघतो आहे. त्यासाठी मी दोषही देणार नाही. मारून मुटकून अर्थ संकल्प सादर करण्यासंबंधातील राज्याची स्थिती आहे. ओढून ताणून हा अर्थसंकल्प मांडला आहे. एका महिन्याचा पगार आला नाही तर गृहीणी आपला संसार कसा ओढूनताणून चालवते तशी आपल्या राज्याची परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्याला हे सर्व करावे लागते. असे जरी असले तरी या अर्थसंकल्पात कुठेही सुस्पष्टता नव्हती. आम्ही तरतूद करणार आहोत, तरतूद केली जाणार आहे असे सांगितले. परंतु, प्रत्यक्षात किती तरतूद करणार आहात ते सांगितलेले नाही. अशा अनेक गोष्टी आहेत. त्यात मी जाणार नाही. मी अर्थसंकल्पामध्ये जाणार नाही. आपण अर्थसंकल्पात असेही नमूद केले आहे की, 600 कोटी रूपयांचा अतिरिक्त महसूल या कराच्या माध्यमातून प्राप्त होणार आहे. त्यामध्ये 40 पैशाचे किती कोटी रूपयांचे दावे प्रलंबित आहेत हे सांगितले नाही व किती दाव्यांचे व्याज माफ केले हे सांगितले नाही. हे सर्व मी अर्थसंकल्पामध्ये शोधायचा प्रयत्न केला. आपले 43 क्रमांकाचे वीज, कर आणि शुल्क असे शीर्षक आहे. यामध्ये लिहिलेले आहे विजेचा वापर, विक्री कर या वरील कर. ह्याचे उत्पन्न 4693 कोटी 23 लाख 40 हजार दाखविले आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, या ठिकाणी उत्पन्न किती दाखविले आहे? या ठिकाणी हजारामध्ये आकडे दाखविले आहेत ते मी आपल्याला वाचून दाखवितो. आपल्याला या करापासून 104 कोटी 35 लाख 62 हजार रुपये उत्पन्न मिळणार आहेत. सिनेमा निरीक्षण फी 42 लाख आणि इतर जमा 11 कोटी 92 लाख 37 हजार रुपये आहेत. एकूण विजेच्या माध्यमातून शासनाला 4 हजार 809 कोटी 93 लाख 39 हजार एवढे उत्पन्न मिळते. यामधून आपल्याला कोणतेही मार्गदर्शन होऊ शकले नाही. या मध्ये 40 पैशाप्रमाणे किती उत्पन्न मिळेल? 40 पैशाचे 1.50 पैसे केल्यानंतर व चार पटीने वाढल्यानंतर उत्पन्न किती वाढेल? अर्थसंकल्पामध्ये हे दडवून ठेवण्यात आले असल्यामुळे ते घटनाबाह्य आहे. हे 600 कोटी रुपये कसे येणार आहेत हे आपण आम्हाला भाग 2 मध्ये सांगितले आहे. यामध्ये माफीचा क्लॉज टाकल्यामुळे किती कर माफ होईल, याचा अंदाज घेतल्यानंतर हे 600 कोटी रुपये मिळणार आहेत. अशा पध्दतीने कर वाढ केल्यानंतर आपणास किती उत्पन्न मिळणार आहे या बाबत आपणाकडून मला मार्गदर्शन होऊ शकले नाही. हे विधेयक मी पुन्हा पुन्हा वाचले तरी मला त्याबाबत मार्गदर्शन होऊ शकले नाही. या पुस्तिकेमध्ये दर वाढीचा प्रस्ताव आपण व्यवस्थितपणे मांडला नसेल तर आपण मांडलेला अर्थसंकल्प हा बेकायदा ठरतो. तर मग या विधेयकात उल्लेख केल्यामुळे आणि हे विधेयक संमत होणारच आहे, त्यामुळे त्याचा परिणाम आपोआप होणार आहे असे आपण समजता काय? तुम्ही तर या विधेयकाच्या संदर्भातील अध्यादेश अगोदरच प्रसिध्द केला आहे. त्यामुळे आपण या कायद्याची अगोदरच अंमलबजावणी सुरु केली आहे. परंतु अर्थसंकल्पामध्ये ही गोष्ट नमूद होण्याची आवश्यकता होती, ती कां आली नाही हे मात्र मला समजू शकलेले नाही? ही बाब माझ्या दृष्टीने अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे काल या सभागृहामध्ये मांडलेला आणि मंजूर झालेला अर्थसंकल्पच मुळात बेकायदेशीर ठरु शकतो. माझे म्हणणे बरोबर आहे काय? या बाबत तुमच्याकडून मी खुलाशाची अपेक्षा करतो.

या विद्युत कराच्या माध्यमातून या सरकारला 4 हजार 809 कोटी 93 लाख 39 हजार एवढे उत्पन्न मिळते त्यामध्ये 40 पैशावरुन 1.50 पैसे वाढ झाल्यानंतर या उत्पन्नामध्ये किती कोटींची वाढ होणार आहे हे मी समजू शकत नाही. परंतु ती यामध्ये असू शकत नाही असे माझे ठाम मत आहे. सन 2010-11 मध्ये 4 हजार 588 कोटी 1 लक्ष 57 हजार एवढी रक्कम होती ती सन 2011-12



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मध्ये कमी होऊन 4 हजार 300 कोटी 99 लक्ष 51 हजार झाली. याचे कारण वीज निर्मिती घटल्यामुळे आणि राज्यामध्ये लोडशेडींग असल्यामुळे आपल्याकडे येणारे उत्पन्न कमी झाले. त्यानंतर सन 2011-12 च्या सुधारीत प्रस्तावामध्ये आपण तेवढीच रक्कम ठेवली. आपण नेहमी दहा टक्के वाढ करीत असतो. त्याप्रमाणे होणारी वाढ ही 4 लक्ष 4 हजार 693 कोटी 23 लक्ष 40 हजार इतकी आपण या ठिकाणी दाखविली आहे. त्यामुळे या कायद्यामुळे वाढणारी रक्कम या ठिकाणी दाखविण्यात आली नाही असा माझा दावा आहे. जर ही वाढ होणार असेल तर ती या ठिकाणी दिसायला हवी होती. या बाबत मंत्री महोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे. ती वाढ होणार असेल तर आपण सादर केलेला अर्थसंकल्प हा घटनाबाह्य आहे, अयोग्य आहे, या सदनाचा अवमान करणारा आहे. या सभागृहाने जर चुकीचा अर्थसंकल्प मंजूर केला असेल तर अत्यंत घातक अशी परिस्थिती निर्माण झाली आहे असे मला म्हणावेसे वाटते. मी या ठिकाणी मांडलेली बाब सत्य असेल तर ती आपल्या दृष्टीने फार गंभीर अशी आहे. या अर्थसंकल्पामध्ये तसे कुठे मला सापडत नसल्यामुळे मी मांडलेली बाब सत्य असावी असे मला वाटते.

सभापती महोदय, मी आता या विधेयकाच्या मसुद्याकडे येतो. हा विषय ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संबंधित आहे, अर्थ खात्याशी संबंधित नाही. मी या ठिकाणी इंग्रजी विधेयकाची प्रत मुद्दाम मागून घेतली आहे. हा विषय वारंवार उपस्थित केल्यानंतर सुध्दा पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी परिस्थिती आहे. या विधेयकाच्या शीर्षकामध्ये "बॉम्बे इलेक्ट्रिकल डयुटी ॲक्ट" असे म्हटले आहे. या सदनामध्ये माननीय मंत्र्यांनी सहा महिन्याच्या आत सर्वच्या सर्व कायद्यांच्या शीर्षकामध्ये आपण बदल करु असा आपल्याला शब्द दिला होता. ज्या ठिकाणी "बॉम्बे" आहे त्या ठिकाणी "मुंबई" करु आणि ज्या ठिकाणी गरज असेल त्या ठिकाणी "महाराष्ट्र" असा बदल करु असे सांगितल्यानंतर इंग्रजीमध्ये पुन्हा तेच शब्द ठेवण्यात आले आहेत. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, आपले नाव मराठीमध्ये आणि इंग्रजीमध्ये वेगवेगळे होते काय, ते बदलते काय? आपले नामकरण जरी झाले असले तरी आपल्या सोयीप्रमाणे ते बदलता येत नाही. तेव्हा "बॉम्बे हायकोर्ट" हे जोपर्यन्त त्याचे नाव बदलत नाही तोपर्यन्त "बॉम्बे हायकोर्ट" च म्हटले पाहिजे. हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्यामुळे केंद्र सरकारकडे आपण ठराव करुन पाठविला आहे असे सांगता. मुळात या विषयाचे गांभीर्य या सरकारकडे नाही हे मला समजले आहे. सभापती महोदय, या सदनामध्ये मी त्यावेळी रीतसर ठराव मांडला होता. त्या ठरावाला उत्तर देतांना सहा महिन्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

कार्यवाही करु असे सांगितले परंतु ती कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आपल्या माध्यमातून महाराष्ट्राच्या या सभागृहामध्ये मराठी अस्मितेचा, महाराष्ट्राच्या राजभाषेचा आणि त्यामधून येणाऱ्या निष्कर्षाचा जो अवमान केला आहे त्यामुळे संबंधित मंत्री महोदयांवर हक्कभंग दाखल करण्याचा माझा अधिकार या सभागृहामध्ये पुन्हा नोंदवून पुढे जातो.

सभापती महोदय, मुंबई शुल्क अधिनियमाव्दारे या राज्याच्या विजेच्या वापरावर शुल्क बसविण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियमित करण्यात आले आहे. "लायसनदार" हा शब्द या ठिकाणी कां वापरण्यात आला आहे? त्याऐवजी आपल्याला "परवानाधारक" असा शब्द वापरता येईल. या सभागृहामध्ये वारंवार सांगितले, ओरडून सांगितले आहे. परंतु आपल्या अधिकाऱ्यांना ठोकण्याची इच्छाशक्ती राज्य शासनाकडे नाही. मी सही करणार नाही असे सांगून ती नस्ती आपण परत पाठविली पाहिजे. माननीय मंत्री श्री. दर्डा साहेब आपण तर महाराष्ट्राची मराठी भाषा बुडवायला निघाला आहात. तुमचे विधेयक सभागृहापुढे येऊ दे. तुम्ही मराठीचे वाटोळे करणार आहात हे मी त्यावेळी तुम्हाला सांगणार आहे. त्यावेळी माननीय सदस्य श्री. हेमंत टकले हे माझ्याबरोबर असतील नाही तर ते साहित्यिक राहणार नाहीत.

**उप सभापती** : या ठिकाणी बसून मला या गोष्टीचा फार त्रास होत असल्यामुळे मी सर्वात प्रथम आपल्याबरोबर राहीन.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सभागृहामध्ये बरेचसे कामकाज शिल्लक आहे, तसेच आपल्याकडे वेळ फार कमी असल्यामुळे विधेयकावर चर्चा सुरु असतांना आपण दुसऱ्या मुद्याकडे जात आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री श्री.दर्डाजी साहेब या सदनामध्ये कोणत्याही विधेयकावर बोलत असतांना केवळ वेळ काढण्याकरिता एखादा मुद्दा हातामध्ये घेऊन कुठल्या तरी गप्पा गोष्टी करीत बसून मी किती तास बोलू शकतो हे दाखविण्याची मला अजिबात हौस नाही.

(यानंतर श्री. अजित शिगम)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

मी आजपर्यंत कोणत्याही विधेयकावर बोलताना विषयाच्या बाहेर जाऊन बोललो नाही. अज्ञान प्रकट करणे हे माझ्या स्वभावात नाही. या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्री बोलण्यासाठी उभे राहल्यावर मला त्यांचा सन्मान केला पाहिजे. समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे की,

"अज्ञाने प्रकट व्हावे, गात्रे झाकूनी असावे,
प्रकट होऊन नासावे हे बरे नव्हे."

म्हणून मी अज्ञानाने प्रकट होत नाही. माननीन शिक्षण मंत्री महोदयांचा सन्मान करणे मला भाग होते म्हणून मी एवढे सांगितले.

सभापती महोदय, विधेयकात मराठी शब्दांचा वापर करावा असे कित्येकदा सांगूनही विधेयकात "लायसन" हा इंग्रजी शब्द वापरलेला आहे. लायसन ऐवजी "परवाना" शब्द वापरता आला असता. विधेयकातील "ग"मध्ये नमूद केलेले आहे की, "परवाना नसलेली व ऊर्जेचे उत्पादन करणारी व ती ऊर्जा अन्य कोणत्याही व्यक्तीला त्या अन्य व्यक्तीच्या वापरासाठी विनामूल्य पुरविणारी प्रत्येक व्यक्ती" विनामूल्य वीज कोण पुरविते मला माहीत नाही. मला या शब्दाचा अर्थ समजलेला नाही. कोणी वीज विनामूल्य पुरवित असेल तर त्याच्यावर शुल्क कशासाठी आकारावयाचे ? आपण विक्रीवर शुल्क लावतो. विनामूल्य पुरविणारी प्रत्येक व्यक्ती म्हटलेले आहे म्हणजे कंपनी नाही, कारखाना नाही. माननीय मंत्री महोदयांनी सुरुवातीला तो शब्द सांगितला तो येथे नाही. पुढे नमूद केलेले आहे की, "लायसनदार नसून स्वत:च्या वापरासाठी ऊर्जेचे उत्पादन करणारी अन्य प्रत्येक व्यक्ती." त्यापुढे "राज्य शासन एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विर्निदिष्ट करील अशा दर युनिटला 40 पैसे यापेक्षा जास्त नसेल त्या दराने किंवा दरांनी."

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मी सांगू इच्छितो की, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना एक निवेदन करायचे आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कापसावरील खरेदी कर आकारणी व विडी व अनुत्पादित तंबाखूवरील मूल्यवर्धित कराची आकारणी

**मु.शी.**: कापसावरील खरेदी कर आकारणी व विडी व अनुत्पादित तंबाखूवरील मूल्यवर्धित कराच्या आकारणी संबंधी माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचे निवेदन.

श्री अजित पवार ( वित्तमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करतो. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांकरिता आणि सामान्य जनतेकरिता जाणिवा व्यक्त करुन कर कपात केली आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. परंतु आपण जी स्थगिती दिली ती रद्द व्हावी अशी माझी आहे. ती विचारांती होईल, आताच करावी असे मी सांगणार नाही. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी दोन्ही सभागृहाचा जो सन्मान केला आहे त्याबद्दल मी पुन्हा एकदा त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी कापसा वरील खरेदी कराची आकारणी स्थगित ठेवलेली आहे. परंतु मी आपणास जी विनंती केली होती त्याबाबत सांगितल्यास बरे होईल.

श्री.अजित पवार (बसून ) : मी ते करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दादांवर कोणत्याही ममता, समताचा दबाब नव्हता. विधिमंडळातील सदस्यांच्या भावनांचा सन्मान करुन त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे. मी पण होतो असे म्हटल्यावर काँग्रेसचा देखील त्यांच्यावर दबाव नव्हता. काँग्रेसच्या आग्रहाखातर त्यांनी घोषणा केलेली नाही तर विरोधी पक्षाचा सन्मान त्यांनी केलेला आहे असे आमचे म्हणणे आहे. मी आतापर्यंत एवढे अर्थसंकल्प पाहिले. आम्ही हे पहिल्यांदाच अनुभवत आहोत. गेल्यावर्षी काही वाढ केली नव्हती. परंतु या वर्षी काहीच काढता येत नाही म्हणून गरिबांकडून काढले आणि परत गरिबांच्या पदरात दान टाकले.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई वीज शुल्क (सुधारणा ) विधेयक

L.A. BILL NO. IV OF 2012

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ELECTRICITY DUTY ACT, 1958.)

(चर्चा पुढे सुरु.. )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकामध्ये "वीज निर्माता कोण याची नोंद केलेली आहे, मी व्याख्या म्हणत नाही. विधेयकात नमूद केलेले आहे की, "लायसन नसलेली व ऊर्जेचे उत्पादन करणारी, माझ्या दृष्टीने लायसन हा शब्द महत्वाचा आहे, ती ऊर्जा अन्य कोणत्याही व्यक्तीला त्या अन्य व्यक्तीच्या वापरासाठी विनामूल्य पुरविणारी प्रत्येक व्यक्ती." हा एक भाग झाला. पुढे नमूद केले आहे की, "लायसनदार नसून स्वत:च्या वापरासाठी ऊर्जेचे उत्पादन करणारी अन्य प्रत्येक व्यक्ती यांच्या बाबतीत" म्हणजे आकारणी योग्य शुल्क 40 पैशावरुन 1 रुपया 50 पैसे झाले असे शासनाचे मनोगत आहे. विनामूल्य वीज कोण पुरवितो मला माहीत नाही. हा नवीन शोध लावलेला आहे.

सभापती महोदय, विधेयक मांडताना मंत्री महोदयांनी सजग असले पाहिजे. त्यांना सर्व माहिती तोंडपाठ असली पाहिजे. विधेयकावरुन वाद होणारच नाही असा समज करुन घेऊ नये. श्री.राजेंद्र दर्डा हे ऊर्जा विभागाचे राज्य मंत्री असताना विधेयकासंबंधी माहिती देताना ते नेहमी तास सव्वा तास बोलायचे. कोणाला विजेवर अभ्यास करायचा असेल तर त्यांनी त्यांची त्या वेळेची भाषणे वाचावीत. आताच्या राज्य मंत्री महोदयांनी काहीच माहिती दिली नाही.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये किती वाढ केली आहे हे मला रिफ्लेक्ट होत नाही आणि त्याचे परिणाम काय होणार आहेत त्यावर मी बोलत आहे. माननीय मंत्री महोदयांनी विधेयक मांडताना चांगला युक्तीवाद करावयास पाहिजे होता. मला वाटले की, माननीय मंत्री महोदय माहिती देतील की राज्याच्या तिजोरीमध्ये किती वाढ होणार आहे किंवा अन्य माहिती देतील. परंतु त्यांनी विधेयक मांडले आणि खाली बसले. यामध्ये शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. सरकारला 4 हजार 800 रुपये विद्युत शुल्क मिळते.

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ श्री.अजित नंतर 14:15

श्री.दिवाकर रावते....

ही रक्कम 480 कोटी आहे की, 4800 कोटी इतकी आहे ते समजले नाही. कारण मी हिशोबामध्ये कच्चा असल्यामुळे मला वाचण्याला कठीण जात आहे. मी चुकीचे काहीच सांगत नाही. सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा हे ऊर्जा राज्यमंत्री होते त्यावेळी आपण सभागृहात बोलावयास उभे राहिला की, आमचे 100 टक्के प्रबोधन होत असे. त्यावेळचे माननीय ऊर्जा मंत्री माननीय श्री.दर्डा यांच्यामुळे निश्चित असत. त्यावेळी माननीय श्री.राजेंद्र दर्डा यांनी सभागृहात सांगितले होते. त्यानुसार आता ज्या ज्या विद्युत केंद्रातून विजेची निर्मिती होते त्या वीज केंद्रातून आता कमी विजेची निर्मिती होत आहे. हा कोणाचा पायगुण आहे असे मी म्हणणार नाही.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये 'लायसन' असा शब्दप्रयोग आलेला आहे. तो मला खटकल्यामुळे मी त्यावर बोललो आहे. राज्यात उत्पादित होणाऱ्या विजेवर कर लावला जाणार आहे. मी महाराष्ट्रातील विजेचा आढावा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. स्वत:करिता वीज निर्माण करणे हा एक विषय या विधेयकात अंतर्भूत केलेला आहे. त्याबाबत मी असे म्हणेन की, माझ्या घरावर मी सोलर लावले तर ती स्वत:साठी वीज निर्मिती केली गेली असे म्हणता येईल. गिझरला जास्त वीज लागते म्हणून काही लोक घराच्या गच्चीवर सोलर युनिट लावतात. या विधेयकातील शब्दा शब्दाचा अर्थ कसा होतो ते मी सांगत आहे. या विधेयकात 'स्वत:साठी' व 'कोणतीही व्यक्ती' असे हे दोन शब्द नमूद केलेले आहेत. एखाद्याने घरासाठी सोलर बसविला तर तो किती वॉटचा आहे, त्यातून किती वीज उत्पादित होत आहे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विजेचा दर युनिटसाठी 40 पैसे असेल तर तो 150 पैसे होणार आहे काय, त्याचे उत्तर मला सापडलेले नाही.

सभापती महोदय, पूर्वी वीजनिर्मितीसाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते. आता परवानगीची आवश्यकता भासत नाही. आता ज्याच्याकडे ताकद आहे, पैसा आहे तो कोठेही वीजनिर्मिती करु शकतो. आता कोणीही व्यक्तिगत अथवा सामुदायिकरित्या वीजनिर्मिती करु शकतो. उत्पादित होणाऱ्या विजेवर शासन शुल्क का आकारत आहे ? आपल्या राज्यामध्ये कोणीही वीजनिर्मितीसाठी पुढे आला तर त्याला त्यासाठी लागणारे पाणी, रस्ते किंवा इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. त्यामुळे त्या प्रकल्पातून उत्पादित होणाऱ्या विजेवर शुल्क लावण्याचा शासनाला अधिकार आहे. त्याला बंधन नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तत्कालीन माननीय ऊर्जा राज्यमंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांच्या काळात असा विषय झाला होता की, जो कोणी राज्यात वीज निर्माण करील त्याने किमान ठराविक टक्के राज्यासाठी वीज दिली पाहिजे. बाकीची वीज त्याला बाहेर विकता येईल. परंतु आता सरसकट बाहेर वीज विकली जात आहे. या राज्यात 1000 मेगावॅट वीजनिर्मिती केल्यावर राज्यासाठी 150 मेगावॅट, 200 मेगावॅट वीज देऊन उर्वरित वीज बाहेर विकण्याला परवानगी देणारा कायदा आणण्याचे ठरले होते. परंतु तो कायदा मंजूर झाला आहे की नाही हे मला माहीत नाही. परंतु त्या कायद्यानुसार त्यांना ठराविक टक्के वीज राज्याला द्यावीच लागेल. पूर्वी वीज निर्मिती केंद्रे सरकारी होती. पूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होते. या मंडळाचे चंद्रपूर, उरण, नाशिक, परळी, कोयना, भुसावळ येथे वीज प्रकल्प होते. परंतु या देशामध्ये टाटा यांनी 1905 साली खाजगी वीज प्रकल्प सुरु केला होता. त्यातून तयार होणारी वीज मुंबई शहराला देण्यावरुन फार मोठे युध्द झाले होते. त्या काळात फिरोजशहा मेहता हे महापालिकेचे प्रमुख होते. त्यावेळी महापौर ही संज्ञा नव्हती. राज्यकर्त्यांची हिंमत कशी असते त्याचे हे उदाहरण आहे. त्यावेळी महानगरपालिकेला 'म्युनिसिपल कौन्सिल' असे म्हटले जात होते. फिरोजशहा मेहता आणि टाटा यांचा वाद झाला होता. हे दोघेही पारशीच होते. परंतु फिरोजशहा मेहता यांनी टाटांना आम्हाला तुमची वीज नको असे सांगितले होते. त्यावेळच्या छोट्याशा मुंबईमध्ये फिरोजशहा मेहता यांनी प्रत्येक खांबावर विजेचे कंदिल लावले होते. तेव्हापासून विजेचे खांब आलेले आहेत. त्यांनी टाटांना आव्हान देऊन त्यांची वीज नाकारली होती. रस्त्यावर विजेचे कंदिल फिरोजशहा मेहता यांनी लावले होते. त्यावेळच्या म्युनिसिपल कौन्सिलचे सामर्थ्य त्यांनी दाखविले होते.

त्यानंतर टाटा आणि महानगरपालिकेचा 1915 साली करार झाला तेव्हापासून मुंबई महानगरपालिकेला टाटा वीज देत आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून बेस्ट मार्फत मुंबई शहराला देत आहे. माहीमपर्यंत आणि सायनपर्यंत टाटाकडून वीजपुरवठा केला जातो. टाटा वीज कंपनीकडून 1770 मेगावॅट विजेची निर्मिती केली जाते. त्यापैकी 940 मेगावॅट मुंबई शहराला दिली जाते. उर्वरित वीज रेल्वे, मोठमोठ्या कारखान्याला दिली जाते. म्हणजे केंद्र शासनाचे जेवढे उपक्रम आहेत त्यांना टाटांची वीज दिली जाते. मंत्री महोदय, मी टाटांचे उदाहरण का देतो त्याचे कारण सांगतो. एखाद्या माणसात राष्ट्रीयत्व किती कठोर असते त्याचे हे उदाहरण आहे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी व्यापार केला नाही. त्यांनी मुंबईतील नागरिकांसाठी वीज निर्माण केली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून टाटांची वीज दिली जाते. तसेच त्यांनी केंद्र शासनाच्या रेल्वेला, आरसीएफला वीज दिली जाते.

सभापती महोदय, काळ बदलला आहे. व्यापारीकरण भयानक व भन्नाट असते. त्याचे उदाहरण म्हणजे रिलायन्स कंपनी हे आहे. रिलायन्स म्हणजे पूर्ण व्यावसायिक कंपनी. तुम्ही किती घेता आणि आम्ही काय करतो ते सांगा असा हा प्रकार आहे. ही व्यावसायिक माणसे आहेत. या कंपनीने डहाणूचा संपूर्ण विजेचा प्रकल्पच ताब्यात घेतला. त्या वीज प्रकल्पाच्या पायाभरणीचे काम चालू होते तेव्हा मी स्वत: तेथे जाऊन तो प्रकल्प पाहिलेला आहे. त्यावेळी उपनगरीय वीज कंपनीचा स्वत:चा प्रकल्प म्हणून उदयास येत होता. रिलायन्सने तो प्रकल्पच विकत घेतला. त्यानंतर उपनगरामध्ये रिलायन्स कंपनी वीज पुरवू लागली. रिलायन्स कंपनी व्यावसायिक निघाली. टाटांनी असे सांगितले की, मुंबई शहराप्रमाणेच उपनगरामध्येही आम्हाला वीज देता आली पाहिजे. त्याला वीज नियामक आयोगाने मान्यता दिली आहे. त्याचा रिलायन्स कंपनीने फायदा घेऊन घरगुती वीज ग्राहकांना टाटांकडून वीज घेण्यास सांगितले आणि मोठे व्यापारी, उद्योग आपल्याकडे ठेवले. कारण उद्योगासाठी विजेचा दर अधिक असल्यामुळे त्यांना आपल्याकडे ठेवले आहे. आज उपनगरामध्ये टाटाचे 1.50 लाख निवासी वीज ग्राहक आहेत. राष्ट्रीयत्वासाठी विजेची निर्मिती करणारे एका बाजूला आहेत आणि व्यावसायासाठी वीज निर्मिती करणारी कंपनी धंदा करीत आहे. घरगुती ग्राहकांना टाटांकडे जाण्यासाठी रिलायन्स कंपनीने रितसर कळविलेले आहे.

सभापती महोदय, आता कॅप्टिव्हमध्ये 'इंडिया बुल' कंपनी आली. या कंपनीने नाशिक, वर्धा, अमरावती येथे कंपन्या उभ्या केल्या आहेत. अमरावती जिल्ह्याचा विषय सर्वांना माहीत आहे. विदर्भातील अनुशेषग्रस्त भागाचे पाणी पळविल्यामुळे 45 हजार हेक्टर सिंचन बरबाद होत असतानाही इंडिया बुल कंपनीला परवानगी मिळाली आहे. या कंपनीला सरकारचा पाठिंबा आहे. या सदनामध्ये माजी सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली घनघोर शाब्दिक युध्द झाले होते. त्यामुळे 4 प्रकल्पापैकी 3 प्रकल्प रद्द करण्यात आले, परंतु इंडिया बुल कंपनीचा प्रकल्प रद्द करता आला नाही. या कंपनीला दिल्लीचा आशीर्वाद असल्यामुळे त्यांचा प्रकल्प रद्द करण्याची कोणाची हिंमत होणार आहे ?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्याप्रमाणे तो प्रकल्प झाला. जिंदालची 500 मेगावॅट वीज कोकणामध्ये रत्नागिरीला तयार होते. जिंदालच्या 500 मेगावॅट विजेपैकी एक मेगावॅट सुध्दा वीज महाराष्ट्राला मिळत नाही. आपण या सभागृहामध्ये कशाला नाकाने कांदे सोलता ? हा प्रकल्प थांबवू नका, तो प्रकल्प थांबवू नका असे सारखे सांगत असता. मी आज सगळे सांगणार आहे. आपण ते ऐकावे. जिंदालची 500 मेगावॅट वीज कोकणात तयार होते त्यातील एक मेगावॅट सुध्दा वीज महाराष्ट्राला मिळत नाही. कोकणातील लोडशेडींग थांबविण्यासाठी त्यांची वीज मिळत नाही. जिंदालच्या प्रकल्पामध्ये स्थानिक लोकांना नोकरीला लावले आहेत का या बाबतीत कोकणातील स्थानिक नेते सांगू शकतील.

सभापती महोदय, माझ्याकडे जे आकडे आहेत ते अत्यंत विस्मयचकीत करणारे आहेत. जिंदालची वीज निर्मिती दोन ठिकाणी होते. रत्नागिरीला त्यांची जी वीज निर्माण होते त्यातील एक मेगावॅट सुध्दा वीज महाराष्ट्राला मिळत नाही. रायगडमध्ये सुध्दा त्यांची वीज निर्माण होते. त्या ठिकाणी 1200 मेगावॅट वीज निर्माण करतात. त्यापैकी 600 मेगावॅट वीज महाराष्ट्राला मिळते आणि बाकीची सर्व वीज बाहेर जाते. वरोरा येथे जे विद्युत निर्मिती केंद्र आहे त्या ठिकाणी 540 मेगावॅट वीज निर्माण होते. त्यापैकी 260 मेगावॅट वीज महाराष्ट्राला मिळते आणि बाकीची वीज आपल्याला मिळत नाही. नागपूरच्या एमआयडीसीमध्ये अभिजित नावाचे वीज निर्माण करणारे आहेत. त्या ठिकाणी 250 मेगावॅट वीज तयार करतात. त्यातील फक्त 62 मेगावॅट वीज आपल्याला देतात आणि बाकीची सर्व वीज बाहेर जाते. इंद्रजित इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी 90 मेगावॅट वीज निर्माण करते. त्यातील एकही मेगावॅट वीज आपल्याला देत नाहीत. सर्व वीज बाहेर विकतात. निर्माण होणाऱ्या 2080 मेगावॅटपैकी फक्त 900 मेगावॅट वीज महाराष्ट्राला मिळते. बाकीची सर्व वीज महाराष्ट्राच्या बाहेर जाते आणि आपण लोडशेडींग भोगतो. हे लोक आपल्या महाराष्ट्रामध्ये वीज निर्माण करतात आणि बाहेर देत आहेत त्याबाबतीत आपण काय केले हे सांगावे. आपण अंधारातच राहावयाचे का ? काल मी परभणीमध्ये होतो. सकाळी दहा वाजता वीज गेली ती संध्याकाळी साडेसहा वाजता आली. आमचे नशीब, माननीय मुख्यमंत्र्यांची सभा होती म्हणून संध्याकाळी साडेसहा वाजता वीज आली. त्या ठिकाणी माझी सुध्दा सभा होती. संध्याकाळी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

साडेसहा वाजता वीज आली. हे लोक आपल्या महाराष्ट्रामध्ये वीज निर्माण करतात, आपले पाणी वापरतात, रस्ते वापरतात. त्या ठिकाणी आपले कामगार नाहीत. स्थानिक लोकांना रोजगार देत नाहीत. त्यांची वीज बाहेर जाते आणि आम्ही अंधारात राहावयाचे अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भातील ही परिस्थिती मी मुद्दाम या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. माझ्याकडे एन्रॉन कंपनीची सर्व माहिती आहे. ते सगळे मांडत बसलो तर चार पाच तास लागतील. कोणी बुडवली, कशी बुडवली, का बुडवली, तुम्ही काय केले, आम्हाला वीज मिळते हे सांगत असता. एन्रॉनची वीज आज आपल्याला मिळतच नाही. एन्रॉनच्या विजेचा दर 8 रुपये होता तो आमच्या काळात साडेतीन रुपयावर आला. त्यानंतर एन्रॉन बुडाले. मग रत्नागिरी इन्फ्रास्ट्रक्चर नावाने कंपनी आली. माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांनी त्या ठिकाणी फार मेहनत घेतलेली आहे. त्यांनी अधिकृत मेहनत घेतलेली आहे. त्यांनी बेकायदेशीर काही केलेले नाही. एन्रॉन प्रकल्प तयार होताना थोड्या स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पण त्यानंतर मिळाला नाही. आज दाभोळ प्रकल्पाची फक्त 22 ते 23 टक्के वीज महाराष्ट्राला मिळते. दुर्दैवाची बाब अशी की, आताच्या अर्थसंकल्पामध्ये गॅसवर कर लावला. लोकांना वाटले की फक्त घरगुती गॅसवर करवाढ झाली. पण तशी परिस्थिती नाही. या महाराष्ट्रामध्ये गॅसवर आधारित जे जे निर्माण होते त्यावर तो कर आहे. एन्रॉन प्रकल्प गॅसवर आधारित आहे. आता आपण 12 टक्केचा कर थोडा कमी केला. हा एन्रॉन प्रकल्प खरोखरच या महाराष्ट्राला लाभदायक आहे की, नाही याची एकदा चर्चा झाली पाहिजे. कोकणाला तो प्रकल्प लाभदायक आहे की नाही हे त्या भागातील सन्माननीय सदस्यांनी सांगावे. तो प्रकल्प कोकणाला लाभदायक नाही हे मला माहीत आहे पण ते सांगण्याचा अधिकार त्या भागातील सदस्यांचा आहे. कारण आपण त्या ठिकाणी संघर्ष केलेला आहे. सगळेच संघर्ष चुकीचे असतात असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, मी सगळ्या प्रकल्पांची नावे घेत नाही. कारण मला माननीय मंत्री महोदयांनी विनंती केल्यामुळे त्यांना मला आणखी दोन तीन तास जास्त बसविण्याची इच्छा नाही. मी विदर्भ आणि कोकणच्या बाबतीत सांगू इच्छितो. आमचे कोकणातील सहकारी या ठिकाणी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

आहेत. आम्ही कोणत्याही पक्षात असलो तरी कोकणाच्या हितासाठी एकत्र येतो. आज माजी सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी सभागृहात नाहीत याचे दु:ख होते. या सभागृहात कोकणातील सर्व लोकांना एकत्र करुन लढा उभा करणारे गुरुनाथजी होते. प्रस्ताव गुरुनाथजींनी आणावयाचा आणि त्यावर बाकीच्या सर्व सदस्यांनी बोलावयाचे हे सर्वमान्य होते. गुरुनाथजींनी बोलण्यामध्ये सरकारला कधीही सवलत दिलेली नाही. कोकणावरील सर्व अन्याय ते घणाघाती पध्दतीने मांडावयाचे. आताही कोकणातील सन्माननीय सदस्य या ठिकाणी बोलतात ते पाहून आनंद होतो.

सभापती महोदय, कोकण आणि विदर्भामध्ये ज्या प्रकल्पांना मान्यता मिळालेली आहे ते सगळे प्रकल्प 1 लाख मेगावॉटचे आहेत. मी जे सांगत आहे त्यामध्ये काहीही अतिशयोक्ती नाही. जर हे सगळे प्रकल्प मार्गी लागले तर महाराष्ट्रात पाच ते सात वर्षात 1 लाख मेगावॉट वीज निर्माण होणार आहे. या महाराष्ट्राचे सुपुत्र केंद्रात गेले. त्यांना ऊर्जा खाते मिळाले. आम्हाला आनंद झाला. आमच्या महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री केंद्रात मंत्री झाले. ते राष्ट्रपती व्हावेत अशा प्रकारचे संकेत आहेत. ही आनंदाचीच बाब आहे. महाराष्ट्राचे राष्ट्रपती पुन्हा होऊ शकत नाही कारण महाराष्ट्राबद्दल आकस आहे. हा मुद्दा या बिलाच्या संदर्भातील नाही. दुसरे कशाला सांगता असे काही सन्माननीय सदस्य म्हणतील म्हणून मी जास्त काही बोलत नाही. पण ते राष्ट्रपती व्हावेत. श्री. सुशीलकुमार शिंदे यांना मी ज्या पध्दतीने गोखले रोडवर पाहिलेले आहे, एन.सी. केळकर रोडवर पाहिलेले आहे, ज्या पध्दतीने त्यांना शिपाई म्हणून, पोलीस अधिकारी म्हणून पाहिलेले आहे त्यामध्ये त्यांचे संपूर्ण जीवन आमच्या समोर घडलेले आहे. ते कोणत्या पक्षाचे आहेत हा भाग महत्वाचा नाही. ते जर राष्ट्रपती झाले तर आपणा सर्वांना आनंदच वाटेल. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना आनंद वाटेल की नाही, माहीत नाही. माझे म्हणणे त्यांना कळलेले आहे. माननीय केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी जाहीर केले की, या देशाला 1 लाख मेगावॉट विजेची गरज आहे. ती आमच्या माथ्यावर आणून टाकली. दुसरीकडे कोठे प्रकल्प घेतल्याचे माझ्या ऐकिवात नाही. कॅप्टीवमध्ये सुध्दा वीज निर्मिती होणार आहे.

धुळ्यामध्ये सोलरचा 250 मेगावॅटचा प्रकल्प आहे. चंद्रपूरला सध्या 10 मेगावॉटचा सोलरचा

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

प्रकल्प चालू आहे. मला एका गोष्टीचा आनंद झाला. या देशामध्ये सोलर एनर्जी कोठे निर्माण होऊ शकते याची जी योग्य ठिकाणे निश्चित केलेली आहेत त्यामध्ये क्रमांक एकवर असलेले ठिकाण गुजरातमधील ओखा हे आहे. नरेंद्र मोदी यांनी त्या ठिकाणी सोलरचा 10 हजार मेगावॅटचा प्रकल्प चालू केला आहे. त्यानंतर आपण धुळ्यामध्ये प्रकल्प घेतला. त्याची आज काय परिस्थिती आहे हे मला माहीत नाही. तो प्रकल्प राज्य शासनाने करावा. कारण हा तुमचा-आमचा प्रश्न नाही. हा प्रश्न राज्याचा आहे. तो प्रकल्प व्हावा. त्या प्रकल्पाचे काम कोठपर्यंत आले आहे हे सांगितले तर आम्हाला आनंद होईल. पण त्या संदर्भात कधी आपण या ठिकाणी सुतोवाच करीतच नाही. हा गुजरातच्या जवळ असलेला प्रकल्प आहे. सूर्यकिरणाच्या माफक वीज निर्मितीचा तो बिंदू असल्यामुळे, देशातील क्रमांक दोनचा योग्य स्पॉट असल्यामुळे तो प्रकल्प व्हावा. पहिला स्पॉट गुजरातमधील आहे. आपण चांगला निर्णय घेतला. धुळ्याचा प्रकल्प वाढविला तर चांगले होईल. सोलरच्या बाबतीत केंद्र शासनाची योजना जाहीर झालेली आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सबसिडी आहे. कारण सोलर वीज निर्मिती महाग पडते. त्या पध्दतीच्या वीज निर्मितीमध्ये प्रत्येक युनीटचा खर्च 14 ते 16 रुपये येतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

केन्द्र सरकार त्या विजेवर 15 ते 16 रुपये सबसिडी देणार आहे. ही केन्द्राची सबसिडी वीज निर्मितीसाठी नाही तर पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी, प्रदूषण रोखण्यासाठी मिळणार आहे. त्यामुळे अणुवीज आपल्याला 2 ते 3 रुपयामध्ये पडणार आहे.

देशाला 1 लाख मेगावॅट विजेची आवश्यकता आहे. म्हणून आमच्या विदर्भामध्ये आणि कोकणामध्ये हे वीज प्रकल्प आणले. हे प्रकल्प जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाव्यतिरिक्त आहेत. राज्याच्या तिजोरीमध्ये किती भर पडते हा महत्वाचा प्रश्न नाही. माणसाची हानी होता कामा नये, माणूस उद्ध्वस्त होता कामा नये. एखादा भाग उद्ध्वस्त होऊन तिजोरीत भर पडत असेल तर तशी भर आम्हाला नको आहे. त्यापेक्षा दारिद्र्यामध्ये राहून आम्ही चांगला संसार करु. आमचाच विध्वंस आम्हाला नको आहे. म्हणून एन्रॉनच्या संदर्भात आम्ही उभे राहिलो. योगायोगाने आज "सामना" दैनिकामध्ये एक अग्रलेख आलेला आहे. भूकंप झाला तर त्याचे काय काय परिणाम होतात हे त्यामध्ये नमूद केलेले आहे. भूकंप झाल्यानंतर जवळ जवळ 72 तासांनी त्याचे परिणाम आम्ही अनुभवले आहेत. महाराष्ट्रातील काही भागामध्ये प्रचंड पाऊस पडला. त्याला परतीचा पाऊस म्हणता येणार नाही. काल परभणीमध्ये माझी आणि माननीय मुख्यमंत्र्यांची एकाच वेळी सभा होती. दोन्ही सभा पावसामुळे उद्ध्वस्त झाल्या. जी काही 5-10 मिनिटे मिळाली तेवढा वेळ आम्ही बोललो. भूकंपाचा केन्द्रबिंदू 33 कि.मी. खोल असल्यामुळे त्सुनामी आली नाही. परंतु त्या भूकंपाचे परिणाम आपल्या राज्यामध्ये आणि देशामध्ये आपल्याला जाणवले.

अधिवेशनाच्या सुरुवातीच्या आठवड्यामध्ये सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यानी अवकाशामध्ये निर्माण झालेल्या धुळीचा मुद्दा येथे मांडला होता. समोरचा माणूस दिसत नव्हता इतकी धूळ आसमंतात होती. नंतर समजले की, अरेबियन देशात धुळीचे वादळ झाले आणि त्याचे परिणाम आपण आपल्या राज्यामध्ये भोगले. हे मी कशासाठी सांगत आहे तर दैनिक "सामाना"मध्ये "धोक्याची घंटा" या नावाने अग्रलेख आलेला आहे. त्यामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, "जपानमध्ये देखील भूकंपाच्या तडाख्याने त्सुनामी लाटा उसळल्या. महाप्रलयंकारी भूकंपाने अख्खा प्रशांत महासागर ढवळून निघाला. खवळलेला समुद्र जपानच्या अनेक शहरांमध्ये घुसला. ऑईल रिफायनरीज पेटल्या. फुकुशिमा अणुऊर्जा प्रकल्पात स्फोट झाले. प्रचंड किरणोत्सर्ग सुरु झाला.

श्री. दिवाकर रावते....

वा-याच्या हेलकाव्यांबरोबर किरणोत्सर्ग अवकाशात पसरु लागला. जगभरातील मी मी म्हणणारी राष्ट्रे पुन्हा एकदा हादरली. 19 हजार जपानी लोक मृत्युमुखी पडले. निम्मे जपान उद्ध्वस्त झाले. पण एका वर्षाच्या आत जपान फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून पुन्हा उभा राहिला."

त्या अग्रलेखामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "कोयना परिसरात तर 1963 पासून आजपर्यंत भूकंपाचे लहानमोठे 1लाख 17 हजार 929 धक्के बसले. आजवर हे सर्व धक्के कोयना धरणाने पचवले. पण दुर्दैवाने एखादा मोठा भूकंप आला आणि धरणाची भिंत खचली तर सांगली, साता-यात माणूस शोधूनही सापडायचा नाही. कुणा वै-यानेही असे चिंतू नये. पण आपत्ती व्यवस्थापनात प्रचंड कुचराई करणा-या सरकारला भानावर आणण्यासाठी हे सांगायला हवे. त्यातच आता काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नेत्यांनी कोकणातील जैतापुरात अणुऊर्जा प्रकल्प आणण्यासाठी जीवाचे रान चालवले आहे. तिकडे हजारो किलोमीटर लांब इंडोनेशियात भूकंप झाला तर इकडे मुंबईत त्याचे धक्के जाणवले, जैतापूर परिसरात उद्या भूकंपाचा तडाख बसला तर काय होईल ? अरबी समुद्रात त्सुनामी लाटा उसळल्या, अणुभट्टयांमध्ये स्फोट झाले तर मुंबई, कोकण आणि महाराष्ट्राला बेचिराख होण्यापासून वाचवण्यासाठी कोण पुढे येणार आहे ? विज्ञान-तंत्रज्ञानाने खूप प्रगती केली असेल हो, पण भूकंप आणि त्सुनामीच्या संकटाची चाहूल तुमच्या विज्ञानाला का लागत नाही ? जो धोका प्राण्यांना ओळखता येतो तो माणसांना, शास्त्रज्ञांना का उमगत नाही ? जैतापुरात अणुऊर्जा प्रकल्पाची जिवंत स्मशानभूमी उभारणा-यांनी याचे उत्तर द्यायला हवे. इंडोनेशियाच्या भीषण भूकंपाने धोक्याची घंटा वाजवली आहे."

सभापती महोदय, हे प्रकल्प उभे राहिल्याने आमच्या तिजोरीत किती पैसे जमा होणार हे महत्वाचे नाही. World Nuclear Industry Status Report 2010-11 मधील महत्वाचा परिच्छेद येथे वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, " Post-3/11 Developments in selected countries" या मध्ये इंडियाच्या बाबत असे लिहीले आहे की, "....including our new reactor plans, after we receive more information from Japan. The Japan accident has created a very, very tough situation for India; actual implementation of nuclear power projects will now certainly take a backseat,- said Debasish Mishra, Mumbai based senior director at Deloittee

..3..

श्री. दिवाकर रावते...

Touche Tohmatsu. It will be very difficult to sell the idea of nuclear power to people for any political party after the Japan disaster. In fact, following Fukishima, public protests have intensified at all sites earmarked for new nuclear reactor projects."

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे मी एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, हे धन विधेयक आहे. त्यामुळे या विधेयकावर इतकी विस्तृत चर्चा करण्याची आवश्यकता नाही. या विधेयकानंतर पुन्हा अशासकीय कामकाज घ्यावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकावर मी बोलायचे नाही का ? अशासकीय कामकाज ही निरर्थक चर्चा असते. अशासकीय ठराव मांडल्यानंतर ते परत घेण्याची विनंती केली जाते आणि सन्माननीय सदस्य ते परत घेतात. अशासकीय ठराव मांडल्यानंतर त्या संदर्भात शासनाने दिलेला शब्द एकदाही पाळलेला नाही. मागील 20 वर्षातील अशासकीय कामकाज काढून पाहिले तर शासनाने दिलेला शब्द एकदाही पाळलेला नसल्याचे दिसून येईल.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दृष्टीने आणि जैतापूरवासीयांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. आज जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पामुळे महाराष्ट्र कसा उद्ध्वस्त होणार आहे हे मला बोलले पाहिजे.

...नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

ज्यावेळी मी भारताबाबतचा मुद्दा मांडला तेव्हा इंडोनेशिया मध्ये काय म्हटले आहे ते देखील सांगतो.

इंडोनेशियामध्ये अन्य उर्जा प्रकल्प व्हावे की नाही हे महत्वाचे आहे. त्यांनी असे म्हटले आहे की," Chalid Muhammad from the environmental NGO Indonesia Green Institute, however, has argued that the government should stop the plan to build a reactor because 83 per cent of Indonesia's area is prone to disasters such as earthquakes and tsunamis. The Government should focus on building decentralized power plants that use renewable energy sources, such as micro-hydro and geothermal plants." न्युक्लिअर प्लांट बनवायचे की नाही याबाबत जपानमध्ये लोकांची मते मागविली. लोकांनी आपली मते व्यक्त करताना सांगितले की, आम्हाला हा प्लांट नको आहे. "In total, 14 of 54 reactors in Japan remain off line as a consequence of the Fukushima disaster. Units 1-4 of the Fukushima-I plant are condemned, and the likelihood for units 5 and 6 to be restarted is virtually zero. Japanese Chief Cabinet Secretary Yukio Edano said the government will review its nuclear power policy once the situation at the crippled plant is under control. Once this is resolved, we need to carry out a thorough review and examination of this major policy decision."

यानंतर थायलंड मधील जनता काय म्हणते ते आपण पाहू. थायलंड मध्ये असे म्हटले आहे की, "An opinion poll in late March 2011 found that 83 per cent of respondents disagreed with the plan to build nuclear plants in Thailand, and only 16.6 per cent backed the move. When asked about construction of a nuclear plant in their respective provinces, 89.5 per cent of respondents objected...." त्यांनी सांगितले की आमच्या भागात हा प्लांट नको आहे. "...while only 10.5 per cent agreed. Thailand's study on nuclear plant construction will be thoroughly reviewed in light of the crisis in Japan." असे म्हणून सरकारने जरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2



श्री. दिवाकर रावते ........

मानले तरी जनतेने नाकारले. तसेच तैवान मध्ये काय म्हणाले ते देखील मी येथे उध्दृत करु इच्छितो "...Lawmakers with the Democratic Progressive Party (DPP) called on the legislature to approve a referendum on nuclear power, the latest in an effort to scrap the Fourth Nuclear Power Plant in New Taipei City."

फ्रान्स मध्ये तर फारच गंभीर आहे आणि आपल्या जैतापूर प्रकल्पासाठी तर जपानकडूनच न्युक्लिअर रिॲक्टर्स येणार आहेत. राज्यात आणखी एक प्रकल्प ज्यातून एक लाख मेगावॅट वीज निर्माण होणार असा कोळशावरचा प्रकल्प होत आहे, त्याच वेळी आणखी एक लाख मेगावॅट विजेचा प्रकल्प आपण जैतापूरमध्ये निर्माण करीत आहात, अशा प्रकारे अणु उर्जा प्रकल्प घेणे म्हणजे सगळा उध्वस्ततेचा प्रकार आहे. म्हणून मला या विधेयकाच्या निमित्ताने सांगावाचे आहे की, सरकार आम्हाला म्हणत असते की, प्रत्येक वेळी उठावयाचे आणि प्रकल्पाला विरोध करावयाचा, अशीच भूमिका घ्यावयाची तर वीज कोठून देणार, विजेसाठी आंदोलने करतात, लोड शेडिंगच्या बाबतीत आंदोलने करतात आणि प्रकल्पाला मात्र विरोध करतात, अशा परिस्थितीत आपल्याला वीज कोठून मिळणार असेही आम्हाला सरकारकडून ऐकविले जाते.

जैतापूर येथील एक लाख मेगावॅटचा प्रकल्प सन 2050 पर्यंत पूर्ण होणार असे सरकार म्हणते पण एवढ्या वर्षातही तो पूर्ण होणार नाही, अशी मला भीती वाटत आहे. खरे तर सन 2020 पर्यंत या प्रकल्पाचा पहिलाच फेज पूर्ण होणार आणि त्यातून फक्त तीन हजार मेगावॅट एवढीच वीज उपलब्ध होणार आहे. तसेच जी एकूण एक लाख मेगावॅट वीज निर्माण होईल त्यातूनही आपल्या राज्यासाठी फक्त 15 हजार मेगावॅट एवढीच वीज उपलब्ध होणार आहे, बाकीची वीज देशासाठी राहणार आहे. अशी परिस्थिती असताना प्रकल्प उभा राहू देत नाही म्हणून आम्हाला दमदाटी केली जाते पण आपल्याला ही संपूर्ण वीज मिळणार नाही हे देखील विसरुन चालणार नाही. तसेच या प्रकल्पासाठी जर्मनीकडून रिॲक्टर्स आणले जाणार आहेत. जगात जे कोठेच विकले जात नव्हते ते आपल्याकडे विकण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे मात्र शासनाला कसे कळत नाही याचेच आश्चर्य वाटते. इकडे आपण विमानात बसल्यानंतर थोडे जरी विमान हेलकावले तरी देवाचे नाव घेतो आणि या प्रकल्पाच्या बाबतीत मात्र शासन सांगते की, विमान जरी

....3



श्री. दिवाकर रावते ........

पडले तरी या प्रकल्पाचे काही होणार नाही, पण हे आपल्याला कसे काय माहीत हेच मला समजत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. निसर्ग कोपल्यानंतर शहरेच्या शहरे खाली जातात, इमारती गाडल्या जातात, माणसे सुध्दा पूर्ण उद्ध्वस्त होतात आणि आपण मात्र त्यांच्या सांगण्यानुसार म्हणता की विमान पडले तरी प्रकल्पाला काहीच होणार नाही. वास्तविक विमान पडले तरी काही अपाय होणार नाही असे हे रिॲक्टर विकणारे सांगत असतात आणि आपण मात्र त्यांच्यावर विश्वास ठेवून अशा प्रकारची न विकली जाणारी रिॲक्टर्स विकत घेऊन त्यांची बाजारपेठ चालविण्याचे टेंडर घेतो. हे मात्र राज्यातील जनतेला नको आहे.

मी यापूर्वी जे वाचून दाखविले त्या जगातील वेगवेगळ्या देशाच्या लोकांच्या भावना आहेत. त्याप्रमाणे आपल्या राज्यातील जनतेची इच्छा नसेल तर शासन हा जैतापूर प्रकल्प पाहिजे असा हट्ट कशासाठी धरीत आहे, याचा खुलासा झाला पाहिजे. माननीय उध्दवजी ठाकरे म्हणाले होते की, जैतापूर प्रकल्पातून 40 वर्षानंतर जी वीज आपल्याला उपलब्ध होणार आहे ती आपण दुसरीकडे प्रकल्प जाईल तेथून भलेही विकत घेऊ पण हा प्रकल्प दुसरीकडे जाऊ द्यावा, आमच्या ऊरावर कशाला हा प्रकल्प घेता ? एवढेच म्हटल्यानंतर हे सरकार म्हणते की आपण लोड शेडिंगवर बोलू नका, आपणच प्रकल्प होण्यासाठी आडवे येता, पण माणसे जगविण्याची भूमिका असेल तर त्यासाठी काय गाडावयाचे हे देखील आम्हाला ठरवावे लागते, हे विसरुन चालणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी कोकणच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावरुन शासन खाजगीकरण करण्याच्या मागे आहे असे जाणवते. पण ते कोणाचे आहे, कशासाठी आणि मालक कोण आहे, महिन्याला 6 कोटी कोठून व कसे उपलब्ध होणार आहेत हे आम्हाला माहीत आहे, त्याच्या डिटेलमध्ये मी जाणार नाही त्यांना अशी अट घातली आहे की, 220 मेगावॅटचा प्रकल्प भलेही तुम्ही उभा करा, त्याला शासनाने उत्तर दिले आहे, परवानगी दिली व पैसेही देत आहे, जसे आपले जावईच आहेत. तेव्हा सन्माननीय सदस्य परशुराम उपरकर बोलले की, साहेब, आता काय करायचे ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.....अडथळा.....लक्षवेधी सूचनांना योग्य उत्तर मिळत नाही, नियम 93 अन्वयेच्या सूचनांना दिलेल्या निवेदनांने समाधान मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. या विधेयकात म्हटल्याप्रमाणे "विनामूल्य" हा प्रकार मात्र आम्हाला समजला नाही, त्याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

....4



श्री. दिवाकर रावते ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच या प्रकल्पातून जी वीज निर्माण होणार आहे, त्यावरील कर .....अडथळा.....कोळशावर बोलला काय, कोल माफियावर बोललो काय, वॅगनवर बोललो काय, कोल वॉशिंगवर बोललो काय, मी फक्त या विधेयकात जे वाईट शब्द टाकले त्यावरच बोलतो.

यानंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

आपण विधेयकामध्ये "पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याची अतिरिक्त जबाबदारी लक्षात घेऊन आणि शेतकऱ्यांसारख्या उपभोक्त्यांना योग्य सूट देण्यासाठी".......असा उल्लेख केलेला आहे. येथपर्यंत सर्व काही बरोबर आहे. आमचे पाणी, आमची जमीन, आमचे रस्ते यांचा वापर करावयाचा आणि तुम्ही पैसे कमवायचे परंतु हे मात्र तुम्हाला थांबविता आले नाही. तुम्ही मराठी माणसाला हमाली करण्याच्या लायकीचा सुध्दा ठेवला नाही. तुम्ही विधेयकामध्ये ......."पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याची अतिरिक्त जबाबदारी लक्षात घेऊन आणि शेतकऱ्यांसारख्या उपभोक्त्यांना योग्य सूट देण्यासाठी" हा जो शब्द प्रयोग केलेला आहे त्यामध्ये आपण शेतकऱ्यांना कोणती सूट देणार आहात ? जो शेतकरी तुम्हाला 4000 कोटी रुपये देतो त्याला केवळ 2-4 शे करोड रुपयाची सूट देत आहात. महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकऱ्याचे केवळ 700 कोटी रुपयांचे विजेचे बिल आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे विजेचे बिल पूर्णपणे माफ केले जाईल अशी घोषणा सरकारने करण्याची आवश्यकता आहे.

विधेयकामध्ये "शेतकऱ्यांसारख्या उपभोक्त्यांना योग्य सूट देण्यासाठी" हा जो उल्लेख केलेला आहे त्या "योग्य सूट" चा अर्थ आम्हाला समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. तुम्ही शेतकऱ्यांच्या नावाने कर लावावयास निघाला आहात तर मग शेतकऱ्यांना वीज मोफत द्या. 4809.93 कोटी शुल्कात एकंदर किती वाढ होणार आहे. ही जी वाढ केलेली आहे त्यामुळे तुम्ही शेतकऱ्यांना काय सूट देता ? विधेयकामध्ये प्रती युनिटला 40 पैशावरुन प्रती युनिटला दीड रुपये वाढ केलेली आहे त्यामुळे शेतकऱ्यांना कोणती सूट देणार आहात हे या ठिकाणी सांगितलेच पाहिजे. तुम्ही शेतकऱ्यांना काही दिले नाही, शेतकऱ्याचा घात करता म्हणून आम्ही या विधेयकावर मतदान मागणार आहोत. शेतकऱ्यांच्या हितासाठी या ठिकाणी जे सन्माननीय सदस्य प्रश्न मांडतात त्यांचीही माझ्या सारखीच इच्छा असेल. नाही तर आवळा देऊन कोहळा काढून घेणार असाल तर आम्ही ते खपवून घेणार नाही.या ठिकाणी मी जे काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या प्रश्नांची उत्तरे आपल्याकडून मिळतील अशी अपेक्षा करतो व या विधेयकाला विरोध करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा ( विधानसभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री दिवाकर रावते साहब ने काफी समय तक अपना भाषण किया. मेरा कहना है कि यह बिल बहुत ही छोटा सा बिल है. बिल लाने से पहले इस से संबंधित आर्डिनेंस भी निकाला गया था. उस अध्यादेश की जगह पर ही यह बिल यहां पर चर्चा के लिए लाया गया है. 40 पैसे लेवी की जगह पर अब इस बिल के माध्यम से यह लेवी डेढ़ रुपए करने संबंधी यह बिल है. लेकिन माननीय सदस्य श्री रावते जी ने जो लंबी बात की, वह उन्होंने जैतापुर ॲटोमिक पॉवर के बारे में की है. उनके जो विचार महाराष्ट्र के बारे में हैं, उनके वे विचार बिल्कुल ठीक हैं. क्योंकि हम सभी को महाराष्ट्र की जनता का हित देखना है. कोंकण तथा अन्य क्षेत्र के हित और वहां के लोगों की भावनाओं को ध्यान में रखकर ही सभी माननीय सदस्यों को यहां पर अपनी बात रखनी होती है. लेकिन मुझे लगता है कि अणु उर्जा चाहिए या नहीं चाहिए, यह एक अन्तर्राष्ट्रीय विषय है और यह एक साइंटिफिक इश्यू भी है. इस इश्यू को भावनात्मक इश्यू बनाकर इस तरह का वातावरण यदि हम बनाएंगे तो इसकी वजह से होने वाले परिणामों को भी हमें ध्यान में रखना आवश्यक है.

सभापति महोदय, कोयले पर आधारित थर्मल पॉवर का जो जेनरेशन है उसकी कॅपेसिटी मर्यादित है. हमारे यहां पर जो कोयला उपलब्ध है, वह कोयला आज नहीं तो 50-100 साल बाद या दो सौ साल बाद तो समाप्त होने ही वाला है. यह अहम चिंता का विषय आज हमारे वैज्ञानिकों के सामने है. यही वजह है कि पूरी दुनिया आज बिजली बनाने के पर्यायी स्त्रातों को खोज रही है. इसी लिए हमारे देश में भी ॲटोमिक उर्जा की ओर ध्यान दिया जा रहा है.

ॲटोमिक एनर्जि बनाने से तथा रिएक्टर लगाने से क्या परिणाम हमारे समाज और लोगों पर होगा, यह विषय आज सरकार के सामने नहीं है, क्योंकि साइंटिफिक तथा सुरक्षित तरीके से ॲटोमिक एनर्जी तैयार की जा सकती है.

मैं कहना चाहूंगा कि कभी-कभी विमान गिर जाता है और उसमें सवार सभी यात्री मर भी जाते हैं. परन्तु सिर्फ विमान दुर्घटना के डर से कोई भी व्यक्ति विमान की यात्रा बंद नहीं



अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू.जमा....

करता है. हम लोग कोयला खदान में काम करते हैं तो वहां खदान में भी कई बार पानी भर जाता है या गैस का रिसाव हो जाता है. परन्तु सिर्फ दुर्घटना होने के भय से वहां भी लोग खदान से कोयला निकालना बंद नहीं करते. यह बात सही है कि सुरक्षा का विषय बहुत महत्वपूर्ण है. इसलिए गांव में रहने वाले लोगों की सुरक्षा भी निश्चित रुप से महत्वपूर्ण है. लेकिन हमें इस बात पर भी विचार करना आवश्यक है कि लगभग 100-150 साल बाद हमारे देश में उर्जा की स्थिति क्या होगी ? सरकार यदि अपने राज्य और देश को आगे ले जाने के लिए कोई साइंटिफिक ॲप्रोच या सही कदम उठाती है तो हमें तो उसका समर्थन करना चाहिए.

मेरा कहना है कि हमारे विदर्भ में कोल बेस्ड थर्मल पावर की जो कॅपेसिटी है,यानी विदर्भ में जितने मेगावाट बिजली के प्रोजेक्ट्स को मंजूरी दी गयी है उन प्रोजेक्ट्स के लिए जितना कोयला चाहिए, उतना कोयला हमारे पास उपलब्ध नहीं है. हमारे यहां पर नागपुर, चंद्रपुर और यवतमाल के वणी तालुका में कोयले की रिजर्व जरुर हैं. यह प्रुविंग प्रॉपर्टी है जिसको एक्सप्लोर किया गया है कि वहां पर कोयला है. लेकिन वहां कोई मेगा प्रोजेक्ट नही है. यह बात सही है कि देश के अलग-अलग हिस्सों मे कुछ कोल ब्लॉक्स हैं. लेकिन वैसा कोई मेगा कोल ब्लॉक विदर्भ क्षेत्र में नहीं हैं. इसलिए विदर्भ में जितने पावर पोजेक्टस को मंजूरी दी गयी है, उस संदर्भ में विदर्भ के एक कार्यकर्ता के रुप में हमारा मत है कि विदर्भ में किसी भी पॉवर प्लांट को मंजूरी देने की जरुरत नहीं है. क्योंकि वहां पर कोयला ही नहीं है तथा वहां पर पानी की उपलब्धता भी ज्यादा नहीं है. वहां पर मुश्किल से 17-18 प्रतिशत ही इरीगेशन की कॅपिसिटी है. यह बात सही है कि हमने डिसाइड किया है कि हम पीने के पानी और खेती के काम को प्रायर्टी देंगे और इन दो जरुरतों को पूरा करने के बाद ही हम किसी इंडस्ट्री को पानी देंगे. इस तरह का निर्णय हमारी सरकार ने लिया है.

मैं बतना चाहूंगा कि सरकारी कंपनी एनटीपीसी का जो पॉवर प्रोजेक्ट आ रहा है, उसकी कॅपिसिटी डबल कर दी गयी है. उसकी कॅपिसिटी अब 2230 मेगावाट हो गयी है. भारत सरकार ने एक हजार मेगावाट कॅपिसिटी में 1230 मेगावाट कॅपिसिटी और बढ़ा दी है. इसलिए उस

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू.जमा....

प्रोजेक्ट की कॅपिसिटी अब 2230 मेगावाट हो जाएगी. लेकिन उस प्रोजेक्ट के लिए आवश्यक कोयले की उपलब्धि वहां पर नहीं है. जिसकी वजह से उस प्रोजेक्ट के लिए कोयला उड़ीसा से लाया जा रहा है. निश्चित रुप से उस कोयले की कीमत हमें बहुत महंगी पड़ सकती है.

इसलिए इस बिल का समर्थन करने के साथ-साथ मैं शासन से मांग करना चाहता हूं कि सरकारी उपकरण या महाजेनको का कोई पॉवर प्रोजेक्ट जेनरेशन के लिए वहां आ रहा है तो वह बात मैं समझ सकता हूं, क्योंकि उसके लिए पानी और कोयले की व्यवस्था तो हमें करनी ही पड़ेगी. इसके अलावा केंद्र सरकार या एनटीपीसी के अंतर्गत वहां पर कोई प्रोजेक्ट लाया जा रहा है तो उसके लिए कोयले और पानी की व्यवस्था करना भी जरुरी है. लेकिन जब हमारी क्षमता कोयला और पानी देने की नहीं है तो फिर निजी पॉवर कंपनियों को विदर्भ में लाने से उसका उल्टा असर उस क्षेत्र में पड़ेगा. इस तरह के प्रोजेक्टस वहां पर लाने की वजह से उस जगह का वाटर लेवल नीचे जाने के साथ-साथ उससे वहां पर पॉल्यूशन भी बढ़ता है तथा स्वाभाविक रुप से वहां का पूरा वातावरण भी खराब होता है तथा वहां की इकॉलाजि भी खराब होती है. इसलिए हमें इन सब बातों का ख्याल रखना चाहिए तथा वहां पर निजी क्षेत्र के पॉवर प्रोजेक्ट्स पर पाबंदी लगाई जानी चाहिए. वहां पर सिर्फ एनटीपीसी तथा महाजेनको के जो सरकारी प्रोजेक्ट्स हैं, उन्हीं को परमीशन दी जानी चाहिए. यदि वहां पर प्राइवेट कंपनियों के ज्यादा पॉवर प्रोजेक्ट्स को परमीशन दी गयी तो उसका उल्टा असर हमारे विदर्भ पर पड़ेगा.

40 पैसे की लेवी डेढ़ रुपए कर देने से वहां पर ज्यादा पैसा इकट्ठा हो सकेगा तथा हम अपने किसानों को ज्यादा सहुलियत दे सकेंगे. हमारी सरकार आज भी किसानों को बहुत सारी सहूलियतें देती है.किसानों का बहुत सारा बिजली का बिल हमारी सरकार माफ कर देती है. हमारी सरकार किसानों के पंपों के लिए बिजली देने की व्यवस्था भी करती है. इसलिए गांवों में यदि लोड शेडिंग कम होती है तो उसका फायदा हमारे किसानों को अवश्य होगा. इसलिए मैं इस बिल का समर्थन करता हूं और अपनी बात यहीं पर समाप्त करता हूं. जय हिंद.

--0--

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय ऊर्जा राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी विधेयक क्रमांक 4 मांडले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

विजेच्या शुल्काच्या अत्यंत मर्यादित स्वरुपातील हे विधेयक असून त्यावर काही माननीय सदस्य व्यापक बोलले. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी कोकणामध्ये जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प नको म्हणून सांगितले तर सन्माननीय सदस्य श्री. जमा साहेबांनी विदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे कोळशावर आधारीत वीज प्रकल्प नको म्हणून सांगितले. त्यांनी मांडलेले विषय वेगवेगळे आहेत. याठिकाणी विजेचे शुल्क वाढविण्यासाठी 10 फेब्रुवारी रोजी काढण्यात आलेल्या अध्यादेशाचे विधेयकामध्ये रुपांतर करण्यासाठी हे विधेयक मांडले आहे. या विधेयकामुळे 40 पैसे असलेले शुल्क 1.50 पैसे होणार आहे, म्हणजे जवळपास चार पटींनी त्यामध्ये वाढ होणार आहे. विजेचा वापर कसा व्हावा याबाबत अनेक विचार मांडले जातात. शेतकऱ्यांसारख्या उपभोक्त्यांना योग्य सूट देण्यासाठी आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी या शुल्काचा वापर व्हावा.

मी आपल्यामार्फत माननीय राज्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, या वाढीमधून आपल्याला मिळणारी रक्कम किती आहे, व तिचा वापर आपण कसा करणार आहात? जर आपल्याला पायाभूत सुविधा सुधारावयाच्या असतील तर आपल्याला कंडक्टर्स बदलावे लागतील. आपल्याला सब स्टेशन्स वाढवावे लागतील. त्याचे शासनाकडे नियोजन आहे काय? यामधून मिळणारा पैसा किती आणि त्याचा वापर कशापध्दतीने करणार या बाबत आपल्या भाषणामध्ये सांगितले पाहिजे. विजेचे शुल्क चार पटींनी वाढल्यानंतर ही वीज महाग होणार आहे त्यामधून महागाई वाढणार आहे अशाप्रकारचा एक विचार येऊ शकतो तो चुकीचा आहे असे मी म्हणणार नाही. माझी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती आहे की ही सौर ऊर्जा स्वस्त कशी होईल याचा विचार करा. The Capital expenditure is very heavy and Revenue expenditure is negligible. घराच्या वर सौर ऊर्जेचे उपकरण बसविले तर त्यासाठी खर्च फार येतो, परंतु त्याचे आपल्याला बिल येत नाही ही गोष्ट अलाहिदा आहे. यामधील काही रक्कम संशोधनासाठी राखून ठेवून सौर ऊर्जा निर्मितीकरिता लागणारी उपकरणे स्वस्त कशी होतील यावर संशोधन झाले पाहिजे. तसे झाले तर इतर प्रकल्प मागे पुढे झाले किंवा कमी जास्त झाले तरी हरकत नाही परंतु याबाबत आपले

श्री. अरुण गुजराथी....

शासन आणि केंद्र शासन संशोधन करीत आहे काय? याचाही आपल्या भाषणामध्ये उल्लेख झाला पाहिजे.

डिसेंबर 2012 अखेर पर्यंत राज्यातील भार नियमन बंद होईल असे शासनाकडून सांगितले जाते. वीज स्वस्त कशी होईल, सततची वीज आणि त्याचबरोबर स्वस्त वीज मिळाली पाहिजे. ज्या राज्यामध्ये दरडोई वीज वापरली जाते त्यावरुन ते राज्य किती प्रगत आहे हे समजले जाते. त्यामध्ये पंजाब पहिल्या क्रमांकावर आहे, दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर आहे तर महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. दरडोई विजेचा वापर वाढविण्या संदर्भात आपण विचार करीत असतांना लाकूड, कोळसा, डिझेल, पेट्रोल यापेक्षा वीज स्वस्त पडते. यामुळे प्रत्येक माणूस विजेचा वापर जास्त प्रमाणात करण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, वीज मंडळामार्फत विजेचे उत्पादन होते त्यावर शुल्क लागणार आहे की नाही? या विधेयकामध्ये आपण म्हटले आहे की, "लायसनदार नसलेल्या व ऊर्जेचे उत्पादन करणाऱ्या व ती ऊर्जा अन्य कोणत्याही व्यक्तीला त्या अन्य व्यक्तीच्या वापरासाठी विनामूल्य पुरविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत आणि लायसनदार नसून स्वत:च्या उपयोगासाठी ऊर्जेचे उत्पादन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत आकारणीयोग्य असलेल्या विद्युत शुल्काचा दर....". सभापती महोदय, साखर कारखाने विजेचे उत्पादन करतात, त्यांना ही इलेक्ट्रिसिटी डयुटी लागेल किंवा स्वत: जनरेटर सेट वापरुन इलेक्ट्रिसिटी वापरतात त्यांना इलेक्ट्रिसिटी डयुटी लागेल. म्हणजेच साखर कारखान्याच्या माध्यामतून उत्पादीत होणाऱ्या विजेवर 1.50 पैसे शुल्क लागणार आहे. त्याप्रमाणे खाजगी कारखान्यांनी डिझेल सेटच्या माध्यमातून विजेचे उत्पादन केले तर त्यामधून फार मोठे वीज शुल्काव्दारे उत्पन्न मिळेल असे वाटत नाही. वीज मंडळाने उत्पादन केलेल्या विजेच्या शुल्कामध्ये वाढ केली असती तर फार मोठया प्रमाणात आपल्याला उत्पन्न मिळाले असते, आपल्याला कोटयवधी रुपये मिळाले असते. या बाबत आपण खुलासा केला पाहिजे. या बाबत पुढील नियोजन कशापध्दतीने होणार आहे याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने उद्योगांवर लावण्यात आलेले वीज शुल्क माफ केले आहे. लहान उद्योजक, एस.एस.आय. युनिटना सात वर्षापर्यन्तचे विजेचे शुल्क माफ केले आहे. त्यांचा परतावा लवकर मिळत नाही या साठी आपण लक्ष घातले पाहिजे. 20-20, 50-50 हॉर्स पॉवर्सच्या लहान लहान उद्योगांकडून अर्ज आल्यानंतर व वर्ष संपल्यानंतर अमुक इतक्या कालावधीच्या आत



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

त्यांना परतावा मिळेल यासाठी आपण नियम केला पाहिजे. तसे केले तर त्याचा फायदा उद्योजकांना मिळेल.

सभापती महोदय, खानदेशामध्ये दोंडाईचा मध्ये 500 मेगावॅट सौर ऊर्जेचा प्रकल्प सुरु होणार असल्याचे समजल्यामुळे मला आनंद झाला होता. या ठिकाणी पालक मंत्री माननीय श्री. गुलाबराव देवकर साहेब बसले आहेत. खानदेशामध्ये भुसावळ येथे कोळशावर आधारीत वीज प्रकल्प आहे. ज्या ठिकाणी अशाप्रकारे विजेचे केंद्र आहेत त्या ठिकाणी पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झ ाला आहे. आता मिळालेल्या माहितीनुसार दोंडाईचा येथे सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण होणार नाही. त्यामध्ये अडचणी काय आहेत या आपल्याला समजल्या पाहिजेत. जर आपल्याला 500 मेगावॅटचा प्रकल्प करावयाचा नसेल तर 250 मेगावॅटचा करा, 100 मेगावॅटचा प्रकल्प करा. परंतु आपण दोंडाईचा येथे सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याचा प्रयत्न करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, शेतकऱ्यांना कॅपॅसिटर बसविण्यास लावले पाहिजे, उद्योजकांना कॅपॅसिटर बसविण्यास लावले पाहिजे. हे कॅपॅसिटर वीज उप केंद्रामध्ये लावले पाहिजेत. ही तांत्रिक बाब असून शेतकऱ्यांना जर कॅपॅसिटर लावण्याची गरज पडणार नसेल तर या करामधून मिळणाऱ्या रकमेचा वापर आपण त्यासाठी करावा अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय,1977 चा कायदा संमत करण्यात आला त्यावेळी भविष्यलक्षी आणि भूतलक्षी अशा दोन बाबी त्यामध्ये मांडल्या होत्या. या ठिकाणी 1.50 पैसे कर वाढणार आहे तो पूर्वलक्षी प्रभावाने वाढणार नाही या बाबत आपण स्पष्टीकरण करावे.. या विजेच्या शुल्कामधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर चांगल्या प्रकारे झाला तर मला येथे असे सांगावेसे वाटते "To improve quality of life, quality of electricity is very important.". विजेच्या पुरवठयाचा दर्जा सुधारेल अशी अपेक्षा व्यक्त करुन आपण मांडलेल्या विधेयकाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

-----

(यानंतर श्री. अजित शिगम)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2012 चे विधेयक क्रमांक 4 मुंबई वीज शुल्क अधिनियम 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता जे विधेयक सभागृहात मांडण्यात आलेले आहे त्याला विरोध करण्यासाठी आणि काही सूचना करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रात जवळपास 4 हजार मेगावॅट विजेचा तुटवडा आहे. मागील दहा वर्षापासून राज्यात जी विजेची तूट निर्माण झालेली आहे ती भरुन काढण्यासाठी शासन वेगवेगळ्या तऱ्हेने प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, या विधेयकाद्वारे 40 पैशावरुन 1 रुपया 50 पैशांची शुल्क वाढ केलेली आहे. स्वत: वीज उत्पादन करुन तिचा वापर करणारे उद्योग हे बहुतांश शेती व्यवसायाशी निगडीत आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादक शेतकरी आहेत. राज्यातील काही साखर कारखाने स्वत: वीज निर्मिती करीत आहेत. जे साखर कारखाने स्वत: वीज निर्मिती करुन शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीत जास्त भाव देण्याचा प्रयत्न करीत आहेत किंवा सरकारने जो हमी भाव ठरवून दिलेला आहे तो हमी भाव देणे वीज निर्मितीमुळे शक्य होत आहे. तेव्हा अशा वीज निर्मितीला नवीन दर लागू केला जाणार आहे काय याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. कॅप्टीव्ह कन्झ्युमरमध्ये जे काही उद्योग असतील मग त्यामध्ये साखर कारखाने असतील, सूत गिरण्या असतील, तेलबियांवर प्रक्रिया करणारे उद्योग असतील, फळ भाज्यांवर प्रक्रिया करणारे उद्योग असतील या सर्व उद्योगांना हे दर लागू होणार आहेत. याचा सर्वसामान्य शेतकऱ्यांवर परिणाम होणार आहे. एकीकडे वीज नाही आणि जी वीज मिळते त्यावर शेती करुन आपले उत्पादन वाढवावयाचे आणि त्यावर आता हा भार लावावयाचा हे योग्य नाही. यासाठी मी या विधेयकाला विरोध करीत आहे.

सभापती महोदय, एका बाजूला विजेची प्रचंड मागणी असताना दुसरीकडे जे उद्योग स्वत:ला लागणारी वीज स्वत: निर्माण करीत आहेत त्यांना सुध्दा हा दर लागू होणार आहे. हा कोणता न्याय आहे ? मला लागणारी वीज मी स्वत: निर्माण करुन स्वत: वापरत असेन व त्यासाठी मला 1 रुपया 50 पैसे द्यावे लागणार असतील तर शेतीवर आधारित असणारा उद्योग आणि शेतकरी जीवंत राहणार नाहीत अशी परिस्थिती भविष्यात निर्माण होईल. शेतीवर उभे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राहणारे उद्योग जर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव देऊ शकत नसतील तर त्या उद्योगांचा काय उपयोग, याचा देखील सरकारने विचार केला पाहिजे. तेव्हा स्वत: वीज निर्मिती करुन स्वत: वीज वापरणाऱ्या उद्योगांना शासन सूट देणार आहे काय ? बायोमास बेस गॅस निर्माण करणारे जे मोठमोठे उद्योग आहे त्यांना देखील शासन सूट देणार आहे काय ?

सभापती महोदय, आपण पवन ऊर्जेला सबसिडी दिलेली आहे. तेव्हा पवन ऊर्जेद्वारे निर्माण होणाऱ्या विजेवर देखील हा दर आकारणार आहे काय ? शासन एकीकडे सबसिडी देत आहे तर दुसरीकडे असा दर लावत आहे हा पूर्णपणे विरोधाभास आहे.

सभापती महोदय, सोलर सिस्टीमच्या बाबतीत देखील हाच मुद्दा आहे. सामान्य माणूस आपल्या इमारतीच्या गच्चीवर गरम पाण्यासाठी सोलर बसवितो. त्यावर देखील शासन दर आकारणार असेल तर ते योग्य नाही. तेव्हा मी या विधेयकाला विरोध करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 4 मुंबई वीज शुल्क विधेयक 2012 वर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या विधेयकाची प्राथमिक माहिती घेतली तेव्हा हा प्रश्न फक्त मध्यमवर्गीया पुरता आहे की काय असे मला वाटले. गेल्या काही वर्षामध्ये लोकांनी अनेक प्रयोग केलेले आहेत. आपल्याला माहीत आहे की, इंजिनिअरींग कॉलेजच्या प्रांगणामध्ये काही विद्यार्थ्यांनी सायकल चालवून त्यातून वीज निर्मिती करता येते हे दाखवून दिलेले आहे. त्या शिवाय एका बाजूला झ ोक्यावर बसून मुलगा उंच झोका घेत आहे आणि बाजूला अगदी छोट्या छोट्या कारणासाठी लागणारी वीज त्यातून निर्माण करण्यात येते हे दाखवून दिलेले आहे. असे अनेक सर्जनशील प्रयोग महाराष्ट्रामध्ये झालेले आहेत आणि शासन बायो डायव्हरसिटीला चालना देण्याचे प्रयत्न करीत असते.

सभापती महोदय, माझे तीन मुद्दे आहेत. पहिला भाग असा की, एकीकडे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, पायाभूत सुविधा देण्यामध्ये महाराष्ट्र राज्य कमी पडत असल्यामुळे काही उद्योग राज्याबाहेर जात आहेत. तर दुसरीकडे जे उद्योग स्वत:पुरती वीज निर्मिती करीत आहेत त्यांना सुध्दा आपण शुल्क लावत आहोत.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा म्हणजे गोरगरिबांच्या दृष्टीने ही बाब भयावह आहे कारण शासनाने कमाल दराच्या चौपट भाववाढ केलेली आहे. भाववाढ किती करायची या संदर्भात शृंगलु समितीने म्हटले आहे की, बहुतेक ठिकाणी राज्य वीज नियामक आयोगाने आणि वीज वितरण कंपन्यांनी आर्थिकस्थिती विषयी प्रमाणकांचे योग्य मूल्यमापन न केल्यामुळे आणि स्थानिक राज्य सरकारांच्या प्रभावाखाली निर्णय घेतल्यामुळे वीज दरवाढीचे निर्णय वेळोवेळी घेतले गेले. काही वेळेला दरामध्ये प्रचंड दरवाढ केली गेली. त्यामुळे नियमित स्वरुपाचे दर राहिले नाहीत. नियमित स्वरुपाचे दर नसल्यामुळे आपण वेगवेगळ्या आर्बिटरी स्वरुपाचे निर्णय घेत आहोत. आपण एका बाजूला पायाभूत सुविधा देत नाही तर दुसरीकडे अशी दरवाढ करीत आहोत.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात काल माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी निदर्शनास आणले होते की, सन 1997 मध्ये जो "ग" भाग दाखल केला तो "ग" ऐवजी "छ" असावयास



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

पाहिजे होता. आम्ही टीका करु इच्छित नाही. आपणास स्पष्ट दिसत आहे की, भाग "छ" ऐवजी भाग"ग" जोडला गेला आहे. यामध्ये दुरुस्ती केली की नाही याची मंत्री महोदय काहीही माहिती न देता हे विधेयक मंजूर करण्याकरिता आग्रह धरत आहेत. या विधेयकाला आमचा विरोध असला तरी सरकार बहुमताच्या जोरावर हे विधेयक मंजूर करेल. मी या निमित्ताने एक बाब सांगू इच्छिते की, परीक्षेमध्ये विद्यार्थ्याने चूक केल्यास त्याचे गुण कापले जातात, तो नापास होऊ शकतो. परंतु शासनामध्ये इतके अधिक्ारी असताना सन 1997 मध्ये केलेली चूक कोणत्याही अधिक्ाऱ्याच्या लक्षात आली नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांची ही बाब लक्षात आणून दिल्यानंतरही सुधारित प्रत देण्याची तसदी सरकारकडून घेण्यात आलेली नाही. विधेयक मांडताना मंत्री महोदयांनी सांगावयास पाहिजे होते की, आम्ही दुरुस्ती करणार आहोत. परंतु तसे काही झाले नाही. तेव्हा या विधेयकावरील चर्चा संपण्यापूर्वी वस्तुस्थिती मांडली गेली पाहिजे.

सभापती महोदय, अतिरिक्त संपदा वाढविण्यासाठी हे शुल्क वाढविलेले आहे. यामधून शासन कोणती अतिरिक्त संपदा उभारणार आहे ? राज्यात मोठ्या प्रमाणावर वीज गळती होत आहे, ती संपदा सुध्दा वाया जात आहे. विजेची कशाप्रकारे बचत करण्यात येईल याची कोणतीही रुपरेषा येथे मांडलेली नाही.

सभापती महोदय, अन्य व्यक्तींच्या वापरासाठी विनामूल्य वीज पुरविणाऱ्या व्यक्तींवर सुध्दा शासन शुल्क आकारणार आहे, हा भयंकर प्रकार आहे. म्हणजे आम्ही बाहेरुन धान्य विकत घेऊन घरी स्वयंपाक बनविल्यानंतर त्यावर कर लावल्यासारखा हा प्रकार आहे. आपण चरख्यावर कापड तयार केले असते त्या कापडावर देखील शासनाने कर लावला असता आणि सांगितले असते की, आपण जरी घरी विनामूल्य कापड बनवित असला तरी किंवा दुसऱ्यांना विनामूल्य कापड देत असला तरी आपणास त्याचे शुल्क दिले पाहिजे.

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

हा कोणता कायदा व कशा पध्दतीने शासन आणत आहे ?

जे सौर ऊर्जा निर्माण करणारे आहेत, जे वेगवेगळे प्रयोग करणारे लोक आहेत, त्यांचा आपल्यापुरती वीजनिर्मिती करण्यासाठी रस आहे. अशा लोकांचे संपूर्ण कंबरडे मोडणार आहे. सर्जनशील लोकांना छोट्या छोट्या प्रयोगातून वीजनिर्मिती होऊ शकेल असे वाटत होते. त्यांना कोणताही फायदा होणार नाही उलट त्यांचा तोटा होणार आहे. त्याचबरोबर उद्योजकांचेही कंबरडे मोडणार आहे. याखेरीज बाकीच्या सोर्सवर अवलंबून रहावयाचे म्हटले तर भारनियमन आहे. लोकांनी स्वत: वीज तयार केली तरीही त्यावर शुल्क वाढविले जात आहे. आपण स्वत:च्या विकासाऐवजी अधोगतीकडे वाटचाल करतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून मी या विधेयकाद्वारे प्रस्तावित केलेल्या दरवाढीला विरोध करते आणि माझे दोन शब्द संपविते.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 4, मुंबई वीज शुल्क (सुधारणा) विधेयक 2012 या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, वीज कंपनीने आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे असे मी सुरुवातीलाच सांगतो. ज्यावेळी राज्य सरकारने शेतकऱ्यांना विजेच्या बिलामध्ये सवलत दिली होती त्यावेळी आम्हाला असे वाटले होते की, सरकार स्वत:च्या अन्य आर्थिक सोर्समधून हा खर्च भरुन काढेल. वीज कंपनीने आत्मपरीक्षण केले पाहिजे असे मी का म्हणालो आहे त्याचे कारण सांगतो. वीज मंडळामार्फत वेगवेगळया वस्तुंची खरेदी केली जाते त्यामध्ये सर्वात मोठा आयटम कोळसा हा आहे. कोळशाच्या चोरीवर एक टक्का नियंत्रण आणून चोरी थांबविली तरी शासनाला करवाढ करण्याची गरज भासणार नाही. यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे बोलतील अशी माझी अपेक्षा होती. कारण या विषयावर ते माझ्यापेक्षा अधिक अभ्यासपूर्ण विचार मांडू शकतात.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी ऊर्जा खात्याचा कारभार हातामध्ये घेतला त्यावेळी आमची त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा होती. वीज मंडळामध्ये कोळशाची होत असलेली चोरी व तेथे होणारा भ्रष्टाचार थांबेल असे वाटले होते. या वीज मंडळाकडून अनेक वस्तुंची करोडो रुपयांची खरेदी केली जाते. ही खरेदी बाजारभावापेक्षा अधिक दराने केली जाते. या वीजनिर्मिती केंद्रांना इंडियन कोल दिला जातो त्याच्या दर्जाची, वजनाची व ग्रेडची पाहणी केल्याचे निदर्शनास आलेले नाही. मी या सभागृहामध्ये हा विषय 10-12 वर्षांमध्ये अनेकवेळा मांडलेला आहे. या तिन्ही गोष्टींची पाहणी केल्यामुळे वीज मंडळाचा आर्थिक फायदा झाला, वीजनिर्मिती कमी होत होती त्यामध्ये वाढ झाली आहे असे कोठेही दिसून आलेले नाही. या करवाढीमुळे सरकारला किती करोड रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे त्याचा या विधेयकात कोठेही उल्लेख केलेला नाही. या खरेदीचे निरीक्षण करणारी व नियंत्रण ठेवणारी यंत्रणा उभी केली पाहिजे. त्यामुळे वीज मंडळाला होणारे नुकसान टाळू शकेल. दिवसेंदिवस विजेचे दर वाढत जाणार आहेत. कारण आपल्याला परदेशातूनच कोळसा आणावा लागणार आहे. देशातील कोळशाच्या खाणी कमी होत आहेत. परवाच इंडोनेशियामध्ये झालेला भूकंप हा कोळशाच्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

उत्खननामुळे झालेला आहे असे माझे म्हणणे आहे. आपल्या देशाला जवळ असलेले देश म्हणजे इंडोनेशिया, चीन व त्यानंतर ऑस्ट्रेलिया हे आहेत. या देशांमधून कोळसा आयात केला जातो. ऑस्ट्रेलियातील कोळसा चांगल्या दर्जाचा आहे. परंतु आपल्याला तो लॉजिस्टिकली परवडत नाही म्हणून आपल्याला इंडोनेशियाचा कोळसा घ्यावा लागतो. त्याचा पुढील 25-30 वर्षासाठी शासनाने विचार केल्याचे दिसत नाही. सन्माननीय ऊर्जा राज्यमंत्री हे नवीन आहेत. परंतु माननीय ऊर्जा मंत्री श्री.अजित पवार यांच्याकडून आमची वेगळी अपेक्षा होती. या खरेदीवर नियंत्रण येईल व वीज मंडळाची प्रगती होईल असे वाटले होते.

जे सिंचनासाठी प्रकल्प सुरु केले जातात त्यातून जलविद्युत निर्मितीसाठी पुढाकार घेतल्याचे दिसून आले नाही, त्यासाठी नियोजन केल्याचे दिसून आले नाही. गेल्या 10-12 वर्षापासून एकही जलविद्युत प्रकल्प शासनाने उभा केलेला नाही. जलविद्युत ही सर्वात स्वस्त आहे. परंतु त्याचा या विधेयकात उल्लेख केलेला नाही. केवळ करवाढ करुन जनतेकडून पैसे घेऊन हे राज्य चालवू नये. स्वत:चे उत्पन्न वाढवून या वीज कंपनीला फायद्यात आणले पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे सरकारचे होते. राज्य शासन हे वीज मंडळ चालवित होते. त्या वीज मंडळाच्या सरकारने 3 कंपन्या केल्या आहेत. कंपन्या तयार केल्यानंतर त्यांना फायदा होईल, प्रशासनामध्ये सुधारणा होईल असे आम्हाला वाटले होते. परंतु प्रशासनात सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही. या कंपन्यांचा कारभार सरकारी कारभाराप्रमाणेच सुरु आहे. शासनाने ही करवाढ करण्याची गरज नव्हती. शासनाने आत्मचिंतन करुन, निरीक्षण करुन कारभार केला असता तर कारभारात सुधारणा झाली असती. शासनाने आम्हाला चर्चेसाठी बोलविले तर आम्ही मार्ग सुचवू शकतो. चोऱ्यांची प्रकरणे दाखवू शकतो, त्यामुळे प्रस्तावित करवाढ थांबविता येईल. शासनाने वीज बिलामध्ये सवलत दिली त्यावेळीच शासनावर पडलेला बोजा इतर मार्गाने भरुन काढला जाईल असे शासनाने जाहीर करणे आवश्यक होते. भविष्यात ही दरवाढ होणार आहे हे माहीत असते तर शेतकऱ्यांनी किंवा आम्ही सवलतीची मागणीच केली नसती. आता शासन शेतकऱ्यांकडून व जनतेच्या खिशातून पैसा वसूल करणार आहे.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, जे कॅप्टिव्ह प्रकल्प आहेत ते या राज्यात शेतकऱ्यांच्या संस्थांचेच आहेत. साखर कारखानदारांकडून खाजगी पध्दतीने वीजनिर्मिती होत आहे. माझ्या कंपनीमध्ये जनरेटर असेल तर त्याचे अकाऊंटिंग मिळू शकणार नाही. ते जनरेटर किती चालले आणि चालले की नाही त्याची माहिती मिळू शकणार नाही. त्यामुळे भ्रष्टाचार वाढणार आहे. एखादा जनरेटर 100 मेगावॉटचा असेल किंवा 25 मेगावॉटचा असेल त्या ठिकाणी ऊर्जा खात्याचे अधिकारी आल्यावर वापरलेली वीज कमी दाखविण्याचा प्रकार होऊ शकतो. त्यावर शासन कशा प्रकारे नियंत्रण ठेवणार आहे ते मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणातून सांगितले पाहिजे. केवळ करवाढ करुन चालणार नाही. या करवाढीमुळे भ्रष्टाचार वाढणार आहे. याकडे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. सरकारच्या कल्पनेला व या विधेयकाला माझा विरोध आहे. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, हे विधेयक मागे घ्यावे. शेतकऱ्यांना सवलती देण्यासाठी शेतकऱ्यांच्याच खिशातून पैसे काढण्याचा उद्योग हे शासन करीत असल्यामुळे मी या विधेयकाला विरोध करुन माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 4 - मुंबई वीज शुल्क अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता जे विधेयक मांडलेले आहे त्या विधेयकावरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, अरुण गुजराथी, एस.क्यू.जमा, धनंजय मुंडे, डॉ. नीलम गोऱ्हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील या सर्व सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला आणि या माध्यमातून मला काही चांगल्या सूचना सुध्दा प्राप्त झालेल्या आहेत. या बिलाच्या माध्यमातून आपण जी सुधारणा करीत आहोत त्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना जी विसंगती दिसते ती समजून घ्यावयास पाहिजे. त्या संदर्भात मी थोडक्यात सांगू इच्छितो. जे स्वत: वीज निर्मिती करुन स्वत:च वापर करतात असे कॅप्टीव वीज निर्मिती प्रकल्प उदा. स्पॉंज आयर्न प्लांट मध्ये त्यांच्या बॉयलरमधून वीज निर्मिती होते आणि त्या विजेचा वापर त्याच स्पॉंज आयर्न प्लांटसाठी होत असेल अशा कॅप्टीव वीज निर्मिती प्रकल्पाला आपण जी शुल्क आकारणी करीत होतो त्याची मर्यादा 40 पैसे प्रती युनिट होती परंतु आपण आकारणी मात्र 30 पैसे प्रती युनिट करीत होतो. त्याचे सिलिंग मात्र 40 पैसे प्रती युनिट होते. आता ते सिलिंग किंवा ती मर्यादा वाढवून 1 रुपया 50 पैसे प्रती युनिट केलेली आहे. आकारणीमध्ये अजून फरक केलेला नाही. आकारणी 30 पैसे प्रती युनिट अशीच आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये को-जनरेशनच्या माध्यमातून म्हणजे बगॅस आणि चिपाडाच्या माध्यमातून जी वीज निर्मिती होते त्यांच्या बाबतीत शुल्क वाढ होणार आहे का असा मुद्दा उपस्थित केला. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अशा प्रकारे को-जनरेशनच्या माध्यमातून कॅप्टीव वीज निर्मिती जी एकापेक्षा अधिक इंधन वापरुन केली जाते त्यामध्ये ऊसाचे चिपाड आणि बगॅसच्या माध्यमातून वीज निर्मिती करतात आणि वापरतात अशांवर विद्युत शुल्क आकारण्यात येणार नाही. मी अत्यंत स्पष्टपणे सांगू इच्छितो की, ज्या उद्योगधंद्यामध्ये अशा प्रकारची वीज निर्मिती होते त्याच ठिकाणी अशा प्रकारची शुल्क आकारणी करण्यात येते. शेतीच्या बाबतीत दीड ते दोन रुपये प्रती युनिट खर्च होत आहे. त्याच बरोबर घरगुती वापरावर आपण 2.75 रुपये ते 3.25 रुपये, व्यावसायिक वापरावर 6 ते 8 रुपये, औद्योगिक वापरावर 4.50 रुपये ते साडेसहा रुपये याप्रमाणे खर्च होत आहे. सध्या राज्यात वीज पुरवठ्याचा सरासरी दर

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

साडेचार रुपये प्रती युनिट आहे. म्हणजे ही बास्केट कॉस्ट आहे. सर्व स्त्रोतातून निर्माण झालेली ही कॉस्ट आहे.

मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपण शेतकऱ्यांना जी विजेची सबसिडी देतो त्या सबसिडीपोटी या वर्षी राज्य शासनाने जवळपास साडेतीन हजार कोटी रुपये मंडळाला दिलेले आहेत. 1995 मध्ये राज्यात युतीचे शासन असताना ही कॅप्टीवची पॉलिसी आली होती. त्यावेळी कॅप्टीव पॉलिसी का आणण्यात आली ? त्यावेळी विजेचा तुटवडा मोठ्या प्रमाणात होता म्हणून राज्य शासनाच्या पूलमधून उद्योगधंद्यांना वीज देण्यापेक्षा त्यांनीच स्वत:च आपल्या उद्योगधंद्यामध्ये वीज निर्मिती केली तर त्या कॅप्टीव वीज निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे काम त्या काळात झाले. मध्यंतरीच्या काळात एन्रॉनसारखा प्रकल्प आला. तो प्रकल्प थांबविण्याचे काम काही लोकांनी केले. आताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सांगितले की, एन्रॉनचा राज्याला कोणत्याही स्वरुपात फायदा होत नाही. मी सांगू इच्छितो की, एन्रॉनकडून आपल्याला 900 मेगावॅट वीज प्राप्त होत आहे आणि गॅसची उपलब्धता जर वाढली तर आपण एन्रॉनकडून 1100 मेगावॅट वीज प्राप्त करु शकतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात बोलताना जैतापूर प्रकल्पाची गरज काय असा मुद्दा उपस्थित केला. एक काळ असा येणार आहे की, ज्यावेळी आपल्याकडे वीज निर्मिती करण्यासाठी कोळसाच शिल्लक राहणार नाही त्यामुळे आपल्याला नवीन सोर्सेस आयडेंटिफाय करावे लागणार आहेत. सध्या जगभरामध्ये जो प्रमुख सोर्स आहे तो न्युक्लिअर पॉवर आहे. न्युक्लिअर पॉवर हे भविष्य आहे आणि ते आपल्याला नाकारता येणार नाही. त्यामध्ये सुरक्षिततेच्या अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. त्या संदर्भात दिवसेंदिवस नियमित संशोधन होत आहे आणि त्या संशोधनाच्या माध्यमातून जैतापूरचा विद्युत प्रकल्प कसा सुरक्षित होऊ शकतो या संदर्भात शासन निश्चितपणे कटिबद्ध आहे. तसे पाहिले तर जैतापूरची साईट ही सर्वात सुरक्षित आहे. जगामध्ये सुरक्षित साईट जर कोणती असेल तर ती जैतापूरची आहे. समुद्र सपाटीपासून 20 मीटर उंचीवर असणारी ही साईट आहे. आपण संपूर्ण नवीन तंत्रज्ञानाचा वापर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजेंद्र मुळक ......

करुन जैतापूरचा प्रकल्प स्थापन करणार आहोत. तसे पाहिले तर या बिलामध्ये त्या विषयाचा संबंध नाही तरी सुध्दा या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी त्या विषयावर चर्चा केली असल्यामुळे त्या संदर्भामध्ये माहिती देणे आवश्यक होते.

सभापती महोदय, हे वीज शुल्क वाढल्यामुळे इतर कोणावरही जास्त अधिभार लागेल अशा प्रकारची बाब नाही. यामध्ये फक्त कॅप्टीव वीज निर्मिती प्रकल्पांमधून जी वीज निर्मिती होणार आहे त्यांच्याच बाबतीत फक्त सिलिंगची 40 पैशाची मर्यादा 1 रुपया 50 पैसे करीत आहोत. आकारणी आजही 30 पैसेच आहे. ज्यावेळी योग्य वेळ येईल आणि आवश्यकता वाटेल त्यावेळी ती आकारणी वाढविता येईल. ती आकारणी वाढवित असताना जर सिलिंगची मर्यादा 40 पैसेच राहिली तर आपण ती आकारणी वाढवू शकणार नाही. म्हणून आपण सिलिंगची मर्यादा 1 रुपये 50 पैसे केलेली आहे. त्यामुळे याचा इतरांवर खूप काही भार पडणार नाही. यामधून निश्चितपणे काही प्रमाणात महसूल आपल्याला प्राप्त होईल. त्या पैशातून आपले जे क्षमता वाढीचे कार्यक्रम सुरु आहेत त्या कामांना आपण मदत करु शकतो. इन्फ्रास्ट्रक्चरच्या कामांना मदत करु शकतो. आपली इन्फ्रास्ट्रक्चरची जी नियमित कामे सुरु आहेत त्यामध्येही आपल्याला मदत होणार आहे. यामधून खूप मोठ्या प्रमाणावर महसूल मिळणार आहे अशातील भाग नाही. परंतु या माध्यमातून जो काही महसूल मिळणार आहे तो इन्फ्रास्ट्रक्चरच्या कामावरच वापरणार आहोत.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी कोराडी, खापरखेडा प्रकल्पाबाबत सांगितले तसेच विदर्भामध्ये आता प्रकल्पांची आवश्यकता नाही असेही सांगितले. राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार साहेब यांनी अत्यंत स्पष्टपणे सांगितले आहे की, ज्या जिल्ह्यातील, ज्या तालुक्यातील पर्यावरणाची हे सर्व सहन करण्याची कॅपॅसिटी संपली असेल अशा भागांमध्ये कोणत्याही स्वरुपात प्रकल्प येणार नाहीत. आपले महाजनकोचे जे प्लांट आहेत त्या ठिकाणीच आपण क्षमतावाढ करीत आहोत. आज कोराडीमध्ये क्षमतावाढ सुरु आहे. खापरखेडा येथे आपण नव्याने 500 मेगावॅटची क्षमतावाढ करीत आहोत. येत्या पंधरा ते वीस दिवसामध्ये त्याची सुरुवात करणार आहोत. त्याचे सिंक्रोनायझेशनचे काम पूर्ण झालेले आहे. एनटीपीसीच्या मौदा येथील प्रकल्पाच्या सिंक्रोनायझेशनचे काम शेवटच्या

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

टप्प्यावर आहे. मौद्याचा वीज निर्मिती प्रकल्प सुरु झाल्यानंतर त्यातून आपल्याला वीज मिळणार आहे. परळी वीज निर्मिती केद्रातून आपल्याला वीज मिळणार आहे. पारसमधून वीज मिळणार आहे. भुसावळमध्ये नव्याने क्षमतावाढ केलेली आहे आणि त्यातून आपल्याला वीज मिळणार आहे. आपली स्वत:चे वीज निर्मिती करणारे जे प्रकल्प आहेत त्यामध्ये मोठ्या प्रमाणात क्षमतावाढ करीत आहोत. 2012 पर्यंत हे राज्य भारनियमनमुक्त कसे होऊ शकेल या दृष्टीने अत्यंत सुरळीतपणे वाटचाल सुरु आहे.

केवळ 2012 पर्यंतच थांबून चालणार नाही तर पुढील पाच वर्षाचा कार्यक्रम सुध्दा आपण निश्चित केलेला आहे. 2020 पर्यंत कोणकोणते प्रकल्प येतील, आपल्या स्वत:च्या जनरेशन कंपनीचे कोणकोणते प्रकल्प येतील, कोठे कोठे आपली क्षमतावाढ होणार आहे, या संदर्भात देखील संपूर्ण आराखडा तयार केलेला आहे. त्या आराखड्याच्या माध्यमातून या राज्यामध्ये आपल्याला नियमितपणे वीज मिळत राहावी, आपल्याकडे नियमितपणे चांगला कोळसा येत राहिला पाहिजे, अशा पध्दतीने या वीज निर्मिती प्रकल्पांच्या आणि वीज निर्मितीच्या संदर्भामध्ये राज्य शासन आणि आमचे महामंडळ कटिबद्ध आहे, हे मी सांगू इच्छितो. माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, मुंबई वीज शुल्क अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता आणलेल्या विधेयकाला सर्वांनी सहमती द्यावी.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:45

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडाश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी त्या मांडाव्यात.

(खंड 2 व 3, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीतून तयार केल्या जाणा-या रोपवाटीकांना "डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटीका" असे नाव देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**मु.शी.**: महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीतून तयार केल्या जाणा-या रोपवाटीकांना "डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटीका" असे नाव देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय यासंबंधी माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे निवेदन

डॉ. नितीन राऊत (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:45

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील व कपिल पाटील यांनी "राज्याला मिळणा-या एकूण रॉकेलच्या नियतनात कपात केली जात असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील व भगवान साळुंखे यांनी "राज्यात पदवीधर प्रशिक्षित संगीत शिक्षकांना पदवीधर शिक्षकाची वेतनश्रेणी देण्यात न येणे, तसेच संगीत शिक्षकांना अद्यापपावेतो त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किशनचंद तनवाणी, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील व रामनाथ मोते यांनी "दिनांक 11 एप्रिल 2012 रोजी मालाड रेल्वे स्थानकाजवळील पादचारी पुलावर सोने व्यापारी श्री. पारस परमार व त्याचा नातेवाईक श्री. हेमंत बिष्णोई यांची अज्ञात इसमांनी केलेली निर्घृण हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "मुंबई उपनगरातील चेंबूर येथे रेशनकार्ड बनविण्यासाठी फे-या मारणा-या एका 30 वर्षीय महिलेवर एका रेशनकार्ड बनविणा-या एजंटने बलात्कार केल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर व रामनाथ मोते यांनी "एमएमआरडीएने बांधलेल्या लालबाग येथील उड्डाणपुलाच्या बांधकामाचा काही भाग कोसळल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

93अन्वयेच्या अन्य सूचनांना दालनात अनुमती नाकारण्यात आलेली आहे.

---

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## लक्षवेधी सूचनांबाबत

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./ मु.शी** : खताच्या किंमतीमध्ये झालेली वाढ कमी करण्याबाबत

सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर., संजय केळकर व श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. केशवराव मानकर : शेतक-यांची तोट्यात असणारी शेती यासंबंधी मी नियम 93ची सूचना दिलेली आहे. राज्य शासनाने सन 2011-12 मध्ये विक्री हंगामाकरिता धानाला रु. 1780/-

प्रति क्विंटल एवढी उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळावी अशी राज्य शासनाने केन्द्राला शिफारस केलेली आहे. धानाला 1080 रु. प्रति क्विंटल आणि 1110 रु. प्रति क्विंटल अशा दोन ग्रेडमध्ये आधारभूत किंमत जाहीर करण्यात आलेली आहे. ही आधारभूत किंमत 600 ते 700 रुपयांनी कमी आहे. अन्य राज्यामध्ये शेतक-याला प्रत्येक क्विंटलमागे 200 ते 300 रुपये अनुदान दिले जाते. त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार शेतक-यांना अनुदान देईल काय ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सन 2008-09, 2009-10 आणि 2010-11 या तीन वर्षामध्ये खरीप हंगामामध्ये गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये कमी प्रमाणात खतांचा पुरवठा झाल्यामुळे खतांचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार झाला. सन 2012मध्ये शासनाने खत पुरवठ्याचे भरपूर नियोजन केलेले आहे त्यामुळे मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. मागील तीन वर्षामध्ये खतांचा जसा काळाबाजार झाला तो होऊ नये म्हणून 4 जिल्ह्यासाठी खत पुरवठ्याचे दिलेले लक्ष्य पूर्ण करण्यात येणार आहे काय ?

माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, युरियाचा भाव प्रति बॅग जेव्हा 72 रुपये होता त्यावेळी दुकानदाराला 9 ते 10 रुपये कमिशन मिळत होते. आता प्रति बॅग किंमत 280 ते 290 रु. इतकी झालेली असली तरी त्यांना 9 ते 10 रुपयेच कमिशन मिळते. डीएपीची किंमत 500 रुपये होती ती 1000 रु. झालेली आहे. तेव्हा खत विक्रेत्यांना भरावा लागणारा सेल्सटॅक्स, इन्कटॅक्स लक्षात घेता त्यांना 5 टक्के फायदा होईल या प्रमाणे रासायनिक खतांच्या किंमती निर्धारित केल्या जातील काय ?

...नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, इतर राज्यांप्रमाणे अनुदान देणार काय हा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून त्याबाबत मला सांगावयाचे आहे. ही गोष्ट खरी आहे की, धानासाठी हमी भावाच्या तुलनेत उत्पादन खर्च जास्त प्रमाणात येतो. पण राज्य कृषी मूल्य आयोगाला शासन ज्या किंमती कळविते त्यानुसार मागील वर्षी सुध्दा आपण कळविलेल्या किमतीपेक्षा कमी दराचे हमीचे दर त्यांनी ठरविले. यावर्षी देखील जवळपास 2345 रुपये एवढा दर त्यांना सुचविलेला आहे, जेणेकरुन जास्तीत जास्त दर शेतकऱ्याला मिळावा यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत असते.

तसेच दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, राज्याचे शिष्ट मंडळ कृषी मूल्य आयोगाकडे नेऊन जास्तीत जास्त दर मिळण्याबाबत आग्रही भूमिका देखील घेतली जाईल.

त्यानंतर खतांच्या किंमतीबाबत सुध्दा सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. मी त्यांना व सभागृहाला सांगू इच्छितो की, मागील वर्षी राज्यात जो खत पुरवठा करण्यात आला त्यावेळेस अतिशय चांगल्या प्रकारचे नियोजन करण्यात आले होते म्हणून राज्यात कोणत्याही ठिकाणी खताच्या पुरवठ्यात गोंधळ अथवा अनियमितता आढळून आली नाही. औरंगाबाद जिल्ह्यात तर आपण शेतापर्यंत खत पुरविण्याचा अभिनव उपक्रम राबविला होता, त्याच पध्दतीने पुढील काळात सुध्दा इतर जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्याचा प्रयत्न केला जाईल. या वर्षी खताचा साठा अतिशय चांगला असून आजही खत उपलब्ध आहे. त्यामुळे येत्या हंगामात जी खते लागणार आहेत त्यात अडचण जाणवणार नाही असे शासनाने नियोजन केले आहे.

महोदय, खतांच्या किंमतीबाबत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, केंद्र शासनाने सध्या सबसिडीचे प्रमाण कमी केलेले असल्यामुळे काही प्रमाणात किंमती वाढलेल्या आहेत. तरी देखील शेतकऱ्याला जास्तीत जासत मदत कशी करता येईल याबाबतीत शासनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यात शेतकऱ्याला एका बाजूला 1 लाखापर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याजाने देण्याचा निर्णय घेतला असून 3 लाखापर्यंत फक्त 2 टक्के व्याज द्यावे लागणार आहे आणि तेही नियमित भरले तर 1 टक्का व्याजाचा दर कमी करण्यात येईल असे शासनाचे धोरण असून यातून शेतकऱ्याला अप्रत्यक्षरित्या मदत केली जाणार आहे, अशा वेगवेगळ्या माध्यमातून शेतकऱ्याला मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : महोदय, रासायनिक खतांच्या किमतीपेक्षा कमी किमतीत खते विक्रेत्यांना खते विकावी लागतात म्हणून काळा बाजार होतो म्हणून त्यांना 5 टक्क्याचा मुनाफा देऊन खतांची विक्री करण्याची परवानगी देणार काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, असे आपल्याला करता येणार नाही.

श्री. पाशा पटेल : महोदय, मागील वर्षी शासनाने केंद्र शासनाच्या कृषी मूल्य आयोगाकडे धानाचा भाव रु. 1780 इतका सुचविला होता पण केंद्राने मात्र हा भाव रु. 1080 इतकाच जाहीर केला. या वर्षी आपल्या शासनाने हा भाव 2345 रुपये इतका सुचविला त्याबद्दल धन्यवाद. पण अजून केंद्रात हमी भाव जाहीर झालेले नाहीत म्हणून जे शिष्ट मंडळ दिल्लीत जाणार आहे ते अधिवेशन संपल्या संपल्या तातडीने जाऊन त्याची अंमलबजावणी करणार काय, तसेच छत्तीसगड राज्याच्या विधानसभेने सर्व पक्षांना एकत्रित करुन धानाला 2 हजार रुपये भाव द्यावा असा ठराव करुन केंद्राकडे शिफारस केली, तशी शिफारस आपले शासन करणार काय आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी सीएसीपीकडे शिष्टमंडळ घेऊन जाण्याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, हे अधिवेशन संपल्यानंतर ताबडतोब शिष्टमंडळ केंद्रात नेण्यात येईल. तसेच छत्तीसगड विधानसभेने ज्या पध्दतीने ठराव केला त्याबाबतही विचार केला जाईल. अधिवेशन संपण्यापूर्वी दिल्लीत शिष्ट मंडळ घेऊन जाणे शक्य होणार नाही.

----------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.**: शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय 60 करणे याबाबत सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील, श्री. भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार : महोदय, प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षकांचे निवृत्तीचे वय 58 वर्षे आहे आणि महाविद्यालयीन स्तरावर काम करणाऱ्या प्राध्यापकांचे वय 62 वर्षे आहे. हा भेदभाव रद्द करणार काय, तसेच यशदा, पुणे या संस्थेला सेवानिवृत्तीचे वय ठरविण्याची शिफारस करण्याचा अधिकार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीचे वय 58 वरुन 60 करावे, अशी विविध संघटनांकडून मागणी करण्यात आली आहे. याबाबतीत शासनाच्या वरिष्ठ समितीने दि. 4.2.2006 रोजीच्या बैठकीत असा निर्णय घेतला आहे की, यशदा, पुणे या संस्थेकडून दि. 4.1.2010 च्या पत्रासोबत दिलेल्या अहवालानुसार सेवानिवृत्तीचे वय 58 वरुन 60 करण्याच्या प्रस्तावाबाबत माहिती मागविली होती. त्यावर त्यांनी जो अहवाल दिलेला आहे त्यात यशदाचे असे म्हणणे आहे की, सध्याचा वाढता कौल बघता आणि निवृत्ती वयाकडे झुकणारे म्हणजे त्या मुद्याचे समर्थन होत असेल तर राज्यातील वाढती बेरोजगारी, तरुणांची वाढती महत्वाकांक्षा अशा सर्व बाबी लक्षात घेऊन हे करणे संयुक्तिक होणार नाही.

--------

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी.**: मुलुंड (पूर्व) येथील पीएमजीपी संक्रमण शिबिरातील रहिवाशांना बेघर करण्याचा प्रयत्न होणे

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते :--

"मुलुंड (पूर्व) मुंबई येथे असलेल्या पीएमजीपी येथील संक्रमण शिबिरामध्ये एजंटच्या व काही म्हाडाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने नागरिकांना घराचे आमिष दाखवून त्यांच्याकडून सुमारे दीड ते दोन लाख रुपये घेऊन त्यांना राहण्यासाठी सदरहू शिबिरातील सुमारे 120 घरे देण्यात आली. सदरहू घरांचे भाडे एजंटांमार्फत सदरहू रहिवाशांकडून वसूल करण्यात येत आहे. म्हाडाने सदरहू वसाहत पुनर्विकासाकरिता घेतली असल्याने सदरहू नागरिकांना विकासकाच्या संगनमताने मुलुंड पूर्व, नवघर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांमार्फत हुसकावून लावण्याचा प्रयत्न वारंवार करण्यात येत आहे. म्हाडाचे कोणतेही आदेश नसताना दि. 9.4.2012 रोजी वा त्या दरम्यान पीएमजीपी या संक्रमण शिबिरातील रहिवाशांवर म्हाडाचे संबंधित काही अधिकारी, विकासक यांच्या संगनमताने मुलुंड पूर्व, नवघर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यामार्फत कारवाई करण्यात येऊन महिला व पुरुष यांना अमानुष मारहाण करण्यात आली आहे. या मारहाणीत अनेक महिला व पुरुष गंभीर जखमी झाल्याचे आढळून येणे, यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, सबब संक्रमण शिबिरातील रहिवाशांना बेघर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एजंट व म्हाडाचे संबंधित काही अधिकारी तसेच मुलुंड (पूर्व) नवघर पोलीस स्टेशनचे अधिकारी व विकासक यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी ही सूचना दिली आहे.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : रॉकेल वाटप करतांना महाराष्ट्र राज्याला सापत्न वागणूक देणे याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

केंद्र शासनाने सर्व राज्यांना रॉकेल वाटप करतांना महाराष्ट्र राज्याला सापत्न वागणूक देत नेहमीच्या कोटयात 24 टक्के कपात केलेली आहे. मात्र दिल्ली आणि गुजरात राज्याचा कोटा वाढविला आहे. यामुळे पुणे जिल्हयाला तब्बल 18 लाख लिटर रॉकेल कमी मिळणार असून परिणामी सामान्य नागरिकांना रॉकेल कमी मिळणार आहे. राज्याच्या एकूण मागणीपैकी केवळ 55 टक्के कोटा देण्यात येत होता. त्यापैकी तिमाही 2 लाख 99 हजार किलो लिटर रॉकेल पैकी केंद्राने 24.20 टक्के कपात करुन 72 हजार 468 किलो लिटर रॉकेल कमी केले आहे. या कपातीला राज्यातील रॉकेल विक्रेत्यांनी आक्षेप घेतला असून यासंदर्भात पुरवठा खात्याच्या सचिवांसोबत चर्चा होवूनही त्यातून तोडगा निघालेला नाही. सद्या गॅस सिलेंडरची टंचाई असल्यामुळे सर्वसामान्य नागरिक होरपळून जात आहेत. पुणे शहर रॉकेल मुक्त करण्याची केंद्र शासनाची योजना हवेतच विरली आहे. रॉकेलचा पुरवठा कमी केल्यामुळे मोठया प्रमाणात रॉकेलचा काळाबाजार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रॉकेलचा पुरवठा करणाऱ्या टँकरला फ्लो मीटर बसविण्यात यावे व प्रशासनाने जिआफेन्स यंत्रणा वापरावी आणि राज्याचा रॉकेलचा कोटा पूर्ववत करण्याकरिता राज्य शासनाने तातडीने पावले उचलावीत अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी.** : पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत मोठे विकास प्रकल्प राबविण्यासाठी स्पेशल पर्पज व्हेईकलची स्थापना करण्याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मोठे व महत्वाचे विकास प्रकल्प राबविण्यासाठी पुणे ईन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन कंपनी (स्पेशल पर्पज व्हेईकल)ची स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने अद्याप मंजूर केलेला नाही. या कंपनीची स्थापना प्रांतिक महानगरपालिकेच्या कायदद्या अंतर्गत करण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समितीत आणि मुख्य सभेतही मान्यता प्राप्त आहे. या कंपनीची प्रशासकीय संरचना, कार्यकक्षा, कंपनीचा उद्देश आणि तिचा आर्थिक स्त्रोत या बद्दल सविस्तर प्रस्ताव पुणे म.न.पा. ने सन 2008 मध्ये शासनास सादर केला आहे. प्रकल्पांची निवड यादी प्रकल्प खर्च रुपये 13 हजार 800 कोटी व त्या अनुषंगाने करावयाचा आर्थिक सहभाग /स्त्रोत या बाबतची माहितीही पुणे म.न.पा. ने शासनाला सादर केलेली आहे. सद्या या प्रकल्पापैकी काही प्रकल्प व त्याचे काम सुरु करण्यात आले आहे. वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गाच्या प्रस्तावाला शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. मागील अधिवेशनात मा. मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाकरिता पुणे मेट्रो रेल कॉर्पोरेशन ही स्पेशल पर्पज व्हेईकल 3 महिन्याच्या आत स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते. पुणे शहराची वाढती लोकसंख्या व अनुषंगिक वाहतूक समस्या व अन्य पायाभूत सुविधा, रस्ते, पाणी पुरवठा, मल:निस्सारण इ. महत्त्वाकांक्षी व नागरी सुविधेमध्ये मूलभूत बदल घडविणारे मोठे प्रकल्प पुणे म.न.पा. हिस्सा, खाजगी सहभाग, आंतरराष्ट्रीय कर्ज याद्वारे निधींची उभारणी करुन ते जलद गतीने मार्गी लावण्याकरिता पुणे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कंपनी (स्पेशल पर्पज व्हेईकल) ची स्थापना करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाने तातडीने मंजुरी द्यावी" अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील विडी उद्योगावर लावण्यात आलेला 12.5 टक्के विकीकराबाबत श्री. जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महाराष्ट्र राज्यात विडी उद्योग मोठया प्रमाणात असून हा उद्योग रोजगार निर्मितीचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र शासनाने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात विडयांवर 12.50 टक्के विक्रीकर लागू केल्याने त्याचा फटका राज्यातील गरीब ग्राहकाला बसणार आहे.

सोलापूर शहरात 70 ते 75 हजार विडी कामगार असून गोंदिया व भंडारा जिल्हयातही या व्यवसायात सुमारे अडीच लाख कामगार आहेत. सोलापूर शहरात औद्योगिक विकासाच्या अभावात मोठया संख्येने कामगार विडी व यंत्रमाग या असंघटित उद्योगावर अवलंबून आहेत.

विडी उद्योगावर लालेल्या 12.5 टक्के विक्रीकरामुळे राज्यातील सुमारे 5 लाख विडी कामगारांवर संकट ओढवले असून यापूर्वीच "द सिगारेट्स ॲण्ड अदर टोबॅको प्रॉडक्ट ॲक्ट 2003" मुळे विडी उद्योगला बहुराष्ट्रीय कंपन्याच्या सिगारेट कंपन्याशी व गुटखा उद्योगाशी स्पर्धा करावी लागत आहे.

या उद्योगाच्या विक्रीत या करामुळे दररोज सुमारे रु. 18 लाख म्हणजे वार्षिक रु. 54 कोटीचा बोजा पडणार असल्याने हा उद्योग संकटात आला आहे. देशातील बहुसंख्य विडी कामगार असणाऱ्या पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, कर्नाटक व मध्यप्रदेश या राज्यानी विडी उद्योगाला विक्रीकर व वॅटमधून पूर्णपणे वगळलेले आहे.

सबब महाराष्ट्र राज्य शासनाने लागू केलेला विक्रीकर/वॅट मागे घेण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व केलेली कार्यवाही यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : ठाणे जिल्हयातील पालघर आगारातील बस चालकाला कर्तव्यावर असतांना आलेला हृदयविकाराचा झटका याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"ठाणे जिल्हयातील पालघर आगारातील 48 वर्षीय चालकाने 18 वर्ष परिवहन मंडळात कार्यरत असता एकही अपघात न करणे, तसेच कार्यरत असतांना सहकारी अथवा प्रवासी यांची कोणतीही तक्रार न करता कर्तव्यकाळ व्यतीत करणे, याशिवाय दिनांक 4 एप्रिल, 2012 रोजी पालघर-मनोर रस्त्यावरील वाघोबा खिंडीत ते बस चालवत असतांना हृदयविकाराचा झटका आला असता 58 प्रवासी असलेली एस.टी.बस सुमारे साडेतीन किलो मीटरचा घाट सुखरुप रित्या उतारुन रस्त्याच्या कडेला उभी करुन हृदयविकाराच्या झटक्याने प्राण सोडणे, सदर कर्तव्यदक्ष चालकाच्या कार्याचा शासनामार्फत गौरव करण्यात यावा, त्याच्या कुटुंबियांना रोख बक्षीस देण्यात यावे तसेच कुटुंबातील वारसांना शासनाच्या सेवेत संधी द्यावी" अशी शिफरस या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

--------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत करण्यात आलेले घटनाबाहय पध्दतीचे नियम मागे घेऊन नवीन नियम तयार करण्याची आवश्यकता याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 27 अन्वये महाराष्ट्र शासनाला "समुचित शासन" म्हणून नियम करण्याचा अधिकार मिळालेला आहे. या अधिकाराच्या अधीन राहून महाराष्ट्र शासनाने दि. 11.11.2005 रोजी नियम तयार केले होते. त्यानंतर उपरोक्त अधिकारांच्या अनुषंगाने दि. 16.1.2012 रोजी नव्याने नियम तयार केलेले आहेत. परंतु या नियमांची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर आजतागायत उपलब्ध नाही. त्याचबरोबर हे नियम सभागृहासमोरही ठेवण्यात आलेले नाहीत. कलम 29(2) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो अधिसूचित करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळा पुढे ठेवण्यात येईल अशी करण्यात आलेली तरतूद, परंतु महाराष्ट्र शासनाने ज्या पध्दतीने नियम तयार केलेले आहेत आणि जी कार्यपध्दती वापरण्यात आलेली आहे, यावरुन महाराष्ट्र सरकारला या कायद्याची गळचेपी करावयाची आहे असेच दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलमा नुसार समुचित शासनाला फक्त अर्जाची फी विहित करण्याचा अधिकार आहे, या व्यतिरिक्त कोणताही बदल समुचित शासनास करता येणे शक्य नसतांना महाराष्ट्र शासनाने घटनाबाहय पध्दतीने नियम तयार केलेले आहेत. उदा. 1. एका अर्जात फक्त एकच प्रश्न विचारता येईल, 2. एका अर्जात फक्त 150 शब्द मर्यादा घालण्यात आलेली आहे. 3. अभिलेखांचे निरीक्षण करावयाचे असल्यास फक्त पेन्सीलचा वापर करता येईल, हे नियम अतिशय अव्यवहार्य अशा स्वरुपाचे आहेत. याकरिता हे नियम तत्काळ मागे घेऊन 1. महिती आयुक्तांची सर्व 11 पदे तत्काळ भरणे, 2. कलम 19 चे पोट-कलम (10) नुसार माहिती आयुक्तांची अपिलावर निर्णय देण्याची कार्यपध्दती तत्काळ विहित करणे, 3.कलम 18 चे पोट-कलम (3)(च) नुसार माहिती

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आयुक्तांना दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 अन्वये दाव्याची चौकशी करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती, 4. कलम 4(1)(ख) चे पोट-कलम (सतरा) मधील अन्य बाबी विहित करण्यात याव्यात असे नियम तयार करुन ते शासनाने तत्काळ स्वरुपात अंमलात आणण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने तत्काळ निवेदन करावे."--------

...7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** :प्रत्येक कार्यालयाने नगारीकांची सनद फलकावर लावणे अनिवार्य असून देखील अनेक जिल्हयातील कार्यालयात त्याची अंमलबजावणी न होणे याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दप्तर दिरंगाई कायदा, 2006 तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 नुसार प्रत्येक कार्यालयाने "नागरिकांची सनद"मोठया फलकावर प्रसिध्द करणे आवश्यक व बंधनकारक असणे, सांगली जिल्हयामध्ये याची अंमलबजावणी झालेली नसणे, तसेच राज्यातील अनेक जिल्हयात अद्यापपर्यंत याची अंमलबजावणी झालेली नसल्याने शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

-----------

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रिक्षा चालकांनी 15 एप्रिल 2012 रोजीचा अचानकपणे घोषित केलेला संप या बाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

या पूर्वी राज्यातील पहिली पासून महाविद्यालयीन परीक्षा संपल्यानंतरच रिक्षा चालकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत मुंबई ऑटोरिक्षा मेन्स युनियनचे अध्यक्ष यांनी संप करण्याचा दावा केला होता. तरीही महाविद्यालयीन तृतीय वर्ष कला,विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची परीक्षा दिनांक 16 ते 18 एप्रिल 2012 काळात असतानाही अचानकरित्या रिक्षा चालकांनी दिनांक 15 एप्रिल 2012 च्या मध्यरात्रीपासून घोषित केलेल्या संपामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला जाण्यासाठी येणारा अडथळा, परिणामी राज्यातील विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान विचारात घेऊन संप पुढे ढकलण्याबाबत राज्य शासनाने वेळीच उपाययोजना करून विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंधश्रद्धा निर्मूलन कायदा मंजूर करण्याबाबत
श्री.हेमंत टकले, वि.प.स.यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

समाजामधील वाढत जाणारी अंधश्रद्धा आणि त्या निमित्ताने होत असलेल्या अघोरी कारवाया, नाहक जीव घेतले जाणे व राज्याच्या कानाकोपऱ्यात फोफावणाऱ्या भोंदूबाबाचे अड्डे हा विषय काळजीचा झाला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लवकरात लवकर मंजूर होण्याची गरज आहे. या बाबतीत शासनाने तातडीने उपाययोजना करावी ही मागणी मी करीत आहे. विधान सभेने दिनांक 16.12.2009 मध्ये हा कायदा संमत केला आहे. परंतु, विधान परिषदेत तो प्रलंबित आहे. दिनांक 7 जुलै 1995 रोजी ह्या सभागृहामध्ये तत्कालीन सदस्य स्वर्गीय पी.जी.दस्तूरकर यांनी अशासकीय ठराव आणला होता आणि तो विधान परिषदेमध्ये मंजूरही झाला होता. अनेक वर्षे हा कायदा प्रलंबित असल्याने राज्यात अंधश्रद्धेच्या नावाखाली अनेक समाज विघातक कार्य होत आहेत, ही बाब लक्षात घेऊन हा कायदा राज्यात लवकरात लवकर लागू करावा ही विनंती.

......

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: गडचिरोली,गोंदिया,भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती, अतिरिक्त घरभाडे भत्ता लागू न करणे.

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

नागपूर विभागांतर्गत गडचिरोली आणि गोंदिया हे पूर्णपणे व भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील काही भाग नक्षलग्रस्त म्हणून शासनाने घोषित करणे, या नक्षलग्रस्त भागात जीवितास धोका पत्करून काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती, अतिरिक्त घरभाडे भत्ता व 15 टक्के प्रोत्साहन भत्ता शासनाने मंजूर करणे, याच आशयाचा शालेय शिक्षण विभागाने दिनांक 6.8.2002, 9.8.2002 रोजी शासन निर्णय निर्गमित करणे, परंतु या शासन निर्णयाचा लाभ खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ते जीवितास धोका पत्करून नक्षलग्रस्त भागात काम करीत असताना सुद्धा अद्याप पर्यंत देण्यात न येणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती, अतिरिक्त घरभाडे भत्ता व 15 टक्के प्रोत्साहन भत्ता लागू न करून शासनाने त्यांच्यावर अन्याय करणे, दुजाभाव करणे, परिणामी या नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष यावर शासनाने तातडीने लक्ष घालून कार्यवाही करावी अशी विनंती या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत</u>**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी नियम 240 अन्वये दिनांक 4.4.2012 रोजी हक्कभंगाची सूचना दिली होती. त्याचे नेमके काय झाले हे मला जाणून घ्यायचे आहे. मला सोमवारी कळले तर फार बरे होईल. कारण पुढच्या आठवड्यामध्ये अधिवेशन संपणार आहे.

दुसरे असे की, सन 2010 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये दायी कीट विषयी सीआयडी चौकशीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे, आश्वासन देण्यात आले होते. तो अहवाल अजूनही सभागृहाच्या पटलावर ठेवला गेला नाही. हे दोन प्रश्न कामकाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. कृपया आपण त्याची नोंद घ्यावी.

**तालिका सभापती** : या बाबत माहिती घेऊन आपल्याला कळविण्यात येईल.

....

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज-विधेयके**

**पृ.शी.**: खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. II OF 2012

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977.)

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम,1977 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 2 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

.......

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहात संबंधित विभागांचे मंत्री उपस्थित नसल्यामुळे**

**अशासकीय ठराव पुढे ढकलण्याबाबत**

**तालिका सभापती** : आता अशासकीय ठराव घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी आपला ठराव मांडावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयावर मी अशासकीय ठराव दिलेला आहे. यावर होणारी चर्चा ही अतिशय महत्त्वाची आहे. मला या चर्चेचे उत्तर कोणत्या विभागाचे माननीय मंत्री देणार या बाबत अवगत केले तर मला पुढची मांडणी करता येईल.

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेले अशासकीय ठराव संबंधित विभागांचे माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे पुढे ढकण्यात येत आहेत.

श्री.हेमंत टकले : धन्यवाद.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्य अशासकीय कामकाज देतात. अशासकीय कामकाजाला माननीय मंत्री उपस्थित राहणार आहेत किंवा नाही हे सन्माननीय सदस्यांना सकाळी कळले तर बरे होईल. कारण ज्या सन्माननीय सदस्यांचे अशासकीय कामकाज असते ते दिवसभर सभागृहात बसलेले असतात. त्यांना वाटते की, आज तरी आपले अशासकीय कामकाज होईल. संध्याकाळी 4.00 वाजता मंत्रिमहोदय कामकाज पुढे ढकलण्यासंबंधी आपल्याला कळवतात, हे बरोबर नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आजचा दिवस हा अशासकीय कामकाजासाठी राखून ठेवलेला असतो.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांचे अशासकीय ठराव आहेत त्यांना त्यांचे म्हणणे मांडू द्यावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हे बरोबर नाही. असे केले तर ती प्रथा पडेल. संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांनी कामकाजाच्या वेळी उपस्थित न राहणे हे फार गंभीर आहे.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अशासकीय कामकाज फार महत्त्वाचे आहे. आज ते कामकाज व्हायला पाहिजे होते. वेळेचे नियोजन करून कामकाज केले तर बरे होईल. कारण आज बिलावर किती वेळ चर्चा झाली ? ..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बिलावर चर्चा करण्यासाठीच सभागृह आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा विषय गांभर्याने घेतला पाहिजे. संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांनी कळवायला पाहिजे होते. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांचा देवस्थान संबंधीचा महत्त्वाचा अशासकीय ठराव आहे. आज सगळी कडे यात्रा आणि उरूस सुरू आहेत. माननीय मंत्री उत्तर देणार आहेत की, नाही हे आम्हाला सकाळीच कळले पाहिजे. येथे प्रश्न आम्ही कशासाठी मांडतो ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, प्रश्न लागावा म्हणून आम्ही सतत भांडत असतो.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेची निश्चितपणे नोंद घेण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आजच्या कामकाजापुरता आपण हा विचार करु नका.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या अधिवेशनाचा शेवटचा एकच आठवडा शिल्लक राहिला आहे. या संपूर्ण अधिवेशनाच्या कालावधीत एकदाही अशासकीय कामकाज घेण्यात आलेले नाही. पुढील आठवडयामध्ये अशासकीय कामकाज होणार नाही. या करिता माझी आपणास विनंती आहे की, मागील चार आठवडयामधील अशासकीय कामकाजातील कोणतेही चार महत्वाचे विषय निवडून सोमवारी किंवा सोयीस्कर दिवशी अशासकीय कामकाज घेण्यात यावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आज सभागृहामध्ये अशासकीय ठरावांना उत्तर देणारे पाच मंत्री अनुपस्थित आहेत. ते कां अनुपस्थित राहिले याबाबत आपण त्यांच्याकडे विचारणा करावी. अशाप्रकारे अशासकीय कामकाजाची थट्टा होऊ लागली आहे.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे, निश्चितपणे आपल्याला न्याय देण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 16 मार्च, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 26 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 16.4.2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही